# 'स्व'-रूपवर्धिनी

कार्यवृत्त २००५

समिधामय ही काया पावन ।
व्हावे जीवन यज्ञ समर्पण ॥



# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००५

**संपादक**

श्री. जयंत कवठेकर

**संपादकीय मंडळ**

श्री. जयसिंहभाई मरिवाला

श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ

श्री. श्रीकांत सामळ

श्री. शिरीष पटवर्धन

सौ. बागेश्री पोंक्षे

श्री. सुनील कुलकर्णी

श्री. कृ. गो. लवळेकर

**दूरध्वनी संपर्क**

श्री. जयंत शंकर कवठेकर

संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४

(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०

किंमत रूपये ५/-

वार्षिक वर्गणी रूपये १००/-

(विशेषांकासह)

आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त

चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी या

नावाने काढावा.

## अंतरंग

- हृद्गत
- विशेष लेख
- वार्षिक कार्यक्रम वृत्त
- विभागशः वार्षिक वृत्त
- आर्थिक आघाडीवर

**※ छपाई ※**

प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

✻ पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर ✻ श्री. प्रमोद चौधरी

## *संस्थापक सदस्य*

✻ श्री. पु. व. श्रॉफ ✻ श्री. श्री.शं. सामळ ✻ श्री. रा. प. देसाई

✻ श्री. कां. गि. शहा ✻ श्री. कृ. गो. लवळेकर ✻ श्री. वा. दे. सचेती

✻ कृ. ल. पटवर्धन ✻ अ. र. गोगावले ✻ दत्तोबा तांबे

## विद्यमान कार्यकारी समिती

**अध्यक्ष**

श्री. जयसिंहभाई मरिवाला

**उपाध्यक्ष**

श्री. प्रतापराव पवार
श्री. उदय गुजर
श्री. अविनाश वारदेकर

**कार्याध्यक्ष**

श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ

**सहकार्याध्यक्ष**

श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी
श्री. शिरीष पटवर्धन

**कोषाध्यक्ष**

श्री. श्रीकांत सामळ

**कार्यवाह**

श्री. संजय तांबट

**सहकार्यवाह**

✻ श्री. ज्ञानेश पुरंदरे ✻ श्री. अविनाश जोशी ✻ श्रीमती पुष्पाताई नडे

**सदस्य**

✻ श्री. कन्हैयालाल बलदोटा
✻ अॅड. सौ. निलिमाताई गोखले
✻ श्री. सुनील कुलकर्णी
✻ कु. दीपाली पवार
✻ श्री जयंत कवठेकर
✻ सौ. बागेश्री पोंक्षे
✻ श्री. विलास कुलकर्णी
✻ श्री. अरविंद केळकर
✻ श्री. रामभाऊ डिंबळे
✻ प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर
✻ श्री. विनोद बिबवे
✻ श्री. पराग लकडे


**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**

**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. अॅक्टनुसार नोंदणी क्र.८३९३०६०**

**आयकर सवलत - ५०% कलम ८० जी प्रमाणे, १००% कलम ३५ एसी प्रमाणे**



संपर्काचा पत्ता : - 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.

दूरध्वनी : - (कार्यालय) - २६१२१७०४, २६१३४३१० (निवास) २४२२१७७०

ई-मेल : swaroopwardhinee@vsnl.net वेबसाईट : http://www.geocities.com/wardhinee/


**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृद्गत

" किशाभाऊ ! 'स्व'-रुपवर्धिनी सुरु करण्यामागची तुमची प्रेरणा कोणती ?" असा प्रश्न संस्थापक (कै.) श्री. किशाभाऊ पटवर्धन यांना अनेक ठिकाणी विचारला जात असे. काही वेळा त्यांचा सत्कार समारंभ असे, कुठे त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा सोहळा असे, कधी वर्धिनीसाठी देणगी स्वीकारण्याचा कार्यक्रम असे, तर केव्हा दूरदर्शन किंवा आकाशवाणीवरची मुलाखत असे. किशाभाऊंचं सर्वत्र उत्तर असे 'मी लहानपणापासून संघाचा स्वयंसेवक. परमपूजनीय डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांनी नित्य शाखेच्या संस्कारातून अंत:प्रेरणा जागविण्याचे काम केले. त्यातून हजारो स्वयंसेवकांना काम करण्याची प्रेरणा मिळाली. डॉ. हेडगेवार यांनी जागविलेली अंत:प्रेरणा आणि कै. अप्पासाहेब पेडसे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन कसे करता येते याचे केलेले मार्गदर्शन यातून वर्धिनीचे काम उभे राहिले'.

कै. किशाभाऊंना पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांच्या नंतर ज्यांच्या निकट मार्गदर्शनाचा लाभ झाला, त्या द्वितीय सरसंघचालक परमपूजनीय माधव सदाशिव गोळवळकर तथा श्रीगुरुजी यांची जन्मशताब्दी या वर्षी येत आहे. त्या निमित्त वर्धिनीच्या उद्दीष्टपूर्तीला साह्यभूत होणारे, मार्गदर्शक ठरणारे, श्रीगुरुजींचे समाज संघटनेच्या दृष्टीने तसेच सामाजिक समरसता आणि शिक्षण यासंबंधीचे विचारधन तळटीपेद्वारे देत आहेत. 'राष्ट्राय स्वाहा ।', 'राष्ट्राय, इदं न मम ।' या भावनेनं समाज सेवारत कसे व्हावे याचं मार्गदर्शन याद्वारे होत आहे. समाज सेवा ही 'उपकार करतो आहे' अशा क्षुद्र भावनेनं करणे हा अपराध आहे, उलट कर्तव्याच्या उदात्त भावनेनं समाज सेवेचं व्रत आपण हाती घ्यायला हवं याविषयीही यातून मार्गदर्शन होत आहे. कार्यवृत्ताचं मुखपृष्ठही याच भावनेनं साकारलं आहे. 'स्व'-रुपवर्धिनीचे संस्थापक स्वर्गीय किशाभाऊ पटवर्धन यांना यंदाच्या वर्षीचा परमपूजनीय श्रीगुरुजी सेवा पुरस्कार मिळाला. हाही एक अपूर्व योगायोग आहे.

त्सुनामीग्रस्त तामीळनाडूत आणि भूकंपग्रस्त जम्मू-काश्मीरमध्ये वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी वर निर्देशित सेवाभावाला अनुसरुन जे काम केले, जो श्रमानुभव घेतला त्याचे वृत्तांकन या कार्यवृत्तात दिले आहे. 'साद पूर्वांचलाची' या लेखाद्वारे युवतीगटाच्या अभ्यासदौऱ्याचे अनुभवकथन आपल्याला आपल्या या बांधवांच्या विविध समस्यांबद्दल अंतर्मुख करायला लावणारे आहे.

या शिवाय वैशिष्ट्यपूर्ण विषयांना न्याय देणारी शिबिरे, शाखा विभाग व प्रकल्प विभाग यांचे विविध उपक्रम याचे वृत्तही कार्यवृत्तात तपशीलात दिलेले आहे.

**समाज हे परमेश्वराचे स्वरूप आहे.**

विशेष लेख

# निसर्गच जेंव्हा रागावतो....

✍ ज्ञानेश पुरंदरे

**निसर्गाने माणसाची परीक्षा पहाण्याचे ठरविले आहे असे वाटावे इतकी नैसर्गिक संकटे गेल्या वर्षात आली. २६ डिसेंबर २००४ रोजी आलेल्या सागरी भूकंपानंतरच्या त्सुनामीने २००५ च्या वर्षासाठी संकट मालिका सुरू झाली, प्रचंड पर्जन्यवृष्टीने मुंबईसह महाराष्ट्राला आणि अनेक राज्यांना तडाखा दिला, तर वर्ष अखेरीला जम्मू काश्मीरच्या सीमावर्ती क्षेत्रात झालेल्या भूकंपाने पुन्हा जाणवून दिले की निसर्गाचा राग अजून शांत झाला नाही. संकटाच्या या काळात आवश्यक त्या सेवेसाठी धावून जाणे हे सर्वांचे कर्तव्यच आहे. वर्धकांनी या संकट काळात केलेल्या सेवेतील अनुभव लेखरूपाने देत आहोत.**

**त्सुनामीग्रस्त सेवाकार्यातील वर्धिनीचा सहभाग**

सौ. बागेश्री पोंक्षे व कु. दीपालीताई पवार यांनी १० जानेवारी ते १९ जानेवारी या कालावधीत त्सुनामीग्रस्त भागाला भेट दिली. या भेटीत तमिळनाडूतील कडलूर, नागपट्टण, तसेच पाँडेचरी प्रदेशातील एकूण १२ गावांत त्यांनी काम केले. शाळा व रस्त्यांची सफाई, निवास उभारणी व धान्यवाटपात साह्य अशा प्रकारची कामे त्यांनी केली. तसेच आपत्तीग्रस्त कुटुंबे, महिला, किशोरी यांच्या व्यक्तिशः भेटी घेतल्या. त्यांचे सांत्वन केले-समुपदेशन केले. या दौऱ्यात त्यांना काही आश्वासक गोष्टीही दिसल्या.

❊ कडलूरचे जिल्हाधिकारी गगनसिंग बेदी हे एक दक्ष आणि जनहिताला प्राधान्य देणारे आधिकारी आहेत. निर्णय पटकन घेतात. अवघ्या आठ दिवसांत मृतांच्या नातेवाईकांपर्यंत त्यांनी मदत पोचवली.



❊ पंजाब, कच्छ, भूज, हरयाना, लुधियाना अशा पन्नास ठिकाणांहून लोक इथे साह्याकरिता धावून आले होते.

❊ आळेफाटा येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या तरूण डॉक्टरांनी स्वयंस्फूर्तीने सुरतेपासून देणगीदार मिळवून अन्न, धान्य,

आपली सारी शक्ती लावून, क्षुद्र स्वार्थ व भौतिक आकर्षण यापासून बुद्धि अलिप्त ठेवून, सेवाकार्य केले पाहिजे.

औषधे, कपडे आदी साहित्य जमा केले व ते मदत कार्यात सहभागी झाले.

❀अकाल तख्ताच्या शंभर कार्यकर्त्यांनी दुसऱ्या दिवसापासून लंगर सुरू केले.

❀राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सेवाभारतीच्या माध्यमातून त्सुनामीच्या पहिल्या तासापासून प्रत्यक्ष मदतकार्यास प्रारंभ केला. दुसरी लाट आली, तेव्हा मदतकार्य करणारेच संकटात सापडले. तरीही पंधराशे स्वयंसेवक नागपट्टणमध्ये तर पंधराशे स्वयंसेवक श्रीलंकेत साह्य करीत राहिले. सेवाभारतीने मृतदेहांना अग्नी देणे, अन्न वाटप करणे, घरे उभारण्यास सहाय्य करणे, अडचणीत असलेल्यांना पोहत जाऊन साह्य करणे आदि कामे जीव ओतून केली.

❀आपद्ग्रस्तांना मानसिक, भावनिक दिलासा देणाऱ्या दोन विशेष गोष्टी सेवाभारतीने केल्या. सर्व जाती, पंथ, धर्माच्या आपद्ग्रस्तांसाठी सोळाव्या दिवशी त्या त्या पद्धतींनुसार श्राद्धविधी केले. तसेच आपद्ग्रस्त निराधार किशोरींसाठी समुपदेशन व दीपपूजा हे विधी केले. याही स्थितीत ख्रिश्चन धर्मीयांनी सहाय्याच्या नावाने धर्मप्रचार मात्र चालू ठेवला, ही गोष्ट धक्कादायक होती.

या दोन सदस्यांच्या भेटीनंतर वर्धिनीचे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री. ज्ञानेश पुरंदरे यांच्या नेतृत्वाखाली वीस वर्धक-वर्धिकांचे पथक आपद्ग्रस्तांच्या सहाय्यासाठी गेले होते.

⌘ अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य मा. श्री. सूर्यनारायणरावजी यांनी सेवाकार्याचे स्वरूप, आवश्यकता; तसेच तमीळ भाषा, लोक रिवाज, प्रथा परंपरा यांची माहिती दिली.

⌘ दि. ११ ला नागपट्टण येथे सर्व पोचले व तेथून पुढे किंचानकुप्पम् खेड्यामध्ये प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली. तेथील वास्तव्यात वर्धक व वर्धिकांनी पुढील कामे केली.

**स्वच्छता आरोग्य :-** १) सांडपाणी वाहून जाण्यासाठी नाली, गटारे बनवणे. २) कचरा एकत्र करून त्याचे निर्मूलन करणे व कचरापेट्या तयार करून त्या रस्त्यांवर ठेवणे. ३) सर्वत्र गॅमॅक्सीन पावडर फवारणे ४) स्वच्छताविषयक प्रबोधनासाठी कोपरा सभा घेणे ५) भित्तीपत्रके, घोषणापत्रके याद्वारे स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, व्यसनमुक्ती, अल्पबचत यांचा प्रचार व प्रसार करणे ६) डॉ. सुरेखा कुडलिंगार यांनी वैद्यकीय केन्द्र चालवून अनेक रूग्णांवर उपचार केले व त्यांचे शारिरीक व मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी प्रयत्न केले. ७) साफ केलेल्या रस्त्यांवर 'गंगापथ' 'जमुनापथ' अशा नावाच्या पाट्या लावल्या.

**अन्य विशेष :-** ❁ सेवावस्तीच्या सर्व परिसरात बांधकामासाठी उपयुक्त असे शेकडो मोठे ओंडके पसरलेले होते. ते एका विशिष्ट ठिकाणी आणून ठेवायचे होते. या कामाचे बाजारमूल्य (टेंडरनुसार) चाळीस हजार रूपये होते. सर्व वर्धक व वर्धिकांनी सात दिवसांच्या मोजक्या कालावधीत हे काम उत्तम रीतीने पुरे केले आणि चाळीस हजार रुपयांची बचत झाली. ❁ सुनामीग्रस्त मच्छिमार बांधवांचे व अन्य बांधवांचे घरोघरी जाऊन स्नेहपूर्ण वागण्या बोलण्यातून त्यांचे दु:ख हलके करण्याचा प्रयत्न केला. ❁ वर्धक-वर्धिकांनी बालकांकरिता हस्तकला, मुलींना

समाजाला आपले आराध्य दैवत मानून त्याचे दु:ख तेच आपले दु:ख असे समजले पाहिजे.

लोकरीच्या बाहुल्या करायला शिकवणे, सर्वांकरिता खेळ घेणे व बालवाडीचे वर्ग सजविणे ही कामे केली. ❁ मुलांकरिता व मुलींकरिता सायंशाखा स्थिरपणे चालावी याकरिता प्रयत्न केले. ❁ वस्तीमध्ये धर्मांतराच्या उद्देशाने आलेल्या विदेशी ख्रिस्ती धर्मप्रचारकांना तसे न करण्याबाबत समजावले.

**मदत कार्यातील जाणवलेल्या काही विशेष गोष्टी :-** ❑ संघाने एक हजार निवास स्थाने अत्यंत त्वरेने उभी केली. ❑ रामकृष्ण मिशनने मच्छिमारांकरिता ऐंशी फायबर बोटी त्वरीत उपलब्ध करून देण्याचे स्तुत्य कार्य केले. ❑ वर उल्लेखिलेल्या अनेक कामांत वर्धकांच्या जोडीने गावातल्या सर्व लहान मुलांनी खूप साह्य केले. ❑ वर्धिनीच्या युवतींमार्फत घरोघरी चुलीपर्यंत संपर्क साधला गेला आणि गावातील अनेक महिलांचे या युवतींशी कायमचे स्नेहसंबंध जोडले गेले.

ज्यांनी आपल्या कामाने वर्धकांना प्रेरणा दिली अशांचा निर्देश करणे खूप आवश्यक आहे.

❁ सर्वश्री केशवजी, नागराजजी, शिवरामजी हे संघ प्रचारक अखंड कार्यरत होते.

❁ श्री. ए. एम. पौंडियन यांनी एकट्याने सत्तर प्रेते शोधून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले.

❁ श्री. राजेंद्रजी वासवाना आपला व्यवसाय कुटुंबीयांवर सोपवून पूर्णवेळ कामासाठी आले. ❁ तिरूपती हा छंद-फंद असलेला तरूण इथे कामाकरता आला आणि पूर्ण व्यसनमुक्त होऊन सेवाकार्यात मग्न झाला.

❁ त्रिची तालुका कार्यवाह ॲडव्होकेट श्री. गणेशकुमार सर्व सोडून येथे येऊन राहिले आणि त्यांनी दिवसरात्र प्रकल्प प्रमुखाची जबाबदारी पार पाडली.

❁ उटी येथील आपल्या शेकडो चहाच्या मळ्यांचा कारभार दुसऱ्यावर सोपवून श्री. जयगणेश येथे सहप्रकल्प प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

❁ श्री. मडीवेल नोकरीतून महिनाभर रजा काढून येथे कार्यरत आहेत.

❁ साठ वर्षांचे नानाजी श्री. शणमुखनाथन् हे रोज सायकलवरून येथे येतात आणि कोठी व्यवस्थापकाचे काम तत्परतेने करतात.

❁ तिरूचिरापल्लीचे उद्योजक श्री. अर्जुनम् आपला सर्व व्याप सोडून येथील भोजन व्यवस्था सांभाळतात.

❁ पलनीले, मणी, शिवनंदम् यांनी सर्व वर्धकांना आग्रहाने घरी जेवायला नेले.

❁ सागरकन्या श्री श्री माँ आनंदमयी अक्करपेटे येथील मंदिरात रात्री दोन वाजेपर्यंत सर्व आपद्ग्रस्तांना दर्शन, प्रसाद व तांदुळाची एकेक पिशवी भेट देत होत्या.

❁ या सगळ्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या आघाडीवर मात्र उदासीनता होती.

## अस्वस्थ हिमगिरी

वर्धिनीच्या साप्ताहिक बैठकीत श्री अविनाशराव जोशी यांनी वाचलेल्या एका लेखाबद्दल माहिती दिली. या लेखात लेखकाने व्यथा व्यक्त केली होती की भारतात कोठेही आपत्ती कोसळली की सारा देश प्रांत मदतीला धावतो; मग काश्मीरच्या भूकंपाबाबतच सारे एवढे उदासीन का आहेत ?

या विषयावरून झालेल्या चर्चेत वर्धिनीकडे आपद्ग्रस्त सेवानिधीत शिल्लक असलेल्या निधीचा उपयोग जम्मू-काश्मीरमधील भूकंपग्रस्तांसाठी करावा असे सर्वांचे मत झाले. जम्मू-काश्मीर प्रांताचे सेवाभारतीचे प्रमुख

समाजाच्या सुखाची इच्छा मनात बाळगून आपले सर्वस्व त्याच्या सेवेत अर्पण केले पाहिजे.

श्री. जयदेवजी यांच्याशी लगेच संपर्क साधला. त्यावेळी ते सीमेलगतच्या उडी, कुपवाडा भागात प्रवासात होते. वर्धिनीकडे उपलब्ध असलेल्या निधीची तेथील कामात आवश्यकता आहे का? असे विचारता येणाऱ्या लक्ष्मीचा अनादर कोणी करेल का? असे दिलखुलास उत्तर त्यांनी दिले व नुसते पैसे न पाठवता वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी काश्मीरला प्रत्यक्ष येऊन येथील सेवाकार्य पहावे, असा आग्रह धरला.

जयदेवजींच्या आग्रहाचा मान राखून वर्धिनीचे श्री. ज्ञानेश पुरंदरे व अजीत नाईक हे दि. २ डिसेंबर ते ११ डिसेंबर या कालावधीत जम्मू-काश्मीरचा प्रवास करुन आले. या संपर्क दौऱ्यातील काही अनुभव त्यांच्याच शब्दात :

* दि. ५ डिसेंबरला पहाटे जयदेवजी, सुदेशजी व सेवाभारतीचे महामंत्री श्री. अजय शर्मा यांच्याबरोबर राजौरी-पूँछ या सीमावर्ती भागांकडे प्रवास सुरु झाला.

* अत्यंत बिकट अशा डोंगराळ घाट रस्त्याने प्रवास करीत सायंकाळच्या सुमारास पूँछला पोहोचलो.

* इतकी वर्षे वर्तमानपत्रांतील बातम्या वाचून सदैव दहशतग्रस्त गावे अशीच पूँछ-राजौरीबद्दल मनात पक्की प्रतिमा होती. त्यामुळे या सीमावर्ती गावांमध्ये संघाचे काही कार्य चालू असेल अशी कल्पनाच नव्हती. तेथे असे वातावरण असतानाही



१५ संघशाखा नियमित चालतात असे कळल्यावर आश्चर्याचा सुखद धक्का बसला.

१) वर्धिनीच्या आपत्ती निधीचा उपयोग तात्पुरती मदत साधने खरेदी करण्यासाठी न करता त्या पैशांतून तीन संगणक खरेदी करुन ते लगामा गावातील लोकांसाठीच्या संगणक शिक्षणासाठी द्यावेत, असा प्रस्ताव चर्चेतून पुढे आला. उडी भागातील सीमावर्ती अशा या लगामा गावात भूकंपाने प्रचंड नुकसान केले. तेथील तरुण-तरुणींना संगणक शिक्षणासाठी लांब बारामुल्लाला जावे लागते, जे वेळ खाऊ व असुरक्षिततही आहे; त्यामुळे गावामध्येच संगणक शिक्षण केंद्र होणे हे त्यांच्यादृष्टीने सोयीचे व आवश्यकही आहे. योजना निश्चित होताच लगेच पी-३ दर्जाचे तीन संगणक खरेदी करुन ते लगामाला पाठविण्यात आले.

२) भूकंपामुळे पूँछ शहर व आसपासच्या गावात मिळून एकूण ४०० घरे पूर्णत: पडली व बाकी सर्वच घरांमध्ये कमीअधिक प्रमाणात तडे गेले आहेत. भूकंपानंतर

आपल्या समाजातील बांधवांना दु:ख आणि दैन्याच्या खोल गर्तेतून वर काढण्याकरिता
केवळ करूणा, दया किंवा दानाची वृत्ती पुरेशी होणार नाही.

लोकरीच्या बाहुल्या करायला शिकवणे, सर्वांकरिता खेळ घेणे व बालवाडीचे वर्ग सजविणे ही कामे केली. ❁ मुलांकरिता व मुलींकरिता सायंशाखा स्थिरपणे चालावी याकरिता प्रयत्न केले. ❁ वस्तीमध्ये धर्मांतराच्या उद्देशाने आलेल्या विदेशी ख्रिस्ती धर्मप्रचारकांना तसे न करण्याबाबत समजावले.

**मदत कार्यातील जाणवलेल्या काही विशेष गोष्टी :-** ▢ संघाने एक हजार निवास स्थाने अत्यंत त्वरेने उभी केली. ▢ रामकृष्ण मिशनने मच्छिमारांकरिता ऐंशी फायबर बोटी त्वरीत उपलब्ध करून देण्याचे स्तुत्य कार्य केले. ▢ वर उल्लेखिलेल्या अनेक कामांत वर्धकांच्या जोडीने गावातल्या सर्व लहान मुलांनी खूप साह्य केले. ▢ वर्धिनीच्या युवतींमार्फत घरोघरी चुलीपर्यंत संपर्क साधला गेला आणि गावातील अनेक महिलांचे या युवतींशी कायमचे स्नेहसंबंध जोडले गेले.

ज्यांनी आपल्या कामाने वर्धकांना प्रेरणा दिली अशांचा निर्देश करणे खूप आवश्यक आहे.

❁ सर्वश्री केशवजी, नागराजजी, शिवरामजी हे संघ प्रचारक अखंड कार्यरत होते.

❁ श्री. ए. एम. पौंडियन यांनी एकट्याने सत्तर प्रेते शोधून त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले.

❁ श्री. राजेंद्रजी वासवाना आपला व्यवसाय कुटुंबीयांवर सोपवून पूर्णवेळ कामासाठी आले. ❁ तिरूपती हा छंद-फंद असलेला तरूण इथे कामाकरता आला आणि पूर्ण व्यसनमुक्त होऊन सेवाकार्यात मग्न झाला.

❁ त्रिची तालुका कार्यवाह ॲडव्होकेट श्री. गणेशकुमार सर्व सोडून येथे येऊन राहिले आणि त्यांनी दिवसरात्र प्रकल्प प्रमुखाची जबाबदारी पार पाडली.

❁ उटी येथील आपल्या शेकडो चहाच्या मळ्यांचा कारभार दुसऱ्यावर सोपवून श्री. जयगणेश येथे सहप्रकल्प प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

❁ श्री. मडीवेल नोकरीतून महिनाभर रजा काढून येथे कार्यरत आहेत.

❁ साठ वर्षांचे नानाजी श्री. शणमुखनाथन् हे रोज सायकलवरून येथे येतात आणि कोठी व्यवस्थापकाचे काम तत्परतेने करतात.

❁ तिरूचिरापल्लीचे उद्योजक श्री. अर्जुनम् आपला सर्व व्याप सोडून येथील भोजन व्यवस्था सांभाळतात.

❁ पलनीले, मणी, शिवनंदम् यांनी सर्व वर्धकांना आग्रहाने घरी जेवायला नेले.

❁ सागरकन्या श्री श्री माँ आनंदमयी अक्करपेटे येथील मंदिरात रात्री दोन वाजेपर्यंत सर्व आपद्ग्रस्तांना दर्शन, प्रसाद व तांदुळाची एकेक पिशवी भेट देत होत्या.

❁ या सगळ्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या आघाडीवर मात्र उदासीनता होती.

### अस्वस्थ हिमगिरी

वर्धिनीच्या साप्ताहिक बैठकीत श्री अविनाशराव जोशी यांनी वाचलेल्या एका लेखाबद्दल माहिती दिली. या लेखात लेखकाने व्यथा व्यक्त केली होती की भारतात कोठेही आपत्ती कोसळली की सारा देश प्रांत मदतीला धावतो; मग काश्मीरच्या भूकंपाबाबतच सारे एवढे उदासीन का आहेत ?

या विषयावरून झालेल्या चर्चेत वर्धिनीकडे आपद्ग्रस्त सेवानिधीत शिल्लक असलेल्या निधीचा उपयोग जम्मू-काश्मीरमधील भूकंपग्रस्तांसाठी करावा असे सर्वांचे मत झाले. जम्मू-काश्मीर प्रांताचे सेवाभारतीचे प्रमुख

समाजाच्या सुखाची इच्छा मनात बाळगून आपले सर्वस्व त्याच्या सेवेत अर्पण केले पाहिजे.

श्री. जयदेवजी यांच्याशी लगेच संपर्क साधला. त्यावेळी ते सीमेलगतच्या उडी, कुपवाडा भागात प्रवासात होते. वर्धिनीकडे उपलब्ध असलेल्या निधीची तेथील कामात आवश्यकता आहे का? असे विचारता येणाऱ्या लक्ष्मीचा अनादर कोणी करेल का? असे दिलखुलास उत्तर त्यांनी दिले व नुसते पैसे न पाठवता वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी काश्मीरला प्रत्यक्ष येऊन येथील सेवाकार्य पहावे, असा आग्रह धरला. जयदेवजींच्या आग्रहाचा मान राखून वर्धिनीचे श्री. ज्ञानेश पुरंदरे व अजीत नाईक हे दि. २ डिसेंबर ते ११ डिसेंबर या कालावधीत जम्मू-काश्मीरचा प्रवास करुन आले. या संपर्क दौऱ्यातील काही अनुभव त्यांच्याच शब्दात :

* दि. ५ डिसेंबरला पहाटे जयदेवजी, सुदेशजी व सेवाभारतीचे महामंत्री श्री. अजय शर्मा यांच्याबरोबर राजौरी-पूँछ या सीमावर्ती भागांकडे प्रवास सुरु झाला.

* अत्यंत बिकट अशा डोंगराळ घाट रस्त्याने प्रवास करीत सायंकाळच्या सुमारास पूँछला पोहोचलो.

* इतकी वर्षे वर्तमानपत्रांतील बातम्या वाचून सदैव दहशतग्रस्त गावे अशीच पूँछ-राजौरीबद्दल मनात पक्की प्रतिमा होती. त्यामुळे या सीमावर्ती गावांमध्ये संघाचे काही कार्य चालू असेल अशी कल्पनाच नव्हती. तेथे असे वातावरण असतानाही १५ संघशाखा नियमित चालतात असे कळल्यावर आश्चर्याचा सुखद धक्का बसला.



१) वर्धिनीच्या आपत्ती निधीचा उपयोग तात्पुरती मदत साधने खरेदी करण्यासाठी न करता त्या पैशांतून तीन संगणक खरेदी करुन ते लगामा गावातील लोकांसाठीच्या संगणक शिक्षणासाठी द्यावेत, असा प्रस्ताव चर्चेतून पुढे आला. उडी भागातील सीमावर्ती अशा या लगामा गावात भूकंपाने प्रचंड नुकसान केले. तेथील तरुण-तरुणींना संगणक शिक्षणासाठी लांब बारामुल्लाला जावे लागते, जे वेळ खाऊ व असुरक्षितही आहे; त्यामुळे गावामध्येच संगणक शिक्षण केंद्र होणे हे त्यांच्यादृष्टीने सोयीचे व आवश्यकही आहे. योजना निश्चित होताच लगेच पी-३ दर्जाचे तीन संगणक खरेदी करुन ते लगामाला पाठविण्यात आले.

२) भूकंपामुळे पूँछ शहर व आसपासच्या गावात मिळून एकूण ४०० घरे पूर्णत: पडली व बाकी सर्वच घरांमध्ये कमीअधिक प्रमाणात तडे गेले आहेत. भूकंपानंतर

आपल्या समाजातील बांधवांना दु:ख आणि दैन्याच्या खोल गर्तेतून वर काढण्याकरिता
केवळ करूणा, दया किंवा दानाची वृत्ती पुरेशी होणार नाही.

लगेचच संघयंत्रणा कार्यान्वित झाली. जखमींवर उपचार, ढिगाऱ्याखाली अडकले त्यांची सुटका, बेघरांची तंबू-राहूट्यांमध्ये निवास व्यवस्था, सर्वांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था इत्यादी कामे स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे केली.

३) सेवाभारतीने भूकंपपीडितांना सुमारे १२०० ब्लँकेट्स तातडीने पुरविली.

४) दीर्घकालीन योजनांमध्ये प्रत्येक गावी अथवा तालुकास्थानी स्थानिक लोकांकडून जमीन संपादन करुन त्यावर स्थायी स्वरुपात सेवा-संस्कार केंद्र बांधून त्याअंतर्गत विविध विकास योजना राबवाव्यात या दिशेने सेवाभरतीचे काम चालू आहे.

५) वरील योजनेनिमित्ताने आमचा मंगनाड, जलास, दरादुरी या गावांमध्ये प्रवास झाला.

६) जम्मूला परतताना स्वर्णकोट जिल्ह्यातील धुंधक गावातील महाकाली मंदिरात आम्ही दर्शनार्थ थांबलो. तेथील महंत श्री. काग भेषंडी हे मंदिराशेजारील नदीकाठावर एका भिंतीच्या आडोशाने हवन करीत बसले होते. त्यांना भिंतीचा आडोसा घेण्याचे कारण विचारले असता त्यांनी मंदिराच्या नदीकडील भिंतीवर पाकिस्तानी भागांतून बरसलेल्या बंदुकीच्या गोळ्यांच्या निशाण्या दाखविल्या. सर्वत्र भिंतीचे टवके उडालेले होते. नंतर महंतांनी आम्हाला काही फोटो दाखवले. ते पाहून आमच्या अंगावर काटा उभा राहिला. चार वर्षांपूर्वी हे स्थान सोडून द्यावे यासाठी महंताचे गुरू नरोत्तमरासजी व त्यांचे गुरुबंधू यांना अतिरेक्यांचेकडून सारख्या धमक्या येत होत्या. पण या धमक्यांना भीक न घालता गुरुजींनी हे कालीमातेचे स्थान पक्के ठेवले. अतिरेक्यांनी त्यांची शिरे कापून धडावेगळी केली व मुख्य रस्त्यावर आणून ठेवली. दोघांची धडे नदीपात्रात फेकून दिली. या दोघा गुरुंच्या हत्येनंतर आत्ताचे महंत श्री. काग भूषंडी यांनी सेवा चालू ठेवली आहे, कारण अमरनाथ यात्रेतील हे स्थान महत्वपूर्ण आहे.

७) पूँछ व अन्य स्थानांवरील निर्माणाधीन सेवा-संस्कार केंद्रांमध्ये संगणकांची आवश्यकता आहे, जी पुण्यातील संगणक क्षेत्रातील कार्यकर्ते पूर्ण करु शकतील.

एक पाकिस्तानी नागरिक छोट्या मुलासह सीमा खुली केलेल्या मार्गाने भारतात प्रवेश करु पहात होता. पण तत्काळ पाक सैनिकांनी त्याला पकडून मारहाण केली. तेथे उपस्थित असलेल्या भारतीय लष्करी अधिकाऱ्याने त्याची मारहाण थांबवून त्या व्यक्तीस भारतप्रवेशाचे कारण विचारले. तो गृहस्थ म्हणाला की हिंदुस्थानच्या पवित्र धरतीवर एकदातरी नमाज पढायला मिळावा, ही त्याची खूप वर्षांपासूनची इच्छा आहे. भारतीय अधिकाऱ्याने त्याला संमती दिली. तो पाकव्याप्त भागातून भारतीय हद्दीत आला व सतरंजी अंथरुन शांतपणे नमाज पढू लागला. नंतर त्याने तिथली पवित्र माती आपल्या कपाळाला लावली व प्रेमभराने त्या मातीचे चुंबन घेतले. तो पाकिस्तानी हद्दीत परतताच तेथील सैनिकांनी त्याच्या हातातील माती हिसकावून त्याला मारहाणीस सुरुवात केली. हे पाहून उपस्थित पाकिस्तानी नागरिकांनी पाक लष्कराचा निषेध करत 'पाकिस्तान मुर्दाबाद, इंडियन आर्मी झिंदाबाद, हिंदुस्थान झिंदाबाद' अशा जोरदार घोषणा दिल्या.

समाजसेवा केली पाहिजे. समाजाचे सारे घटक समान आहेत व सारे सेवेस पात्र आहेत.

# साद पूर्वांचलाची

✍ कु. दीपाली पवार

**कु. दीपाली पवार आणि कु. लता टिळेकर या युवती कार्यकर्त्या ज्ञान प्रबोधिनीने आयोजित केलेल्या पूर्वांचल अभ्यास दौऱ्यात, गटप्रमुख म्हणून सहभागी झाल्या. या अभ्यास दौऱ्यातील त्यांचे अनुभव...**

ईशान्येकडील सप्तभगिनी म्हणून ओळखली जाणारी आसाम, मेघालय, अरूणाचल, नागालँड, मिझोराम, मणिपूर व त्रिपुरा ही राज्ये आपल्या वांशिक-सांस्कृतिक भिन्नतेमुळे वेगळी आहेत. गेली कित्येक वर्षे अशांततेने तापलेली, अतिरेक्यांच्या कारवायांनी धोकादायक वाटणारी ही राज्ये दुर्गमतेमुळे, विकासापासून वंचित राहिलेली आहेत. या व अशा अनेक कारणांनी भारताच्या मुख्य भूमीशी ज्यांचे भावनिक नाते जुळलेले नाही, ते या प्रांतातील आपले सारे देशबांधव नेमके कशा अवस्थेत राहत आहेत, हे जाणून घेण्यासाठी खरं तर आम्ही या दौऱ्यात असंख्य प्रश्न मनांत घेऊन सामील झालो.



पुणे ते हावडा एक्सप्रेसने कोलकत्यात पोहचलो. बेलूर मठात प्रवेश घेतल्याक्षणी पावित्र्यतेचा अनुपम अनुभव आला. नंतर आसामच्या दिशेने प्रवास सुरू झाला. नजर जाईल तिथपर्यंत हिरव्या रंगाच्या अनंत छटा, झाडांतून डोकावणारी बांबूची घरे, गाडी पाहून टाटा करणारी, गोबऱ्या गोबऱ्या गालाची मुले ठिकठिकाणी भेटत होती. गुवाहाटीतून तेजपूरला आलो. तेजपूरला जाण्यासाठी ब्रह्मपुत्रा ओलांडावी लागते.

तेजपूरहून मुख्य प्रवास सुरू झाला. आम्ही आता अरुणाचलात प्रवेश करणार होतो. भालुकपोंगला आल्यावर अरुणाचलचे प्रवेशद्वार दिसते. आर्किडचे ५०० पेक्षा जास्त प्रकार एकट्या अरुणाचलात सापडतात. अरुणाचलचा सुमारे ६०% भाग सदाहरित अरण्याने व्यापलेला आहे. खोल दऱ्या, गगनचुंबी हिमशिखरे, असंख्य फुलांनी बहरलेली झाडे, खळखळत-फेसाळत निघालेल्या नद्या, दरीकडे झेपावणारे धबधबे अरुणाचलच्या प्रवासात सर्वत्र आढळतात. निसर्गसौंदर्याचा मुक्त अविष्कार आपणास येथे दिसतो.

बोमदिल्याकडे जाताना वाटेत ठिकठिकाणी 'Beware

राष्ट्र ही सांस्कृतिक जीवनाच्या एकतेची अभिव्यक्ती आहे.

of Elephants' अशा पाट्या दिसतात. वाटेतच टैंगा गाव लागते. इथे 'जंगी पलटण'चा मोठा कँप आहे. हा भाग आजही दुर्गम आहे. येथे बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनने रस्ता बांधण्यास सुरूवात केली. वेळोवेळी होणारे अपघात पाहता कितीही अडचणी/संकटे आली तरी त्यांची पर्वा न करता धैर्याने काम करू असा निश्चय प्रकट करणारे 'फिकर नॉट फोर्टीन'चे बोर्ड वाचून डोळ्यांत पाणी येते. सेला येथे आपण १३,७०० फूटावरील तवांग जिल्ह्याच्या सीमेवर पोहोचतो. हा खिंडीतला रस्ता जगातला दुसऱ्या क्रमांकाच्या उंचीवरचा रस्ता आहे. पुढे जसवंतगड लागतो. जसवंतगड म्हणजे बहादूर जवानांनी देशाच्या संरक्षणासाठी केलेल्या अद्भुत धाडसाचा व बलिदानाचा साक्षीदार आहे. आज हा परिसर अनेक जवानांचे प्रेरणास्थान आहे. येथे जसवंतसिंहांचे मंदिर बनवले आहे. त्यांच्या पुतळ्याची रोज पूजा होते. तवांग अतिशय स्वच्छ, प्रदूषणविरहित असल्याचे जाणवले. तवांगमध्ये आम्ही मंजूश्री विद्यालयात पोहोचलो. तेथील छोट्या बच्चे कंपनीने आमचे स्वागत केले.

दुसऱ्या दिवशी आम्ही तवांग दर्शनासाठी बाहेर पडलो. सर्वप्रथम पहिला बौद्ध मठ. तवांगचा हा मठ आशिया खंडातील दुसऱ्या क्रमांकाचा मोठा मठ. गौतम बुद्धांची २६ फूट उंचीची प्रचंड मूर्ती आपले लक्ष वेधून घेते. चारी बाजूने भिंतीवर धार्मिक चित्रे रेखाटलेली दिसतात. येथे बौद्ध धर्मग्रंथांचा एक खजिनाच आहे. इथले गंभीर वातावरण मनावर वेगळाच परिणाम करते. तवांग बौद्ध मठातून बाहेर आल्यावर समोरील दरीतले दृश्य, इथली शांतता, स्वतःशी संवाद साधण्यास भाग पाडते.

दोन्ही बाजूंच्या बर्फाच्छादित रस्त्यातूनच आपला प्रवास सुरु होतो. सर्वत्र धवल, शुभ्र बर्फ यांतून मार्ग काढताना निसर्गातील आनंद आपण घेत असतो. मात्र वाटेत लागणारे जवानांचे तळ अस्वस्थ करुन सोडतात. इतक्या दूर आपल्या घरापासून देशाच्या सीमेचे संरक्षण करणाऱ्या जवानांना पाहिल्यावर हात नकळत जोडले जातात.

माझ्या मनात आले 'पुण्यात कामाची प्रेरणा कशी जागी ठेवायची यावर अनेक व्याख्याने ऐकली, आता नुसते या जवानांचे स्मरण केले, तरी मनातील मळभ दूर होईल'.

तवांगमधील मंजूश्री विद्यालयाचे लामा सर स्वतःचे शिक्षण पूर्ण करुन नंतर लामा झाले. मात्र त्यानंतरही मनातील अस्वस्थता दूर झाली नाही. माझ्या शिक्षणाचा, माझा उपयोग समाजासाठी झाला पाहिजे ही तळमळ त्यांना स्वस्थ बसू देईना. तवांगमध्ये त्यांनी मंजूश्री विद्यालयाचे काम सुरु केले. मोंग्या समाजातील अनाथ मुलांचे वसतिगृह सुरु केले. अतिशय अद्ययावत वसतिगृह, तेथील स्वच्छता, टापटीप, आदरातिथ्य पाहून आपण त्यांच्यापुढे नतमस्तक होतो. या मुलांना लामा सरांनी भरभरुन प्रेम दिले आहे. ही मुलेही दोन दिवसांत आमची कधी झाली कळले नाही. त्यांची भाषा आम्हांला कळत नव्हती. आमची भाषा त्यांना कळत नव्हती. मात्र डोळ्यांतून पाझरणारे प्रेम शब्दांत कशाला व्यक्त करायचे ? ते त्या छोट्या मुलांच्या स्पर्शातून जाणवत होते. मंजूश्री विद्यालयात आम्ही घालवलेला वेळ आयुष्यात कधीच विसरणार नाही.

आपले राष्ट्र शक्तिशाली नव्हते म्हणूनच परकीयांनी आपले राज्य येथे प्रस्थापित केले.

तेजपूरला परतल्यानंतर आम्हाला मैत्री शिबिरे घेण्यासाठी सेजुसाला जायचे होते. सेजुसा अरुणाचल व आसामच्या सीमेवर आहे. या ठिकाणी विवेकानंद केंद्राचे अनेक उपक्रम, शाळा चालतात. मात्र आम्ही तेथे पोहोचल्यावर, सुट्टीचा कालावधी असल्याने शाळेत मुले नव्हती. मग शिबिरे घ्यायची कोणाची ? असा प्रश्न पडला. मात्र तिथे काम करणाऱ्या श्रीमती वासवी दिदींनी आमची चिंता पटकन सोडवली. पुढील तीन दिवसांचा कार्यक्रम त्यांनी ठरवला. आसाम, अरुणाचलाच्या सीमेवर असलेले सेजुसा जसे निसर्गाच्या विविधतेने नटलेले आहे, तसे तिथे अनेक जनजाती आहेत असे त्यांनी सांगितले. मुख्यत: 'निशी' जमातीचा प्रभाव असलेले गाव. श्रीमती वासवी दिदी या मूळ दक्षिण भारतातल्या.

रात्री प्रचंड पाऊस पडत असतानाही त्यांनी कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन आमची सर्व व्यवस्था केली, हे आम्हांला सकाळी उठल्यावरच समजले. त्या रात्री गावबुढयाचे (सरपंच) निधन झाले. त्यामुळे आणखी एक समस्या समोर उभी राहिली. निधन होण्यापूर्वी गावबुढ्याने धर्म बदलला होता. मात्र त्याच्या घरी मंत्रपठणही चालू होते आणि इतर विधी ख्रिश्चन धर्माप्रमाणेही चालू होते. हे सर्व जवळून पाहता आले. तेथून पुढे आम्ही मेघादिदींच्या घरी गेलो. रामभैय्या व मेघादिदी हे निशी कुटुंब. त्यांनी आम्हाला सेजुसाची सर्व माहिती दिली. निशी जमातीला स्वत:ची लिपी होती. मात्र ती एका कुटुंबाकडे होती. ही लिपी हरणाच्या कातड्यावर लिहिलेली होती. त्या कुटुंबातील गरोदर स्त्रीने ते हरणाचे कातडे खाल्ले व त्यामुळे लिपीही नष्ट झाली, अशा अनेक कथा सांगितल्या. निशी सेजुसातील पाक्के नदीला आम्ही भेट दिली. ही नदी दर पावसाळ्यात मार्ग बदलते. नदीने रस्ता बदलला की सारे गावच्या गाव त्याभोवती पुन्हा आपले आयुष्य सुरु करते. हे सारे पाहून आश्चर्य वाटले. या साऱ्या संकटांना हे लोक हसतहसत तोंड देतात.

सेजुसा हे आसाम व अरुणाचलाच्या सीमेवर असल्याने येथे बोडोवस्तीही आहे. त्या वस्तीला भेट दिली. एक प्रसंग सांगावासा वाटतोय. हा भाग अतिशय संवेदनाशील आहे. येथे काम करणाऱ्या वासवी दिदींनी सुरवातीला सकाळी बाहेर पडतांना निशी लोकांचा पोशाख परिधान केलेला होता. निशीवस्तीतून निघाल्यावर बोडोवस्तीत जातांना त्यांनी लगेचच पोशाख बदलून बोडो महिलेप्रमाणे पोशाख धारण केला. हे इतके पटापट व सहज, की मी थक्कच झाले. लोकांमध्ये काम करायचे



एखाद्या समाजाच्या ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जेव्हा एकत्र असतात तेव्हा ते राष्ट्र मानले जाते.

तर, त्यांची मनेही जिंकण्यासाठी काय काय ध्यानात ठेवावे लागते हे प्रत्यक्ष अनुभवायला मिळाले.

तिसऱ्या दिवशी आम्ही तेथील विभागीय वनअधिकारी श्री. ताना तापी यांच्याबरोबर 'पक्के फॉरेस्ट'मध्ये भ्रमण केले. हे जंगल अतिशय घनदाट आहे. किर्र झाडी. पक्षी, प्राण्यांचे विविध आवाज हा अनुभव प्रथमच घेतला. जंगलातून जातांना प्रत्येक पावलागणिक प्रचंड जळवा होत्या. सुरवातीला जंगलाचे निरीक्षण करण्यापेक्षा पायावर, कपड्यांवर जळवा चिकटत नाहीत ना याकडेच लक्ष होते. श्री. ताना तापी यांनी सांगितले जळवांकडे पाहू नका, काय होईल? थोडे रक्त वाहील. भीती वाटत होती पण नंतर सरावाचे झाले.

अशा प्रकारे सेजुसामध्ये मैत्री शिबिर घेतले नाही. मात्र सेजुसातील प्रत्येक घराघरात जाण्याची संधी मिळाली. सर्वांशी मैत्रीचे नाते जोडता आले. सेजुसातून निघतांना सकाळी सर्वजण आम्हाला सोडण्यासाठी आले होते. अगदी श्री. ताना तापीसुद्धा. त्यांच्याबरोबर त्यांचा छोटा हत्तीसुद्धा होता. तो दोन दिवस आमच्याबरोबर जंगलात सहप्रवासी होता.


'भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत' ही प्रतिज्ञा प्रत्यक्ष अनुभवली.

या संपूर्ण प्रवासात आम्हाला प्रत्येक ठिकाणी माणसातील विविधताही अनुभवायला मिळाली. संपूर्ण पूर्वांचलात विघातक कारवाया चालू आहेत. या बांधवांना आपल्यापासून तोडण्याचे कृत्य चालू आहे. ईशान्येकडील सातही राज्यांचे भारताच्या मुख्य भूमीशी भावनिक नाते अजूनही जुळलेले नाही. या दुराव्याला अनेक कारणे आहेत. दळणवळणाची अपुरी साधने, स्वातंत्र्यपूर्व काळात राजकारणी लोकांनी दिलेली आश्वासने, परकीय सत्तांची फूस, भारत सरकार आपल्याकडे लक्ष देत नाही अशी येथील जनतेची झालेली भावना या सर्व प्रश्नांचे निराकरण करण्यास अनेक कार्यकर्ते हातभार लावत आहेत.

या दौऱ्याच्या निमित्ताने हे सर्व प्रत्यक्ष अनुभवायला आले. मनात वेगळीच अस्वस्थता आली. मात्र या सर्व कार्यकर्त्यांना भेटून प्रेरणाही मिळाली.

**'जनांचा प्रवाहो इथे चाललेला,**
**सदा संस्कृतीच्या मुळापासूनी ।**
**पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या,**
**आम्ही भिन्न ना त्यांचियापासूनी ।**
**तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला,**
**तयांच्या सुखाचीच लाभो स्पृहा ।'**

वर्धिनीच्या प्रार्थनेतील हे कडवे संपूर्ण प्रवासात मनात घोळत राहिले.



**दूरदर्शनवर मुलाखतीचा कार्यक्रम**

सौ. बागेश्री पोंक्षे व कु. दीपाली पवार यांच्या त्सुनामीग्रस्त भागातील दौऱ्यानंतर, मुंबई-दूरदर्शनने ''आजचे पाहुणे'' या कार्यक्रमात दि. २ व ३ फेब्रुवारी रोजी त्यांची मुलाखत प्रक्षेपित केली.

आपले राष्ट्र सुदृढ असावे ते जगात वैभवसंपन्न व्हावे यासाठी आपण कार्य केले पाहिजे.


## परमपूजनीय श्रीगुरूजी सेवा पुरस्कार

'स्व'-रुपवर्धिनीचे संस्थापक स्वर्गीय किशाभाऊ पटवर्धन यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून रा. स्व. संघ जनकल्याण समिती - महाराष्ट्र प्रांत यांनी या वर्षासाठीचा परम पूजनीय श्री गुरूजी सेवा पुरस्कार 'स्व'-रुपवर्धिनीला प्रदान केला. ५ मार्च रोजी हा कार्यक्रम नागपूर येथे सरसंघचालक कुप्प. सी. सुदर्शन यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि रू. ५१,०००/- रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याच कार्यक्रमामध्ये वाङ्मय पुरस्काराने ज्येष्ठ कन्नड साहित्यिक श्री. एस. एल. भैरप्पा यांना, तर शौर्य पुरस्काराने लेफ्टनंट जनरल (निवृत्त) श्री. दत्तात्रय बळवंत शेकटकर यांना गौरवण्यात आले. 'स्व'-रुपवर्धिनीच्या वतीने सहकार्याध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या कार्यक्रमामध्ये वर्धिनीच्या बरोबरीने ज्यांचा सन्मान करण्यात आला, त्या दोन्ही ज्येष्ठ व्यक्तींची काही वैशिष्ट्ये नमूद करावीशी वाटतात. ज्येष्ठ साहित्यिक श्री. भैरप्पा यांनी देशाच्या पूर्वोत्तर सीमेवरील राज्यांमध्ये होत असलेल्या राष्ट्रविरोधी कारवायांचा परामर्श आपल्या भाषणामध्ये घेतला व ही समस्या मांडतानाच पूर्वोत्तर भागातील अशा अशांत प्रदेशामध्ये राष्ट्रभावना जागृत करण्याचे मौलिक काम करणाऱ्यांना सहाय्य म्हणून त्यांना मिळालेला रू.५१,०००/- चा पुरस्कार, त्यांनी जनकल्याण समितीकडे या कार्यक्रमातच सुपूर्द केला.

जनरल शेकटकर यांची शौर्यविषयक कारकीर्द तर अभिमान वाटावी अशी आहेच. याशिवाय काश्मीरमधील बाराशेहून अधिक अतिरेक्यांना शरण आणून शस्त्रे खाली ठेवायला आणि प्रसंगी त्यांना देशासाठी लष्कराच्या बाजूने लढण्यासाठी प्रेरणा देण्याची करामत त्यांनी करून दाखविली आहे. जनरल शेकटकर यांनी ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात असंख्य समाजमंदिरे बांधली, लोकसहभागातून सत्तर पूल बांधले, निवृत्तीनंतर पुणे विद्यापीठातील युद्धशास्त्रविषयक अध्यासनाची धुरा सांभाळणारा हा शूर योद्धा त्याच वेळी भटक्या विमुक्त जातींमधील मुलांच्या भवितव्यासाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्थेसाठी खूप काम करीत आहे.

वर्धिनीच्या कामाचा, विशेषत: कै. किशाभाऊंनी केलेल्या कामाचा या कार्यक्रमात भावपूर्ण शब्दात गौरव करण्यात आला.




चारित्र्यसंपन्न, निष्ठावान, सेवापरायण, सूत्रबद्ध व योजना आखून काम करणारे लोक मोठ्या प्रमाणात एकत्र आल्यावर सर्व समस्या सोडविण्यास किती अवकाश?

## मानपत्र

आदरणीय किशाभाऊ पटवर्धन, आपल्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन. आपणास 'परमपूजनीय श्रीगुरूजी सेवा पुरस्कार' प्रदान करतांना आम्हांला अतीव आनंद वाटतो.

बालपणीच आपण संघाचे स्वयंसेवक बनलात. आपल्याला परमपूजनीय डॉक्टरजींचा प्रेरणादायी सहवास मिळाला. देशभक्तीच्या प्रेरणेतून आपण, 'चले जाव'च्या आंदोलनात सहभागी झालात. देश विभाजनाच्या कालखंडात अंतर्मुख होऊन, आपण संघ प्रचारक बनलात. त्यानंतर 'शिक्षक' झालात. ज्ञानप्रबोधिनीच्या अभिनव शैक्षणिक प्रकल्पाकडे आपण आकृष्ट झालात. ज्ञानप्रबोधिनीचे जनसंपर्क अधिकारी म्हणून काम केलेत.

आणीबाणीच्या दमनचक्रात संघाने केलेल्या आंदोलनाने प्रभावित होऊन आपण पुन्हा एकदा संघ-कार्याकडे वळलात. 'पथका अंतिम लक्ष्य नही है, सिंहासन चढते जाना । सब समाजको लिये साथ में आगे है बढते जाना ।।' या आवाहनाला आपण प्रतिसाद दिलात आणि निवृत्तीनंतर आंतरराष्ट्रीय बालक वर्षात १९७९ मध्ये, आपण परिस्थितीने अगतिक झालेल्या, बुद्धिमान बाल-कुमारांच्या सर्वांगीण विकासाचे काम हाती घेतलेत.

स्व-रूपवर्धिनीच्या या कार्याला चेतनादायी अनौपचारिक शिक्षणप्रणालीच्या गंगोत्रीचे स्थान मिळवून दिलेत. पाचवीमधील बारा विद्यार्थ्यांनिशी सुरू केलेल्या, तीन तासांच्या या उपक्रमाचे बीज रूजले. ताप-शापांच्या ऋतुचक्रात ते विकसित झाले. समाजातील दातृत्वाच्या वर्षावाने त्याचे वृक्षरूप आकारले. 'स्व'-वास्तुतील विविध सेवाप्रकल्पांच्या रूपाने पारंब्याही त्याला फुटल्या. शैक्षणिक उपक्रमांसाठी व भावी विस्तारासाठी आपण समाजाच्या दातृत्वाने तीन कोटींचा निधी पंचवीस वर्षात उभा केलात. सहमतीने निर्णय करण्याच्या व समन्वयाच्या कार्यशैलीचा पाया घातलात. 'परम् वैभवं नेतुमेतद् स्वराष्ट्रम' याला अनुलक्षून सेवाकार्याचा अनुकरणीय आकृतीबंध घडवून आणलात. 'सेवा है यज्ञकुंड, समिधासम हम जले । ध्येय महासागरमें सरितारूप हम मिले' या धारणेने नि:स्वार्थ भावनेने सेवाकार्य करण्याचा आदर्श कार्यकर्त्यांच्या उगवत्या पिढीत रूजविलात. या वाटचालीत आपल्या सहधर्मचारिणी कै. सौ. लीलाताईंचाही वाटा होता. आपली सर्व स्थावर मालमत्ता समाजाच्या स्वाधीन केलीत. 'कार्यमग्नता जीवन व्हावे मृत्यू ही विश्रांती' हे ब्रीद सार्थ करीत आपण जगाचा निरोप घेतलात. आपल्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे गौरवपत्र.

शनिवार दि. ५ मार्च २००५

श्री किशोर बापट
अध्यक्ष

समाजबांधवांना दु:ख आणि दैन्याच्या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी
आजीवन सेवाभावाचे व्रत घेणे हाच श्रेष्ठतम उपाय आहे.

# वार्षिक कार्यक्रम वृत्त

वार्षिक कार्यक्रम

प्रतिवर्षी काही कार्यक्रम हे होतातच. दरवर्षी होणारे असले तरी प्रत्येक कार्यक्रमामध्ये काही नाविन्य असते, नवे अनुभव येतात, या निमित्ताने कार्यकर्त्यांचे प्रशिक्षणही होत असते. त्यामुळे अशा कार्यक्रमातून काम करण्यासाठी उर्जा मिळत रहाते.

## संक्रांत उत्सव

### बालवाडी व बालशाखा विभाग

उत्सव १६ जानेवारी रोजी झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध बालसाहित्यिक श्री दत्ता टोळ होते. बालवाडीच्या मुलामुलींनी सादर केलेल्या अभिनय गीतांनी वातावरण उत्साहपूर्ण होते. गाण्याच्या ठेक्यांवर उपस्थित पालकही डोलत होते, टाळ्या वाजवत होते. अथर्वशीर्ष, भगवद्गीतेतील अध्याय पाठ म्हणून दाखवून बालवाडीतल्या गटांनी सर्व उपस्थितांना आश्चर्यचकीत केले. बालशाखेच्या चमूने वीरश्रीयुक्त पोवाडा सादर केला. या प्रसंगी दोन विशेष सत्कार करण्यात आले. एक सत्कार होता गेली ८ ते १० वर्षे अत्यंत माफक किमतीत बालवाडीच्या विद्यार्थ्यांना गणवेश देण्याऱ्या सुपेकर टेलर्सचे श्री. संजय सुपेकर यांचा, तर दुसरा सत्कार होता, पंचाहत्तरीत प्रवेश केलेले वर्धिनीचे सुरक्षा रक्षक श्री. दत्तात्रय साटम यांचा. त्यांच्या सत्काराच्या वेळी उपस्थित पालकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना अभिवादन केले.




मुले अनुकरणातून शिकत असतात. शिक्षक, आईवडील, शेजारीपाजारी यांच्या जीवनाचा मुलांच्या संस्कारक्षम मनावर मोठा परिणाम होतो. याचे भान या सर्वांनी ठेवून आपले जीवन घडवावे.

**शाखा प्रकल्प विभाग**

उत्सव २३ जानेवारी रोजी झाला. दूरदर्शन-मुंबईचे संचालक श्री. मुकेश शर्मा हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तर ज्येष्ठ क्रीडामार्गदर्शक श्री.गोपाळराव फडके हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी सर्व शाखांनी नेत्रदीपक क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. गोपाळराव फडके यांनी कोणत्या वयात कोणत्या प्रकारचा व्यायाम करावा, किती करावा, आहार किती असावा या विषयी आपल्या स्वतःचे अनुभव सांगून मार्गदर्शन केले. दिनक्रम कसा असावा या विषयीसुद्धा त्यांनी मोलाचे अनुभव सर्वांसमोर ठेवले या प्रसंगी 'स्व'-रुपवर्धिनीचा १९८३ च्या तुकडीतील विद्यार्थी चंद्रकांत भोसले याचा विशेष सत्कार करण्यात आला. कोरेगाव पार्क मधील ज्या अंधशाळेत चंद्रकांत शिकला, शिक्षक म्हणून नोकरीला लागला, त्याच शाळेत १ जानेवारी, २००५ पासून मुख्याध्यापक पदावर त्याची नियुक्ती झाली. त्याच्या सत्काराने कार्यक्रमाचे वातावरण भारावून गेले होते.



**वर्षारंभ उपासना कार्यक्रम -**

शनिवार दि.९ एप्रिल रोजी वर्षारंभ उपासनेचा कार्यक्रम नित्याप्रमाणे ओंकारेश्वर मंदिरात झाला. कार्यक्रमाला १४० युवक युवती व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. प्रबोधन सत्रासाठी वनवासी कल्याण आश्रमाचे क्षेत्रीय संघटन मंत्री श्री. सदाशिवराव देवधर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. आपला मित्र कोण तसेच आपला शत्रु कोण यातील विवेक

सांस्कृतिक कार्यक्रम याचा अर्थ आज निव्वळ नाचगाणी आणि माणसाच्या हीन प्रवृत्ती चाळविणारे कार्यक्रम असा झाला आहे. तो अयोग्य आहे.

हरवल्यामुळे भारताच्या इतिहासात कसे प्रसंग आले याची विविध उदारहरणे त्यांनी सर्वांसमोर मांडली. वर्षारंभ उपासनेचे महत्व विशद करताना एक मुद्दा त्यांनी सर्वांसमोर मांडला की या दिवशी आपल्याला "गेल्या एका वर्षात मी काही जबाबदारी घेऊन संघटनेचे काम केले की नाही, जबाबदारीला न्याय दिला की नाही, काम एकट्यानेच केले की या माध्यमातून कार्यकर्ते कामाला जोडले, माझ्यामुळे कोणी कामातून तुटले नाही ना?" अशा गोष्टींचा मागोवा घ्यायची संधी असते. अशा चिंतनातून आपल्या संघटना/संस्थांचे काम पुढे जाते. त्यांच्या मार्गदर्शनानंतर एकमेकांना नववर्षाच्या शुभेच्छा देऊन हा कार्यक्रम संपला.

**रक्तदान शिबिर व पाणपोई -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने प्रतिवर्षी दोन कार्यक्रम संपन्न होतात. यापैकी पाणपोईचे उद्‌घाटन 'स्व'रूपवर्धिनीचे विद्यार्थी श्री. चंद्रकांत भोसले यांच्या हस्ते झाले. उपस्थित वर्धक व कार्यकर्त्यांसमोर बोलताना त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या जीवनात आलेल्या विविध अडचणींचे प्रसंग सांगितले व या प्रत्येक प्रसंगी त्यांनी कसा विचार केला हे प्रभावीपणे मांडले. तसेच त्यांचे अपुरे कार्य पूर्ण करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे असे सांगितले. पाणपोईची सेवा एकूण सहा हजार नागरिकांना देता आली.

याच दिवशी संध्याकाळी रक्तदान शिबिर होते. अचानक आलेल्या वादळी पावसामुळे व त्यातच वीजही गेल्याने रक्तदान शिबिर होईल की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. परंतु शक्य ती सर्व पर्यायी व्यवस्था उभी करून पार पडलेल्या या रक्तदान शिबिरात ५८ जणांनी रक्तदान केले. जनकल्याण रक्तपेढीच्या साह्याने हा कार्यक्रम संपन्न झाला.

**स्वातंत्र्यादिन सोहळा** - या दिवशी खालीलप्रमाणे कार्यक्रम संपन्न झाले.

**❀ ध्वजवंदन**

सकाळी संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला युवक-युवती कार्यकर्ते, स्पर्धापरीक्षा केंद्रातील विद्यार्थी, बालवाडी शिक्षिका व बालवाडीच्या मोठ्या गटातील विद्यार्थी उपस्थित होते. ध्वजवंदनानंतर कार्यकर्त्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले तर बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी घोषणा दिल्या.

**❀ शाखांतर्गत स्पर्धा** - या निमित्ताने क्रीडास्पर्धा तसेच निबंध व नाट्यछटा स्पर्धा घेण्यात आल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना कार्याध्यक्ष श्री पुरूषोत्तमभाई श्रॉफ यांनी शाबासकी दिली.

**❀ देशभक्ती अशी करू या !**

दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी शाखांतर्गत स्पर्धानंतर एका प्रबोधन सभेचे आयोजन केले जाते. या वर्षी या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून ॲड. श्री. अनिरूद्ध रजपूत हे उपस्थित होते. शाखांतर्गत स्पर्धेत बक्षिस मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करीत त्यांनी देशाचे स्वातंत्र्य ज्या हजारो ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांमुळे

विद्यार्थ्यांच्या घडणीच्या काळात त्यांच्या मनावर किमान एवढे तरी बिंबवलेच पाहिजे की, कर्तव्य हेच सर्वश्रेष्ठ असते.

मिळाले त्यांच्या पराक्रमी इतिहासाचे स्मरण सर्वांना करून दिले. विशेषतः बंगालची फाळणी करण्याची घोषणा लॉर्ड कर्झन याने २० जुलै १९०५ रोजी केल्यानंतर संपूर्ण बंगालमध्ये त्यावर उमटलेली प्रतिक्रिया व या घटनेचे देशाच्या विविध प्रांतात उमटलेले पडसाद हा भारावून टाकणारा इतिहास त्यांनी सर्वांसमोर मांडला. कोवळ्या वयातील किशोरांनी वेताचे फटके, 'रुलर' चे फटके खाऊनही वंदेमातरम् चा घोष कसा केला, 'वंदेमातरम्' हे शब्द वेदमंत्र कसे बनले याचा रोमांचकारी इतिहास श्री. रजपूत यांनी सर्वांसमोर ठेवला. वंगभंग विरोधी आंदोलनाच्या निमित्ताने 'स्वदेशी' या विषयाचे महत्त्व लोकमान्य टिळकांनी कसे प्रभावीपणे समाजाच्या मनात उतरवले व या सगळ्याची परिणीती १९११ साली बंगालची फाळणी रद्द होण्यात कशी झाली हा इतिहास खरोखरीच प्रेरणादायी आहे हे सर्वांना जाणवले. वंगभंग विरोधी आंदोलनाला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या या टप्प्यावर या इतिहासातून स्वतंत्र भारतातील आपण काय प्रेरणा घ्यायची हे सांगताना त्यांनी एक मौलिक विचार सर्वांसमोर ठेवला. ज्या देशभक्तांमुळे, क्रांतिकारकांमुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले तो आपला 'स्वतंत्र भारत' 'समर्थ' करण्यासाठी आपण सर्वांनी आपले प्रत्येक काम १००% कष्ट घेऊन केले पाहिजे असे त्यांनी या प्रसंगी सर्वांना सांगितले.

### आणि ते रुग्णालयातून थेट वर्धिनीतच आले...

जळगाव येथील लेहरी पेंट हाऊस या दुकानाचे मालक श्री. सैफुद्दिन लेहरी हे त्यांच्या आजारावरील उपचारासाठी पुण्यातील एका रुग्णालयात आले होते. डॉक्टरांनी तपासणीला आत बोलावण्यापूर्वी तेथील स्वागतकक्षामध्ये थोडा वेळ त्यांना थांबावे लागले होते. याच वेळात वर्धिनीचे २००४ चे कार्यवृत्त त्यांच्या हाती पडले. हे वृत्त वाचत असताना कारगिल युद्ध प्रसंगावरील ''माँ मै फिर आऊँगा'' या कवितेने त्यांना भारावून टाकले. ही कविता वाचल्यावर त्यांना अश्रू आवरता येईनात. तशाच स्थितीत त्यांनी अंकातील दूरध्वनी क्रमांक पाहून वर्धिनीत दूरध्वनी केला व वर्धिनीचे काम मला पहायला मिळेल का, अशी विचारणा केली. रुग्णालयातील काम संपल्यावर धावत पळत वर्धिनीत पोहोचले. वर्धिनीच्या कामाचा परिचय करून घेतला. मासिक कार्यवृत्ताचे सभासदत्व स्वीकारून एक छोटी देणगीही दिली. वर्धिनी अतिशय मोलाचे काम करीत असून या कामाला जे काही सहाय्य करणे शक्य आहे ते मी नक्की करीन असे त्यांनी संस्थेच्या कार्यकर्त्यांना सांगितले.

प्रत्येक बालकाच्या आणि बालिकेच्या मनावर मातृभक्तीचे, देशभक्तीचे आणि देवभक्तीचे संस्कार करण्याची पवित्र जबाबदारी मातांची आहे.

## सार्वजनिक गणेशोत्सव



सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात विविध उपक्रम संपन्न होतात. श्री. गणेश मूर्ती प्रतिष्ठापनेच्या दिवशी व अनंत चतुर्दशीच्या मिरवणूकीत वर्धिनीची अनेक पथके सहभागी असतात. या निमित्ताने पुण्याबाहेरही नव्या नव्या ठिकाणी वर्धिनीची पथके आपल्या वादनाने मिरवणूकीत रंग भरतात. या वर्षीच्या उत्सवाच्या सहभागाचे वृत्त पुढीलप्रमाणे.

**श्री गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठा पूजा प्रशिक्षण वर्ग**

याही वर्षी या वर्गाचे आयोजन केले होते. सुमारे ४५ जणांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. दि. १ ते ४ सप्टेंबर या कालावधीत हा वर्ग झाला. वर्धिनीचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. रामभाऊ डिंबळे यांनी प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी प्रशिक्षणामागची वर्धिनीची व ज्ञानप्रबोधिनीची भूमिका स्पष्ट केली. पूजा करण्याचा, पूजा सांगण्याचा अधिकार, स्त्रियांनी पौरोहित्य करावे की नाही, संस्कृत भाषा या विषयासंबंधी समाजात दृढ असलेल्या धारणा व वस्तुस्थिती अतिशय स्पष्टपणे व विस्तृतपणे मांडली. त्यांच्या या विवेचनामुळे पहिल्या दिवशीच उपस्थितांच्या मनातील अनेक प्रश्नांचे समाधान झाले. उर्वरीत तीन दिवस सौ.आर्याताई जोशी यांनी प्रत्यक्ष पूजाविधीचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामुळे उपस्थित सर्वांनी लक्ष्मीपूजन, सत्यनारायण अशा पूजाविधींचेही प्रशिक्षण देण्याची विनंती केली. या वर्गा बद्दलच्या अभिमतातूनच या वर्गाचा उद्देश यशस्वी झाला असं जाणवले. उपस्थितांच्या अभिमतातील काहींच्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे होत्या-

* मनाला खूप आनंद मिळाला. आपण देखील पौरोहित्य करू शकतो असे वाटले. - **सौ.प्रतिभा मेढेकर**
* या प्रशिक्षण वर्गामुळे फक्त ब्राह्मण पूजा करू शकतात हे माझे मत बदलले. आता मी सुद्धा ही पूजा करू शकतो. - **श्रीहरी सुतार**
* उपक्रम अतिशय सुंदर आहे असेच मार्गदर्शन वेळोवेळी मिळो. - **सौ.विमल पाटील.**
* बऱ्याच वर्षांची मनात असलेली इच्छा आपल्यामुळे पूर्ण झाली. - **ओमप्रकाश दानवे**
* सर्वसामान्य लोकांना योग्य माहिती प्राप्त होण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त आहे. - **राजन सपकाळ**
* उपक्रम चांगला आहे. या वर्गामुळे चुका तर समजल्याच पण नवीन भरपूर काही समजले. **- राहुल सावरमाळे**
* सदर उपक्रम सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त वाटला. - **सुहास मदनाल**

### गणेशोत्सवातील विशेष प्रसंग

* भिवंडी येथील ब्राह्मणआळी सार्वजनिक गणेश मंडळाचे हे शताब्दी वर्ष होते. या वर्षीच्या या विशेष मिरवणूकीसाठी वर्धिनीचे ध्वजदल व वादक असे सुमारे

व्यक्तीची वैचारिक व मानसिक गुणवत्ता वाढविणे, जीवन मूल्यांविषयी यथार्थ दृष्टिकोन निर्माण करणे, भावनांवर व भाववेगांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता उत्पन्न करणे हे सांस्कृतिक कार्यक्रमाचे वास्तविक स्वरुप आहे.

८० जण भिवंडी येथे गेले होते. पथकाच्या कौशल्याला भिवंडीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

* मुख्य विसर्जन मिरवणूकीप्रमाणेच अन्य मिरवणूकांमध्येही वर्धिनीची पथके सहभागी होती. पारंपारिक खेळाबरोबरच काही प्रसंगाचे सादरीकरण विद्यार्थी सादर करीत होते. यातील दहीहंडी, क्रांतीकारक मंगल पांडे व चाफेकर बंधूंचे हौतात्म्य या विषयावरील सादर केलेल्या प्रकारांचे नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले. उत्स्फूर्तपणे विद्यार्थ्यांच्या हातात चॉकलेटस् बिस्किटांचे पूडे देऊन नागरिक त्यांचे कौतूक करीत होते.

* पाकोळी बालवाडीमधील मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी सहकारनगर, श्रीकृष्ण मंडळ, अमरज्योत मंडळ व सारसबाग गणेश मंदिर येथे अथर्वशीर्षाचे पठण केले.

* न्यायालयीन आदेशाचा मान राखून युवतींच्या ध्वजदलाने श्रीमंत दगडूशेट हलवाई गणपतीच्या विसर्जन मिरवणुकीत ढोल-ताशांशिवाय केवळ घोषणा व स्फूर्तीदायक गीतांच्या ठेक्यावर आपले सादरीकरण केले.

---

**विश्वबंधुत्व ........ जगाची गरज**

वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या जगप्रसिद्ध उंच इमारती अतिरेकी हल्ल्यात जमीनदोस्त होण्याच्या घटनेला अकरा सप्टेंबर रोजी चार वर्षे झाली. ही घटना जगात '९-११' या सांकेतिक नावाने ओळखली जाते. भविष्यात अशा घटना टाळायच्या असतील तर विश्वबंधुत्वाचा विचार पुनः रुजवावा लागेल. १८९३ साली याच दिवशी जगाने स्वामी विवेकानंदांच्या मुखातून 'बंधुत्वाचा' भारतीय विचार ऐकला होता आणि सारं विश्व रोमांचित झालं. जगभरात घडणाऱ्या हिंसाचाराच्या अतिरेकी घटना पाहिल्यावर स्वामीजींनी व्यक्त केलेल्या विचारांच जागरण आजच्या घडीला तर अधिकच गरजेचं झालं आहे हे जाणवतं. या विश्वबंधुत्व दिनाच्या निमित्ताने 'स्व'-रुपवर्धिनीने स्वामी विवेकानंदांच्या भव्य प्रतिमेची शोभायात्रा काढली होती. ही शोभायात्रा संपूर्ण मार्गावरच आकर्षण ठरली होती. ध्वजदल, टिपऱ्या, झांजा, घुंगरुकाठी घेऊन सुमारे ४५० विद्यार्थी ढोलताशांच्या ठेक्यावर अप्रतिम खेळ सादर करीत होते. या मिरवणूकीत वीर अभिमन्यू बालशाखेच्या विद्यार्थ्यांचे विविध महापुरुषांचे वेष परिधान करून व त्यांच्या विचारांचे फलक हातात धरले होते. त्यांचे हे पथक नागरिकांच्या कौतुकाचा विषय बनले होते तर मार्गावर काही ठिकाणी झांजांची पथके आणि ढोल-ताशा-वादकांची जुगलबंदी चांगलीच रंगली होती. रस्त्यावरून येणारे जाणारे व या परिसरात रहाणारे नागरिकही या जुगलबंदीचा आनंद उत्स्फूर्तपणे घेत होते. शनिवारवाडा - लालमहाल - फडके हौद - गावकोस मारूती असा प्रवास करीत ही यात्रा पारगे चौकात विसर्जित झाली. श्री. अमोल उंदरे यांनी या प्रसंगी समायोजित विचार सर्वांसमोर मांडले.

समाजजीवन निकोप राहील याची जबाबदारी घेणे हे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे.

## कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग

वर्धिनीच्या विविध विभागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते. यावर्षी झालेल्या दोन प्रशिक्षण वर्गाचा वृत्तांत -

**वर्ग क्र. १**

✳ श्री. विवेक पोंक्षे व श्री. शिरीष जोशी यांनी स्वतःची ओळख याविषयी सांगितले होते. या प्रशिक्षण वर्गात सर्वप्रथम श्री. विवेक कुलकर्णी यांनी या सत्रांचा आढावा घेतला. त्यानंतर जोहारी विंडो या तंत्राद्वारे स्वतःची कशी ओळख करून घ्यायची याविषयीचा एक खेळ त्यांनी घेतला. सर्वप्रथम कोणत्या विविध प्राणी-पक्षांच्या नावाने स्वतःची ओळख करून घ्यायला तुम्हाला आवडेल, असा खेळ घेऊन वेगवेगळ्या विशिष्ट गुणधर्मांचा विचार आपण कसा करतो, आपण खरंच तसे प्रत्यक्ष आहोत की तसे व्हावे असे आपल्याला वाटते आहे, याचा फक्त विचार होण्याची गरज आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

स्वतःचा शोध घेताना स्वतःचे कळलेले व्यक्तिमत्व हे कधीच पूर्णपणाने आपले आपल्याला आकलित झालेले नसते. त्यावर आपल्या मित्रांच्या मदतीचे प्रकाश टाकता येतो हे सांगणारे जोहारी तंत्र. त्याची त्यांनी थोडी उदाहरणे दिली. आपल्या उत्तम मित्राच्या साह्याने स्वतःला माहिती असलेले - त्याला माहिती असलेले, स्वतःचे गुणविशेष जे स्वतःला जाणवत नाहीत असे गुणविशेष, कस लागताना, विशिष्ट परिस्थितीत जाणवणारे, पूर्वी कधीच न जाणवलेले गुणविशेष, असा सविस्तर विचार करून त्या गुणविशेषांचे संवर्धन म्हणजे व्यक्तिमत्व विकसन अशी मांडणी त्यांनी केली.

✳ श्रीमती सुधाताई गोखले या अनेक रोगांनी जर्जर झालेल्या अशा वयस्कर महिलेने काश्मिरमधील अतिरेक्यांशी प्रत्यक्ष जाऊन भेट घेतली व त्यांना अशापद्धतीने अतिरेकी भूमिका का घ्यावी लागत आहे, त्यांची मानसिकता अशी का झाली असावी याचा अभ्यास केला. त्याचा थरारक वृत्तांत त्यांनी आपल्या सत्रात कथन केला.

**वर्ग क्र. २**

✳ हडपसर येथे राहणारी वर्धिनीची युवती कार्यकर्ती कु. डिंपल हायगुंडे हिने बी. एस. सी.च्या परीक्षेत ९०% गुण प्राप्त केले. तिच्या यशाचा वेध घेणारी एक मुलाखत या वर्गाच्या पहिल्या सत्रात सर्व युवक-युवतींनी घेतली. अभ्यासाचे उत्तम नियोजन, वर्षभर सातत्यपूर्ण अभ्यास, महाविद्यालयात पूर्णकाळ उपस्थिती, प्राध्यापकांशी विनम्र व आपुलकीचे वर्तन, छंद-आवडींसाठी राखून ठेवलेला वेळ, अशा सर्वांगीण कार्यक्रमांनी युक्त दिनक्रम विद्यार्थीजीवन समृद्ध आणि समाधानी बनवतो असे डिंपलताईने सांगितले.

✳ दुसऱ्या सत्रात मार्केटिंग क्षेत्राचा सविस्तर परिचय श्री. अरुण कुलकर्णी यांनी करून दिला. मार्केटिंगचे शास्त्र, या क्षेत्राची व्याप्ती व भविष्यातील संधींबाबत विविध उदाहरणांच्या माध्यमातून श्री. कुलकर्णी यांनी विषयाची मांडणी केली.

✳ शेवटच्या सत्रात सामाजिक कार्यकर्ते श्री. ताहीरभाई शेख यांनी आपले विचार मांडले. सर्व धर्मांची शिकवण, वेद-पुराणे-शास्त्रे- विविध दर्शने यांचे महत्त्व, भारताचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास, छत्रपती शिवरायांचे कार्य व आदर्श भारतासाठीचे संघटन या सुत्राचा त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात परामर्ष घेतला.

> विद्यार्थीदशेतच जडणघडण होत असते. या काळातच काटकसरीची राहणी, साधे संयमित जीवन, दुर्व्यसने आणि अपायकारक चैनबाजीकडे मनाला वळू न देणे, आदी बाबतीत खबरदारी घेतली पाहिजे.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

१३ ऑगस्ट २००५ रोजी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. संस्थेचे उपाध्यक्ष श्री. उदयराव गुजर सभेच्या अध्यक्षस्थानी होते. गेल्या संपूर्ण वर्षभरामध्ये वर्धिनीशी संबंधित ज्या व्यक्तींचे दुःखद निधन झाले तसेच पूर, भूकंप अशा नैसर्गिक आपत्तीत ज्या हजारो बांधवांचे दुःखद निधन झाले त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

वर्षभरातील कामकाजाचा आढावा सर्वांसमोर मांडण्यात आला. या प्रसंगी खालील विशेष निवेदने करण्यात आली.

- त्सुनामीग्रस्त बांधवांसाठी वर्धिनीच्या २० जणांच्या पथकाने नागपट्टणम येथे जाऊन केलेले मदत कार्य
- वर्धिनीने महिलांसाठी सुरु केलेले बचत गट, त्याला मिळणारा प्रतिसाद व सद्यस्थिती
- वर्धिनीचे संस्थापक कै. किशाभाऊ पटवर्धन सरांना जनकल्याण समितीने मरणोत्तर दिलेल्या 'श्री गुरुजी सेवा पुरस्कार' कार्यक्रमाचे वृत्त.
- कार्याध्यक्ष श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांनी चऱ्होली जमीन खरेदी संदर्भातील सद्यस्थिती सर्वांसमोर मांडली.

आर्थिक वर्ष २००४-०५ या आर्थिक वर्षातील आर्थिक चित्र सर्वांसमोर मांडण्यात आले. उपस्थित सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे समाधान केल्यानंतर ऑडिट रिपोर्टला मान्यता देणारा ठराव तसेच संस्थेचे ऑडिटर श्री जयंत चंद्रचुड यांच्या फेरनियुक्तीचा ठराव मंजूर करण्यात आला.

सभेचे अध्यक्ष श्री उदयराव गुजर यांनी बैठकीचा समारोप करताना वर्षभर झालेल्या प्रत्यक्ष कामाबद्दल तसेच आर्थिक विषयातील संभाळल्या जात असलेल्या शिस्तीबद्दल कौतुक केले. आपद्ग्रस्त बांधवांच्या केलेल्या सेवेचे मनापासून कौतुक करीत आगामी वर्षामध्ये 'आपत्ती व्यवस्थापन' या विषयाच्या संदर्भात प्रशिक्षण वर्धिनीने कार्यकर्त्यांना द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

**तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला . . . .**

वर्धिनीची प्रार्थना रोज म्हणणाऱ्या बालशाखेतील वर्धक वर्धिकांनी संक्रांत उत्सवात एक सुखद धक्का दिला. बालशाखेतील विद्यार्थी रंगमंचावर रांगेत उभे राहिले व त्यांनी उपस्थितांनाही विनंती केली की आपण सर्वजण उभे राहून सागरी भूकंपात जीव गमावलेल्या बांधवांना श्रद्धांजली वाहू या. श्रद्धांजली वाहिल्यावर या सर्वांनी एक शपथ घेतली व उपस्थितांना सहभागी करून घेतले... त्सुनामीग्रस्त बांधवांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याची शपथ ऐकताना "तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा" प्रार्थनेच्या या ओळींतील भाव मुलांनी आपल्या कृतीने जिवंत केला. बालशाखेच्या गटाने उत्सफूर्तपणे मदतनिधी गोळा केला. गोळा झालेली रक्कम रु. १६०८.७५ दैनिक सकाळकडे सुपूर्द करण्यात आली.

संस्था कशा चालवल्या जातात यापेक्षाही सर्वप्रथम शिक्षणाचे उद्दिष्ट आणि आशय, अध्यापकांच्या गुणवत्तेचा स्तर, देशातील एकूण वातावरण आदी गोष्टींचा विचार करुन मार्ग काढण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले पाहिजेत.

# शाखा विभागवृत्त

विभागशः वार्षिक वृत्त

## कार्यक्रम विविधा

वर्षभरात शाखांवर विविध प्रकारचे उपक्रम संपन्न झाले. त्यापैकी काही खालीलप्रमाणे होते.

### स्पर्धा

प्रश्नमंजुषा, शक्ती-बुद्धी, नाट्य सादरीकरण, पद्यमंजुषा, निबंधलेखन, शुद्धलेखन, पाढे पाठांतर, इंग्रजी शब्दांचा अर्थ शोधणे.

### वेगळे उपक्रम

- वारकरी बांधवांच्या मुलाखती, त्यांच्या समवेत अभंग गायन व भोजनाचा कार्यक्रम
- कै. किशाभाऊ पटवर्धन सरांच्या आठवणी (स्मृतिदिन कार्यक्रम)
- त्सुनामीग्रस्त बांधवांच्या सेवेतील अनुभव
- वंदेमातरम्‌चा इतिहास - ध्वनिफीत श्रवणाचा कार्यक्रम
- इंग्रजी शब्दांची सापशिडी,
- स्लाईड शो - सूर्यनमस्कार, स्वा. सावरकर जीवनदर्शन

* प्रत्येक विषयाचे २१ प्रश्न सोडविण्याचा यज्ञ
* स्मरण कौशल्य तंत्र-व्याख्यान (वक्त्या सौ. मेघा नगरे)
* वादविवाद विषय : न्यायालयाने रात्री दहानंतर घातलेली ध्वनीप्रदूषणासंदर्भातील बंदी योग्य की अयोग्य.
* पत्रवाचन - अब्राहम लिंकनचे मुख्याध्यापकास पत्र

## वर्षभरातील शिबिरे

### युवक शिबिर (क्रमांक १)

विषय - **संघटन क्षेत्रांचा अभ्यास**
कालावधी - दि. ९ जून ते १२ जून २००५
स्थान - आय.एल.एस. लॉ कॉलेजचे वसतीगृह
संख्या - ४५ युवक

१) 'नेताजी सुभाषचंद्र बोस' यांच्या जीवनावरील अत्यंत प्रेरणादायी चित्रपट सर्वांनी पाहिला.

२) शिबिरात संघटन या विषयसूत्रानुसार खालील सत्रे झाली.

- संघटनेची आवश्यकता व तिचे व्यवस्थापन **प्रा. श्री. शिरीषराव आपटे**
- अध्यात्मिक संघटन - रामकृष्ण संघ - **प्रा. श्री. प्रभाकर धारणे**
- शैक्षणिक संघटन - ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी - **प्राचार्य वामनराव अभ्यंकर**
- औद्योगिक संघटन - प्रबोध उद्योग - **श्री. रामभाऊ डिंबळे**
- साहित्यातून संघटन : छात्र प्रबोधन मासिकाने चालवलेली शैक्षणिक चळवळ **सौ. बागेश्री पोंक्षे**

३) काश्मीरच्या कृषी विभागात काम करणारे श्री. प्रदीप कौल यांनी 'काश्मीरची सद्यस्थिती' हा विषय मांडला.

४) युवक कार्यकर्त्यांनी वाचायलाच हवी, अशा सत्तर पुस्तकांची यादी लिहून देण्यात आली व या पुस्तकांचा अल्प परिचय करून देण्यात आला.

पहिले काम पहिल्यानेच झाले पाहिजे. त्यासाठी माणसे संघटित व्हायला हवीत. त्यावर आपण लक्ष केंद्रित करायला हवे.

**युवक शिबिर** (क्रमांक २)

विषय - **संघटन क्षेत्रांचा अभ्यास**
कालावधी - दि. २८ ते ३० आक्टोबर २००५
स्थान - सिंहगड
संख्या - ४० युवक

★ शिबिर कालावधीत दररोज सूर्योदयाच्या मुहूर्तावर सूर्यनमस्कार, जोर बैठका आणि धावण्याचा व्यायाम घेण्यात आला, तर सूर्यास्ताच्या वेळी मैदानी खेळांचे आयोजन केले होते. व्यवसायी गटातील अनेक युवकांच्या अंगाला बऱ्याच वर्षांनंतर मैदानाची माती लागली.

★ व्यवसायी गटातील युवक संजय तांबट, संजय शिंदे, अरविंद केळकर आणि विलास कुलकर्णी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. वर्धिनीमध्ये आपली कशी घडण झाली, वर्धिनीत झालेल्या संस्कारांचा महाविद्यालयीन जीवनात आणि नोकरी व्यवसायाच्या क्षेत्रातही कसा उपयोग होतो याची रोकडी उदाहरणे त्यांनी शिबिरार्थी युवकांसमोर ठेवली. आपल्यासारखीच किंवा त्याहीपेक्षा बिकट परिस्थिती असताना या मोठ्या भावांनी जे पराक्रम केले त्याने शिबिरार्थी युवक भारावून गेले.

★ खेळांच्या माध्यमातून व्यवस्थापकीय कौशल्यांचे सत्र श्री. अरविंद केळकर आणि श्री. विलास कुलकर्णी यांनी घेतले.

★ मानवी जीवनात आत्तापर्यंत येऊन गेलेल्या वेगवेगळ्या क्रांतीचे दाखले तपशीलात मांडत आगामी काळात कोणत्या प्रकारची क्रांती समाजात येऊ घातली आहे याविषयी श्री. संजय तांबट यांनी शिबिरार्थींना अधिक तपशीलाने सांगितले. बदलत चाललेल्या या वातावरणात आव्हाने पेलायची असतील तर कोणत्या गुणांची जोपासना जाणीवपूर्वक करायला हवी याबाबत त्यांनी आपली भूमिका मांडली.

★ रात्र कार्यक्रमात व्यवसायी गटातील युवकांनी आपण वर्धिनीच्या कामात कशा प्रकारे सहभागी होऊ शकतो यावर चर्चा केली, तर नित्य शाखेचे काम पहाणाऱ्या युवकांनी काम करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर मात कशी करावी यावर चर्चा केली.

★ शिबिराच्या निमित्ताने सिंहगडाचा इतिहास माहिती व्हावा या हेतूने श्री. मोहन शेटे यांच्याबरोबर गड पाहण्याचे एक सत्र झाले. प्रत्येक दरवाज्याशी आणि प्रत्येक बुरूजाशी निगडित असलेल्या ऐतिहासिक घटना ऐकताना सर्वजण वेगळ्याच भावविश्वात गेले होते. या सत्राचा समारोप तानाजी मालुसरे यांच्या समाधीसमोर झाला.

★ या शिबिराच्या निमित्ताने महाविद्यालयीन शिक्षण घेणारे युवक आणि व्यावसायिक युवकांमधील मैत्री अधिक घट्ट झाली.

★ शिबिराचा समारोप श्री. राम डिंबळे यांच्या मार्गदर्शनाने झाला.

**ओळख - जीवन यशस्वितेच्या विविध वाटांची**

**कालावधी - २४ ते २८ एप्रिल २००५**

**स्थान - नवीन मराठी शाळा**

**वयोगट - ८वी ते १२वी, संख्या - ७०**

दहावी / बारावीनंतर काय करायचं? हा यक्ष प्रश्न प्रत्येक विद्यार्थ्यांसमोर व त्यांच्या कुटुंबियांसमोर आहे. खरं पहाता जीवनात यशस्वी व्हायला कितीतरी वाटा आहेत; पण त्या वाटांची ओळख योग्य वेळी होत नाही. नेहमीची मळलेली वाट सोडून स्वतःच्या कर्तृत्वाने नव्या वाटा कोरून यशस्वी

खांद्याला खांदा भिडवून, मान सन्मानाची भावना सोडून देऊन, विशुद्ध सेवावृत्तीने समाजाशी संबंध जोडून, व्यक्ती-व्यक्तीला स्नेहरज्जूंनी बळकटपणे बांधून टाकलं पाहिजे.

झालेल्या व्यक्ती, विद्यार्थ्यांनी पाहिलेल्याच नसतात. म्हणूनच अशा वाटांची / व्यक्तींची ओळख करून देण्याच्या हेतूने ८वी ते १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी या शिबिराचे आयोजन केले होते. २४ ते २८ एप्रिल या कालावधीत झालेल्या या शिबिरात खालील व्यक्तींचे मार्गदर्शन मिळाले.

★ श्री. राम डिंबळे - प्रबोध उद्योगाची जन्मकथा
★ श्री. बापू पोतदार - उद्योगातील अनुभव
★ श्री. निलेश झोटींग - 'आलु हाऊस' च्या निर्मितीतील अनुभव
★ प्रा. मनोज देवळेकर - क्रीडाक्षेत्रातील संधी
★ सुमीत डोळे, मंदार रायरीकर, गणेश काठे व मंदार पारगांवकर 'स्वप्न उद्योग'- कल्पना आणि आजवरचे अनुभव
★ श्री. अवधूत फडणीस - ग्राफिक्स डिझायनिंग व ॲनिमेशन या क्षेत्रातील संधी
★ डॉ. अनिल अवचट - माझे छंद
★ श्री. विनायक अभ्यंकर - सैन्यदलातील संधी
★ श्री. केदार पारगावकर - योगविद्या-काळाची गरज
★ डॉ. प्रदीप आगाशे - शिक्षक व्हा
★ श्री. संजय तांबट - प्रसार माध्यमांतील संधी
★ प्रा. विजय नवले - करिअरच्या विविध वाटा
★ श्री. कृ. गो. लवळेकर - समाजभक्ती हीच प्रेरणा

श्री. विलास कुलकर्णी, श्री. भूपेंद्र शहा, श्री. अरविंद केळकर व श्री. उमेश जोशी यांनी व्यवस्थापकीय खेळांच्या माध्यमातून, उद्दिष्ट कसे ठरवावे, सांघिक भावनेची आवश्यकता इ. विषय मांडले तर सकाळच्या प्रबोधन सत्राची जबाबदारी श्री. उदय गुजर, श्री. कन्हैय्यालाल बलदोटा व श्री. राहूल घारे यांनी सांभाळली. शिबिराचे उद्घाटक होते- 'श्वास' या चित्रपटाचे निर्माते श्री. अरूण नलावडे, तर समारोपातील प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले, हॉटेल प्रेसिडेंटचे व्यवस्थापकीय संचालक श्री. माधवराव थरकुडे यांचे.

**कलाविकास शिबिर-**

कालावधी - दि. १९ ते २४ मे २००५

वयोगट - इ. ५वी ते ७वी - मुले संख्या - १४५

स्थान - नवीन मराठी शाळा

| कलाविषय | प्रशिक्षक |
|---|---|
| चित्रकला | श्री.मिलिंद सबनीस |
| हस्तकला | श्री. दि. दा. जोशी |
| मूर्तीकला | श्री. पंडीत |
| संगीत | श्रीमती शैलजा काणे |
| अभिनय | श्री. श्रीकांत यादव |

बालवर्धकांमधील उपजत कलागुणांचा शोध घेऊन त्यांच्या विकासाला चालना मिळावी, या हेतूने कलाविकास शिबिराचे आयोजन केले होते. रोज तीन तास वरील कलांच्या मूलभूत बाबींचा अभ्यास तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली केला गेला. चित्र रंगवताना, मूर्तीला आकार प्राप्त होताना, कागदांच्या घड्यांमधून अनेक गोष्टी बनताना, सुंदर आलापांनी पद्यपंक्ती सजताना, अभिनयाच्या नवरसांची उधळण करताना, सर्व बालवर्धक नवनिर्मितीच्या विश्वाशी एकरूप झाले होते. कलांचे जीवनातील स्थान व भारतीय संस्कृतीचा कलेशी असलेला संबंध याविषयी श्री. राजाभाऊ लवळेकर यांचे प्रेरणासत्र झाले. छोट्या कथांचा आधार घेत, कलेचा इतिहास सबनीस सरांनी ओघवत्या शैलीत मांडला. '१०वी फ'च्या दिग्दर्शिका

सर्वग्राह्यी, सर्वस्पर्शी संघटनेकरवीच या भारतीय जनतेमध्ये देशाची सर्वांगीण उन्नती करण्याची पात्रता येईल.

व सूत्रधार श्रीमती सुमित्रा भावे व सुनील सुकथनकर यांनी मुलांच्या प्रश्नांना मोकळेपणानी उत्तरे दिली. सुमारे दीड तास ही गप्पांची मैफल रंगली. श्रीमती अंजली कऱ्हाडकर आणि त्यांच्या शिष्यांनी नृत्यनाटिकांच्या आधारे अभिनयाच्या सामर्थ्याची प्रचीती दिली. नृत्यनाट्यांच्या आधारे समाजप्रबोधनासारखे विषयही कसे हाताळले जाऊ शकतात, हे त्यांनी प्रत्यक्ष दाखविले. 'श्वास' चित्रपटातील बालकलाकार आश्विन चितळे याने सादर केलेल्या नाट्यछटेने शिबिराचे उद्घाटन सत्र कायमचे स्मरणीय ठरले. समारोपप्रसंगी वर्धकांच्या कलाकृतींचे छोटेसे प्रदर्शन भरविले होते. समारोप कार्यक्रमात सर्व प्रशिक्षकांनी या कलांच्या जोपसनेसाठी कराव्या लागणाऱ्या गोष्टींविषयी सर्वांना मार्गदर्शन केले.

---

## पहा चाळुनी पाने आपुल्या इतिहासाची

आपल्या देशाचा इतिहास इतका मोठा आहे की, या विषयावरचे शिबिर घ्यायचे म्हटले, तरी या इतिहासातील छोट्याशा कालांशाचाच म्हणजे काही पानांचाच परिचय होतो. इतिहासाचा अभ्यास होणे गरजेचे आहेच, कारण यातच आपल्याला आपल्या शक्तीस्थानांचा जसा परिचय होतो, तशा आपल्यातील त्रुटीही समजतात. या वर्षी २३ ते २८ एप्रिल या कालवधीत भगिनी निवेदिता शाखेचे इतिहास विषयावरील शिबिर संपन्न झाले. यात खालील विषयांवर मार्गदर्शन सत्रे झाली.

- सिंधू संस्कृती, ब्रिटीशपूर्व भारत- सौ. निलिमा कुलकर्णी
- ब्रिटीशकालीन भारत - सौ. सुधा कांबळे
- ब्रिटीशकालीन पुणे - सौ. निलिमा कुलकर्णी
- राजमाता जिजाऊ - श्री. ज्ञानेश पुरंदरे
- वंदेमातरम्चा इतिहास - श्री. मिलिंद सबनीस
- ॲड. श्री. रवी यादव - अपरिचित शिवचरित्र
- सौ. भाग्यलता पाटसकर- वेदकालीन भारत
- प्रेरणा शोध आणि बोध - श्रीमती विद्याताई बापट

शिबिरात पोवाडे व वंशावळ स्पर्धा, गटश: घेण्यात आल्या. तसेच वेत्रचर्माचे प्रशिक्षण देण्यात आले. शिबिराच्या समारोपाला श्री. सुरेशराव परचुरे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

**शिबिर विषयाचा पाठपुरावा**– 'जीवन यशस्वितेच्या विविध वाटा' या विषयावरचे शिबिर यावर्षी झाले. या शिबिरात काही विद्यार्थ्यांनी सैन्यदलात जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. या विद्यार्थ्यांची त्यांच्या पालकांसह एक बैठक घेण्यात आली. या बैठकीला पूर्वसैनिक परिषदेचे कार्यकर्ते व निवृत्त नौदल अधिकारी श्री. अभ्यंकर यांनी मार्गदर्शन केले. सैन्यदलात असलेल्या संधी, यातून घडणारी देशसेवा, शिस्तबद्ध व स्वाभिमानी जीवन जगण्याची मिळणारी संधी याविषयी आपले अनुभव त्यांनी सर्वांसमोर ठेवले. पालकांच्या शंकांचे निरसन केले. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या कोणत्या टप्प्यावर कोणती संधी या क्षेत्रात मिळते याविषयी मार्गदर्शन केले.

सामाजिक विषयांचा विचार करताना दैशिक भावना वापरली पाहिजे. परकीय मानसिकता नको.

## 'संस्कार'

शिबिर स्थान - पुणे विद्यापीठ हायस्कूल

कालावधी ५ ते ९ नोव्हेंबर, शिबिरार्थी संख्या - ५० वर्धिका

### झालेली व्याख्याने

- प्रा. शरद वाघ- घरातील संस्कार (उद्घाटन सत्र)
- सौ. कुंदाताई वर्तक -प्रसारमाध्यमांतून होणारे संस्कार
- डॉ. प्रदीपराव आगाशे- शिक्षणातून होणारे संस्कार
- सौ. कल्याणी नामजोशी- सणांमागील संस्कार
- ज्ञानेश पुरंदरे- कथा देशभक्तांच्या
- जयंतराव कवठेकर- देशोदेशीचे संस्कार (समारोप सत्र)

### पुस्तक वाचन

* आम्ही अन् आमचा बाप * श्यामची आई

* जगायचंय प्रत्येक क्षण

(संचालन - श्रीमती विद्याताई बापट)

### कथाकथन व कौशल्य शिक्षण

डॉ. अनिलराव गोडबोले व सहकारी कार्यकर्ते

स्लाईड शो - स्वातंत्र्यवीर सावरकर

### तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला

या वर्षी वरुणराजाने कृपादृष्टी केली असे म्हणे म्हणे पर्यंत ती वक्रदृष्टी आहे की काय असे वाटण्यासारखी पूरपरिस्थिती महाराष्ट्राच्या विविध शहरांमध्ये व गावांमध्ये निर्माण झाली. पुण्यात मुळा व मुठा दोन्ही नद्यांना पूर आले या पुरामुळे या नदीच्या परिसरात रहाणाऱ्या अनेकांना पुराचा फटका बसला. 'स्व'रुपवर्धिनीच्या परिसरातली भीमनगर, जुनाबाजार या परिसरातील शेकडो गरीब कुटुंबांचे खूप नुकसान झाले. बालवाडी विभागातील शिक्षिका तसेच नेत्रतपासणी विभागातील महिला कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष या वस्त्यांमध्ये जाऊन सुमारे एक हजार घरांमधील परिस्थिती पाहिली व नेमक्या नुकसानीचा अंदाज घेतला. वर्धिनीच्या 'मृद्गंध' गिरीभ्रमण गटाचे कार्यकर्ते डॉक्टर विनेश नगरे व त्यांच्या पाच सहकाऱ्यांनी जुना बाजार भागामध्ये तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली. पुराचे पाणी घरात घुसल्याने या पाण्याबरोबर जळवा, अनेक कीटक घरात शिरले व त्यांच्या चावण्याने लहान मुलांना व महिलांना खूप त्रास झाला अशा सुमारे १२५ जणांवर तातडीचे उपचार करण्यात आले. तसेच या भागातील गरजू विद्यार्थ्यांना आवश्यक ती वह्या पुस्तके देण्यात आली.

दैनिक सकाळने पूरग्रस्तांच्या सहाय्यासाठी जी मदत केंद्रे सुरु केली होती त्यापैकी मनोरमा मंगल कार्यालयातील केंद्रावर वर्धिनीचे कार्यकर्ते दररोज पूर्ण दिवसभर उपस्थित होते व या कालावधीत मदत स्वरूपात मिळालेल्या वस्तू पूरग्रस्तांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्या केंद्रावर आवश्यक ती कामे या सर्वांनी केली.

समाज घटकांत उच्च-नीचतेचा भेदभाव न करता सर्व सामर्थ्य एकवटून तत्परतेने सर्वांची सेवा करणे आवश्यक आहे.

# दर्शन महानगरीचे

या वर्षीच्या वार्षिक परीक्षेत ८० टक्केच्या वर गुण प्राप्त करणाऱ्या वर्धकांना, बक्षिसरूपाने मुंबईची सहल आयोजित केली होती. या निकषात उतरणारे २७ विद्यार्थी व काही कार्यकर्ते दि. २ मेला सायंकाळी रेल्वेने मुंबईला निघाले. काहींची रेल्वेने प्रवास करण्याची पहिलीच वेळ. लोणावळा-खंड्याळ्याच्या दरम्यान रमणीय सूर्यास्त झाला. काहींनी प्रवासातील बोगदे मोजले तर काहींनी स्टेशनांची यादी बनवली. डब्यात रंगलेल्या गाण्यांनी सहप्रवाशांची मने केव्हाच जिंकली गेली होती. प्रचंड उकडू लागल्याची जाणीव झाली आणि लक्षात आलं, दादर स्थानक आलं. मंडळी खाली उतरली. कितीही पुसला तरी पाझरणारा घाम काही थांबेना. पाहुणे होऽऽ ही मुंबई आहेना! आता याचीही सवय करून घ्यायला हवी. प्रचंड लांबरुंद, शेकडो उड्डाणपूल, वेगवान पण शिस्तशीर वाहतूक, गगनचुंबी बहुमजली इमारती, तुरूतुरू चालणारी माणसे ... मुंबई जरा न्यारीच आहे बुवा.

सहलीची पहिली सकाळ उगवली. दूरदर्शन केंद्र वरळीला पहिली भेट झाली. तेथील अधिकारी श्री. अनिल बांदल यांनी दूरदर्शन चे सारे विश्व प्रत्यक्ष उलगडून दाखविले. मोठमोठे स्टुडिओ, विविध प्रकारचे कॅमेरे, नियंत्रण कक्ष, संकलनाच्या विविध पद्धती, दृक-श्राव्य व्यवस्थापनाची तंत्रे, कार्यक्रम निर्माण प्रक्रिया, प्रक्षेपणातील गमतीजमती हे सर्व वर्धकांनी जवळून पाहिले. इथे काम करायला मिळाले, तर काय धमाल येईल, अशा विचारातच मंडळी नेहरू तारांगणात पोहोचली. ग्रह, तारे, नक्षत्र, आकाशगंगा यांच्या अनंत विश्वातील अनेक रहस्ये तारांगणाच्या घुमटावर साकारत होती. आपण जणू अवकाशयानात बसून या विश्वाची सफर करीत आहेत, असेच सर्वांना वाटत होते. ग्रहणे, कृष्णविवरे, धूमकेतू या भूगोलातील क्लिष्ट संकल्पना प्रत्यक्ष दर्शन घेताना सोप्या बनत चालल्या होत्या. या अवकाश विश्वातून बाहेर यायला बराच वेळ लागला.

यानंतरची भेट होती सायन्स गार्डनला. सारा परिसर मूलभूत विज्ञानाची उकल करून दाखवणाऱ्या शेकडो प्रयोग-प्रकल्पांनी व्यापून गेला होता. तेथील बहुतेक सर्व वैज्ञानिक खेळांचा वर्धकांनी आनंद घेतला.


दुसऱ्या दिवशी पार्ले बिस्कीट, मर्सिडीज बेंझ गाड्यांचे सर्विसिंग सेंटर, वात्सल्य अर्भकालय, आरे दुग्धशाळा व इस्कॉनचे कृष्णमंदिर पाहून, दिवसाची सांगता जुहू चौपाटीवरील सूर्यास्ताने झाली.

शेवटच्या दिवशी गेटवे ऑफ इंडियापासूनची तासाभराची समुद्र सफर 'विक्रांत' युद्धनौकेची दूरून भेट घडविणारी होती. शिवछत्रपती संग्रहालयातील वस्तूंनी नजर खिळवून ठेवली. तारापोरवाला मत्स्यालयातील विविध प्रकारच्या माशांचे प्रकार पहाता पहाता दुपारचे तीन केव्हा वाजले हे समजले नाही. परतीच्या गाडीची वेळ जवळ आल्याने तीन दिवसांच्या भेटीमधील विविध प्रसंगांचे स्मरण करीत करीत पुण्याकडे परतण्याचा प्रवास सुरू झाला.

समाजातील विकृती दूर करून परंपरेतील श्रेष्ठ गोष्टींची पुनर्स्थापना केली पाहिजे.

### त्या जागी माझा फोटो आहे .....

मुंबई येथील शिबिरात विलेपार्ले येथील पार्ले बिस्कीट फॅक्टरीला भेट होती. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कंपनीच्या पद्धतीनुसार कंपनीच्या कामकाजावर आधारित एक कार्टून फिल्म त्यांनी विद्यार्थ्यांना दाखविली. फिल्म झाल्यावर काही राष्ट्रीय नेत्यांची छायाचित्रे पडद्यावर झळकत होती. छायाचित्र दिसताच शिबिरार्थी एका सुरात त्या राष्ट्रीय नेत्याचे नाव घेत होते. लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस, पंडित नेहरू, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद..... फोटो भराभर पडद्यावर येता येता एक रिकामी चौकट पडद्यावर आली. निवेदकाने शिबिरार्थींना विचारले, ''या जागी कोणाचा फोटो असेल ? ओळखा बरे.'' शिबिरार्थी आपापल्या कल्पनेनुसार थोर व्यक्तींची नावे सांगू लागले. इतक्यात स्वामी दयानंद शाखेचा एक वर्धक उठला आणि म्हणाला ''त्या जागी माझा फोटो आहे.'' त्याच्या या उत्तराने निवेदकाचा चेहरा आनंदाने खुलला आणि त्या पाठोपाठ पडद्यावर रिकाम्या चौकटीत अक्षरे उमटली ''आपल्या फोटोसाठी जागा !''



पडद्यावरील या छायाचित्रांमध्ये माझ्या कर्तृत्वाने मीसुद्धा झळकेन, असा आत्मविश्वास आपल्या प्रत्येकापाशी हवा असा समारोप करीत, निवेदकाने असे बाणेदार उत्तर देणाऱ्या वर्धकाचे खास अभिनंदन केले.

**'ताणाशी गट्टी, तणावाची छुट्टी'**

कालावधी - २४ ते २८ ऑक्टोबर २००५
स्थान - विद्यापीठ हायस्कूल
वयोगट - ८वी ते १२ वी, संख्या ८५

८वी ते १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी हे शिबिर संपन्न झाले. अभ्यास करताना 'टेन्शन' येतं अस नेहमीच ऐकायला मिळतं. हे तथाकथित 'टेन्शन' म्हणजे काय ? ताण आणि तणाव यातील नेमका भेद कोणता? शारीरिक वाढीसाठीसुध्दा जसा काही प्रमाणात 'ताण' हा आवश्यकच असतो, तसेच बौद्धिक क्षमतेच्या विकासाचेही आहे. या उपकारक ताणाचे तणावात रूपांतर झाले की, समस्या सुरू होतात. ताणाचे तणावात रूपांतर होऊ नये म्हणून ध्यान कसे करावे, व्यक्तिमत्वाचा म्हणजेच अंतर्गत व्यक्तिमत्वाचा आणि बाह्य (शारीरिक) व्यक्तिमत्चाचा विकास कसा साधता येतो, या महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन करायला ऋषी संस्कृती विद्या केंद्राचे कार्यकर्ते श्री. समीर नाईक हे शिबिराच्या पूर्ण कालावधीत मार्गदर्शन करायला येत होते. त्यांच्या व्याख्यानामुळे, सहज संवाद साधण्याच्या शैलीमुळे,

अस्पृश्यतेला धर्माचा आधार नाही. कोणीही हिंदू पतित नाही.

शिबिरार्थी आपल्या मनातील विचार मोकळेपणाने मांडत होते. या मार्गदर्शनाचा उपयोग यापुढे आम्ही निश्चितच करू, रोजच्या दिनक्रमात ध्यान सुरु ठेवू अशी उत्फूर्त प्रतिक्रिया अनेकांनी दिली.

या मुख्य विषयाबरोबरच बिनतारी संदेशयंत्रणा, व्हिडिओ कॅमेरा व घड्याळ या नित्य उपयोगातील वस्तूंची तपशीलाने माहिती सांगण्यात आली.या सर्व साधनांचे प्रत्यक्ष कार्य कसे चालते हे समजावे म्हणून ही साधने प्रत्यक्ष आणून वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

या विषयांचे मार्गदर्शन खालील मान्यवरांनी केले.

(१) श्री अवधूत फडणीस (कॅमेरा)
(२) श्री अजय महिंद्रकर (वायरलेस)
(३) श्री पंकज जोशी (व्हिडिओ कॅमेरा)
(४) श्री भूषण वाघूलकर (घड्याळ)

दररोज संध्याकाळी एक प्रेरणासत्र होते. यामध्ये खालील वक्त्यांचे मार्गदर्शन लाभले.

श्री. संतोष गोंधळेकर : उर्जा-इंधनः समस्या व उपाय
श्री. विवेक वेलणकर : माहितीचा अधिकार
श्री. शरद घाटपांडे : पूरग्रस्त सेवाकार्यातील प्रेरक अनुभव
श्री. चंद्रशेखर जोशी : स्वच्छता अभियान

## 'दहावी' पूर्वतयारी अभ्यासवर्ग

दहावीचे वर्ष उज्वल पराक्रमाचे, यश मिळविण्याचे. यशासाठी नियोजनपूर्वक अभ्यास करणे महत्त्वाचे. या वर्षातील अभ्यासाचे व एकंदरीत दिनक्रमाचे वेळापत्रक कसे असावे, अभ्यासाच्या अधिकाधिक परिणामकारक पद्धती कोणत्या याबद्दल मार्गदर्शनासाठी एका मार्गदर्शन वर्गाचे आयोजन रविवार दि. २६ जून रोजी केले होते. या विषयासंदर्भात अनेक वर्षे मार्गदर्शन करणाऱ्या सौ. उर्मिलाताई गुजर यांनी या वर्गाचे संचालन केले.

या वर्गामुळे वर्धकांना नियोजनाचे महत्त्व समजले. सरधोपट, पुढे येईल त्या विषयाचा, कसाही अभ्यास करण्यापेक्षा अभ्यासाच्या पायऱ्यांचा आधार घेऊन त्यात अधिक प्राविण्य मिळविता येते हा विश्वास दृढ झाला.

नुसता एक दिवसीय वर्ग घेऊन न थांबता शालांत परीक्षा होईपर्यंत दर तीन महिन्यांनी या साऱ्या विषयाचा पाठपुरावा करण्यासाठी जमायचे, असे ऊर्मिलाताईंनी सर्वांना आवाहन केले आहे.

## ओळख भारताची

वयोगट - ५वी ते ७वी, शिबिरार्थी संख्या - १४०
कालावधी ५ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर २००५
स्थान - आय.एल्.एस्. लॉ. कॉलेज
प्रबोधन सत्रात वक्त्यांनी मांडलेले प्रमुख मुद्दे -

**ज्ञानेश पुरंदरे**-भारतीय संस्कृतीत मातृभूमीला आई का मानतात? जन्मदायी आई ही आपल्या पोटच्या अपत्याचे पालन- पोषण- संवर्धन करते, तर मातृभूमी ही साऱ्या समाजाचे धारण-पोषण-संवर्धन व संस्कार करते. या मातीचे गुणधर्म, तिच्यावरील अनादि कालापासून नांदलेल्या लोकसमूहांची वैशिष्ट्ये, हा आपला समृद्ध वारसा आहे.

**अतुल उरसळ**- विमान अपघातामुळे हिमपर्वतावर अडकलेल्या प्रवासी नायकाच्या जिद्दीची कथा.

प्रतिकियात्मक वृत्तीने कुठलेही काम होणार नाही.

**श्री. र. ज. नरवणे सर** - आपले पूर्वज - त्यांनी विविध ज्ञानशाखांचा केलेला अभ्यास, त्याची फलश्रुती - पृथ्वी चपटी नसून गोल आहे; शून्याच्या शोधाचे योगदान, काचेचे उपयोजन, आयुर्वेद, खगोलशास्त्र, स्थापत्य यामधे केलेली प्रगती वरील गोष्टींचा केवळ अभिमान न बाळगता त्याचे सत्य स्थितीत उपयोजन कसे करता येईल?

**शिरीष पटवर्धन** - भारतामध्ये एकात्मतेचा भाव हा हजारो वर्षांपासून आहे. धार्मिक व सांस्कृतिक प्रथा परंपरांचा विचार केल्यावर याची खात्री पटते. राम-शिव-कृष्ण ही राष्ट्रीय एकात्मतेची प्रतीके आहेत, असे राम मनोहर लोहिया यांनी म्हटले आहे. संतांची चरित्रे वाचल्यावर एकात्मतेची अधिक जाणीव होते. आदि शंकराचार्यांचे कार्य, संत नामदेवांच्या ग्रंथ साहिबातील रचना अशी अनेक उदाहरणे देता येतील.

**झालेल्या व्याख्यानांतील महत्त्वाचे मुद्दे -**

**मानचित्र परिचय (श्री शिरीषराव आपटे)** - भारताच्या सांस्कृतिक नकाशाच्या आधारे देशातील नद्या, त्यांच्या काठावरील सांस्कृतिक विकास, पर्वत, पठारी प्रदेश, किनारपट्टया, तीर्थक्षेत्रे, रणक्षेत्रे व त्यावरील इतिहास, आद्य शंकराचार्यांनी स्थापलेले ४ मठ, १२ शक्तिपीठे, एकता व अखंडता. भारतभ्रमणाचे महत्व, सर्व महापुरूषांनी भारताची परिक्रमा केली आहे.

**पूर्वांचल (श्री. प्रशांत दिवेकर)** - स्लाईड शोच्या आधारे पूर्वांचलातील ८ राज्ये, तेथील जनजाती, लोकजीवन, समस्या, लष्कराचे कार्य, समृद्ध भौगोलिक व ऐतिहासिक वारसा (लाचित बडफूकन) याचे अत्युत्तम व प्रेरणादायी सादरीकरण

**उत्तर भारत (श्री. मिलिंद सबनीस)**- हिमालयाचे प्राकृतिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक महत्वपूर्ण स्थान. जम्मू-काश्मीर, तिबेट, लडाख, दिल्ली, उत्तर प्रदेश, उत्तरांचल, हिमाचल, पंजाब हरियाना येथील लोकजीवनांची शैली. नद्यांचे प्रवाह व त्यांचा उपयोग तीर्थक्षेत्रे कुरूक्षेत्र याविषयीचे अभ्यासपूर्ण सत्र.

**पश्चिम भारत (श्री. प्रमोद नाटके)** - कोकण, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र यांची भौगोलिक वैशिष्ट्ये, महाराष्ट्रातील राजघराणी, शिवपूर्वकाल, शिवकाल, महाराष्ट्र, गोवा, गुजरात, मध्यप्रदेश येथील महत्त्वाची स्थाने व त्यांचे महात्म्य, कृषी, संशोधन, शिक्षण या क्षेत्रातील स्थान, लष्करी स्थाने, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती, धरणांमुळे झालेला विकास, साक्षरता या सर्वांचा परामर्ष घेणारे ओघवते सत्र.

**रात्र कार्यक्रम** - ➢चंद्रशेखर आझाद यांच्यावरील स्फूर्तीदायक ॲनिमेशन फिल्म.➢ संवाद कौशल्यांच्या विकसनासाठी विविध बौद्धिक खेळ ➢ हिमालय या विषयावर श्री. रविंद्र आपटे यांचा स्लाईड शो ➢ प्रश्नमंजुषा व रंजनसभा

**क्रीडादिन कार्यक्रम** - प्रतिवर्षी २५ डिसेंबर रोजी शाखांतर्गत क्रीडा स्पर्धा होतात. यावर्षी रमणबाग शाळेच्या मैदानावर संपन्न झालेल्या कार्यक्रमात पुढील गट विजेते ठरले.

| गट | खेळ | शाखा |
|---|---|---|
| लहानगट | लंगडी | स्वामी दयानंद |
| मध्यमगट | खो-खो | स्वामी दयानंद |
| मोठागट | कबड्डी | समर्थ रामकृष्ण |
| युवकगट | व्हॉली बॉल | समर्थ रामकृष्ण |

उच्च-नीचता व भेदभावाचा विध्वंस झाला पाहिजे.

**विज्ञान प्रकल्प स्पर्धा**

विज्ञान दिनाच्या निमित्ताने रविवार दि.१३ फेब्रुवारी रोजी विज्ञान प्रकल्प स्पर्धा झाली. प्रत्येक शाखेला व प्रकल्पाला एकेक विषय सादरीकरणासाठी दिलेला होता. प्रकाश, दाब, स्वयंपाकघरातील विज्ञान, ध्वनी, भूकंप असे एकूण दहा विषय या स्पर्धेसाठी होते. प्रत्येक शाखेने आपला प्रकल्प, त्याविषयाची तपशीलवार माहिती, तक्ते, प्रयोग अशा माध्यमातून सादर केले होते. वैयक्तिक पातळीवरही प्रयोग सादर करण्याची स्पर्धा; तसेच पोस्टर रंगवण्याची स्पर्धाही या निमित्ताने घेण्यात आली. शाखा पातळीवर स्वामी विवेकानंद शाखेने सादर केलेल्या 'ध्वनी' या विषयावरील प्रकल्पाचा प्रथम क्रमांक आला. स्पर्धांमधील विजेते खालीलप्रमाणे :

**पोस्टर रंगवण्याची स्पर्धा -**

**युवक गट** - विक्रांत दिघे (विवेकानंद शाखा)

**८वी ते १० वी गट विजेत्यांची नावे**

आनंद खरात (सुबोधानंद शाखा)

कु. अनुजा कुदळे (निवेदिता शाखा)

कु. पूजा भागानगरे (निवेदिता शाखा)

**५वी ते ७वी गट विजेत्यांची नावे**

अभिजीत दोडके (विवेकानंद शाखा)

सौरभ गायकवाड (श्रद्धानंद शाखा)

मिहीर सहस्रबुद्धे (सुबोधानंद शाखा)

**प्रयोग सादरीकरण -**

**(वैयक्तिक प्रयोग)** -अनिरुद्ध गोखले (रामकृष्ण शाखा)

**प्रकल्प सादरीकरण -**

प्रथम क्रमांक-विवेकानंद शाखा (विषय 'ध्वनी')

द्वितीय क्रमांक-योगानंद शाखा (विषय 'उष्णता')

या स्पर्धेसाठी श्री. इंगळे सर, सौ.मेघना देशपांडे यांनी परीक्षक या नात्याने काम पाहिले. स्पर्धेचा बक्षिस समारंभ वर्धिनीच्या कार्यकारिणीचे सदस्य श्री. रामभाऊ डिंबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

---

**❋ माडगावकर पुरस्कार वर्ष २००४ व २००५**

**सर्वोत्कृष्ट वर्धक-वर्धिका पुरस्कार - २००४**

इयत्ता १०वी, इयत्ता १२वी व पदवीधर अशा तीन गटांसाठी मुंबईच्या माडगावकर न्यासाने हा पुरस्कार वर्धिनीमध्ये सुरू केला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील यश, वर्धिनीच्या कामातील सहभाग, स्वयंस्फूर्तपणे सांभाळलेल्या जबाबदाऱ्या, अभ्यासेतर विविध विषयातील यश अशा विविध निकषांवर या पुरस्कारासाठी निवड केली जाते. ही निवड एक स्वतंत्र समिती करते. तीनही गटातील पात्र वर्धक वर्धिकांच्या मुलाखतीतून वर्ष २००४ साठी खालील तिघांची निवड करण्यात आली.

**पदवीधर गट** - कै. पद्माबाई म. माडगावकर पुरस्कार
श्री. चंदन शांताराम हायगुंडे

**उच्चमाध्यमिक गट**-कै. मधुकर ब. माडगावकर पुरस्कार
श्री. अमीत सुरेश येलवंडे

**माध्यमिक गट** - कै. मधुकर ब. माडगावकर पुरस्कार
कु. सुप्रिया सुधाकर फुलावरे

**सर्वोत्कृष्ट वर्धक वर्धिका पुरस्कार - २००५**

स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमामध्ये २००५ वर्षासाठीचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. निवृत्त न्यायाधीश श्री. आर. ए. मेहता यांच्या हस्ते पुरस्कार विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. या वर्षीचे पुरस्कार विजेते खालीलप्रमाणे आहेत.

जातिव्यवस्था कालबाह्य झाली आहे. तिचा काही उपयोग नाही.

**पदवीधर गट** -कै. पद्माबाई म. माडगावकर पुरस्कार
कु. डिंपल अनिल हायगुंडे
**उच्च माध्यमिक गट** - कै. मधुकर ब. माडगावकर पुरस्कार
कु. चैत्राली रमेश लडकत
**माध्यमिक गट** - कै. मधुकर ब. माडगावकर पुरस्कार
कुमार अतुल हनुमंत उरसळ

**गुणगौरव कार्यक्रम** - रविवार दि. १७ जुलै रोजी गुणगौरव कार्यक्रम झाला. डे.ए.सोसायटीचे कार्याध्यक्ष श्री. सूर्यकांत पाठक हे अध्यक्षस्थानी होते. इयत्ता ३री ते पदवी अशा विविध शैक्षणिक स्तरातील १४५ गुणवंत विद्यार्थी विद्यार्थिनींना या कार्यक्रमात गौरविण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. पाठक यांनी 'दिनूचे बिल' या गोष्टीच्या रूपकाच्या माध्यमातून 'स्व'-रुपवर्धिनीचे त्यांच्या जीवनातील स्थान काय आहे व कसे रहावे, याविषयी विचार मांडले. तसेच शिका, मोठे व्हा, खूप पैसे मिळवा, आवश्यक असेल तर उच्च शिक्षणासाठी विदेशात सुद्धा जा परंतु केव्हाही आपल्या देशाला विसरू नका, असा बहुमोल संदेश सर्वांना दिला. या कार्यक्रमासाठी भेट म्हणून काका हलवाईचे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी सर्व विद्यार्थ्यांना पेढे दिले.

**वर्धापनदिन कार्यक्रम**

- स्वामी दयानंद शाखेचा वर्धापन दिन तिथीप्रमाणे गुरुपौर्णिमेच्या दिवशी झाला. विश्वकर्मा इन्स्टिट्यूटचे प्राध्यापक श्री. देशमुख सर हे प्रमुख अतिथी होते. सुमारे ५० पालकही कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. सद्य परिस्थितीत वर्धिनीच्या कार्याचे महत्त्व काय आहे हा विषय प्रमुख वक्ते श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी मांडला.
- स्वामी विवेकानंद शाखेने वर्धापनदिनाच्या निमित्ताने फर्ग्युसन कॉलेजच्या टेकडीवर वृक्षारोपण केले. या कार्यात तेथे नेहमी फिरायला येणाऱ्या वृध्द व्यक्तींचे खूप मार्गदर्शन लाभले. रोपे लावताना जागा कशी असावी, कुठे रोपांची वाढ चांगली होईल हे त्यांनी समजावून सांगितले. नंतर भारत सेवक समाजाच्या कोनशिलेजळ या सर्व 'आजोबां'बरोबर वर्धकांनी गायत्री मंत्राचे पठण केले.

  ४ जुलै रोजी संपन्न झालेल्या शाखेच्या वर्धापनदिन सोहळ्यात डॉ. प्रदीपराव आगाशे यांनी संकल्प कोणते असावेत व त्याच्या पूर्तीसाठी काय केले पहिजे यावर मार्गदर्शन केले. सध्या विक्रीकर अधिकारी म्हणून कार्यरत असलेले श्री. संजय शिंदे यांनी बालपणापासून ते स्वतः या शाखेवर कसे घडत गेले, याविषयीचे प्रेरणादायी अनुभव सर्वांसमोर मांडले.

  या कार्यक्रमाच्या निमित्ताने विवेकानंद शाखेच्या सर्व व्यावसायिक युवकांची मासिक शाखा सुरु झाली.
- स्वामी श्रद्धानंद शाखेच्या वर्धापन दिनाला प्रमुख वक्ते म्हणून प्रा. श्री. शिरीष आपटे उपस्थित होते. बिल गेटस आणि श्रावण बाळ यांचे रूपक वापरून शाखेचे महत्त्व त्यांनी वर्धकांना आणि त्यांच्या पालकांना समजावून सांगितले.

**गुरूपौर्णिमेनिमित्त झालेले कार्यक्रम**


- शाखाशाखांवरील गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमांचे आयोजन सर्व शाखांमधील मोठ्या गटातील वर्धकांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन, वक्त्यांची व्यवस्था, तांत्रिक व्यवस्था या सर्व गोष्टी त्यांनी उत्तम रीत्या व काळजीपूर्वक पार पाडल्या.

वर्णव्यवस्था समाजावर लादता येणार नाही.

- विवेकानंद शाखेच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून हुतात्मा राजगुरु विद्यालयाचे प्राचार्य श्री. एस. पी. यादव सर आले होते. शाखेतील संस्कारांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे विषद करुन त्यांनी संयोजनातील निपुणतेबद्दल वर्धकांचे कौतुक केले.
- स्वामी अखंडानंद शाखेवरील कार्यक्रमात सौ. स्नेहलता मुसळे यांनी परशुरामांची गोष्ट सांगितली. तसेच गणित, इंग्रजीचा अभ्यास कसा करावा व एकाग्रतेसाठी ओंकाराचे ध्यान कसे करावे याचे मार्गदर्शन केले.
- स्वामी अभेदानंद शाखेकर श्री. अरविंद केळकर यांनी महर्षी व्यासांविषयी कथा सांगितली. तसेच आदर्श शिष्य बनण्यासाठी आपण काय केले पाहिजे या विषयी मार्गदर्शन केले.
- सुटीनिमित्त अमेरिकेतून स्वगृही आलेल्या आनंद देवपूरकर याची मनमोकळी मुलाखत दयानंद शाखेच्या विद्यार्थ्यांनी घेतली. या प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अमेरिकेतील शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा, राजकीय व वैज्ञानिक विश्व मुलांसमोर मोकळे होत होते.
- श्रद्धानंद शाखेच्या कार्यक्रमात श्री. सुनील कुलकर्णी यांनी गुरू म्हणजे काय, ते किती प्रकारचे असतात व वर्धिनीचे संस्थापक कै. कृ. ल. पटवर्धन हे कसे अद्वितीय गुरू होते, याविषयी माहिती सांगितली.

## विदेशी वस्त्र होळीचा शतकोत्सव

७ ऑक्टोबर १९०५ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पुण्यामध्ये विदेशी वस्त्रांची होळी पेटवून स्वातंत्र्याच्या लढाईसाठी तरूणांना चेतविले होते. या ऐतिहासिक प्रसंगाची शताब्दी पुण्यात झाली. मुंबई येथील सावरकर दर्शन प्रतिष्ठानने पुण्यातील अनेक संस्थांच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित केला. स्वातंत्र्यवीर सावरकर हे पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतिगृहात रहात होते. त्यांच्या या निवासस्थानापाशी झालेल्या



कार्यक्रमात व प्रत्यक्ष विदेशी वस्त्रांची होळी झाली त्या ठिकाणच्या स्मारकापाशी झालेल्या कार्यक्रमात, वर्धिनीच्या युवकांनी ढोल ताशांच्या निनादात अभिवादन केले. वर्धिनीच्या युवकांच्या प्रभावी वादनामुळे कर्वे रस्त्यावरील या ऐतिहासिक प्रेरणादायी स्मारकापाशी झालेल्या अभिवादनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

समाजाच्या पतित अवस्थेबद्दल इतरांना दोष कशाला द्यायचा?

## आनंदवार्ता

रोहिणीताई तेंडुलकर (सौ. रोहिणी दिघे) या वर्धिनीच्या युवतीने पुणे विद्यापीठाला सादर केलेला शोधप्रबंध विद्यापीठाने स्वीकारला असून त्याची घोषणा विद्यापीठाने केली आहे. पुणे विद्यापीठाने त्यांना तसे पत्रही पाठविले आहे. सौ. रोहिणी दिघे यांनी शिकत असताना वर्धिनीच्या निवेदिता शाखेचे काम केले. शिक्षणानंतर अरूणाचल प्रदेशात वनवासी कल्याण आश्रमाचे दोन वर्षे पूर्णवेळ कार्यकर्ती म्हणून काम केले. तेथून परतल्यावर त्यांनी पीएचडीचा संकल्प केला. त्यांनी सादर केलेल्या शोध प्रबंधाचा विषय होता;

''स्त्री समस्यांविषयी सामाजिक आणि राजकीय जागृती कार्यात डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे योगदान''. वर्धिनीतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

स्पर्धा परीक्षा विभागातील विद्यार्थ्यांनी यंदाही घवघवीत यश मिळवले असून, केंद्रातील १७ विद्यार्थ्यांची पी.एस्.आय्. पदावर, एकाची पोस्टल असिस्टंट तर एका विद्यार्थिनीची बँक ए.ओ. पदावर निवड झाली आहे. या सर्वांचे अभिनंदन.

### दहावी/बारावी सहल

दहावी-बारावीच्या अत्यंत महत्त्वपूर्ण परीक्षांनंतर पुढे उभी असते, ती लांबलचक भलीमोठी सुटी. या सुटीतील दिवसांचे नियोजन करण्यासाठी आणि परीक्षेचा ताण घालविण्यासाठी गडकोटांवरील सहलीशिवाय अन्य कोणता सुंदर पर्याय असू शकणार?

यंदाच्या १२वी चा गट सिंहगडावर, तर १०वीचा गट सालाबादप्रमाणे हरिश्चंद्रगडावर सहलीसाठी गेला होता. गडाच्या बुरूजांवर गप्पांच्या मैफली रंगत होत्या, पण त्यांना काही सूत्र होते. सुटीत विविध छंद जोपासायचे, भरपूर व्यायाम, भरपूर खेळायचं, शाखेचं काम झडून करायचं, खूप पुस्तकं वाचायची, महाविद्यालयीन फी साठी काही अर्थार्जन करायचं असे नानाविध संकल्प या गप्पांमधून आकार घेत होते. वर्धिनीची आजवरची वाटचाल १० वीच्या गटाने ज्ञानेश पुरंदरे यांच्याकडून समजावून घेतली. विलास कुलकर्णींच्या व्यवस्थापकीय खेळांनी खूपच धमाल आणली. अजस्त्र कोकणकडा पाहून पोटात निर्माण झालेली पोकळी गरमागरम खिचडीने लगेच भरून काढली. वर्षभरात दुरावलेली सारी पद्ये खणखणीत स्वरात ओठांवर आली.

अस्पृश्यता म्हणजे सवर्णांच्या मनाचा संकुचितपणा आहे.

## गौरव वर्धिनीच्या एका कार्यकर्त्याचा

**दैनिक लोकसत्तामध्ये 'स्फूर्ती गाथा' हे सदर प्रसिद्ध होत होते. या सदरामध्ये शिक्षक दिनाच्या निमित्ताने ४ सप्टेंबरच्या अंकात वर्धिनीच्या चंद्रकांत भोसले या कार्यकर्त्याची स्फूर्तीगाथा प्रसिद्ध केली आहे. ती जशीच्या तशी खाली दिली आहे.**

### अंधकारमय शिक्षणविश्वातील स्फूर्तिगाथा . . .



पुणे, ४ सप्टेंबर/प्रतिनिधी : प्राप्तिकर खात्याचे छापेसत्र, बोकाळलेले बाजारीकरण, गुणवंत विद्यार्थ्यांची होणारी परवड...

. . . अशा अंधकारमय शिक्षणविश्वामध्ये उद्या शिक्षक दिन साजरा होत असताना **चंद्रकांत भोसले यांच्यासारखी स्फूर्तीगाथा आशेचा किरण ठरत आहे.** हा जिद्दीचा शिक्षणप्रवास आहे, पुण्यातील कोरेगाव पार्कमधील अंध प्रशालेतील एक सर्वसामान्य विद्यार्थी ते याच शाळेचा मुख्याध्यापक असा !

वयाच्या चौथ्या वर्षी टायफॉईडमुळे चंद्रकांत यांची दृष्टी पूर्णपणे गेली. पण भोसले कुटुंबीयांनी हाय खाल्ली नाही. त्यांचे वडील एका खाजगी कंपनीत नोकरीला. पुण्यातील कोरेगाव पार्क येथील अंधशाळेची ख्याती त्यांनी ऐकलेली. १९७३ मध्ये चंद्रकांत अंध प्रशालेत दाखल झाला. १९३४ मध्ये या संस्थेची स्थापना करणारे शंकरराव माचवे, त्यांच्या कन्या आणि संस्थेच्या प्रशासकीय व्यवस्थापक श्रीमती मंगला देसाई यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांमुळे त्यांनी आठवीपर्यंतचा टप्पा पूर्ण केला. त्यानंतर **'स्व'-रुपवर्धिनी संस्थेने मदतीचा हात दिल्याने चंद्रकांत पहिल्या श्रेणीत** दहावी **उत्तीर्ण झाले. विश्वास कुलकर्णी यांनी 'वाचून'** दाखवलेला **अभ्यास, पाठ करून घेतलेली गणिताची समीकरणे, शास्त्राची सूत्रे यामुळे हे यश मिळवू शकलो, असे चंद्रकांत सांगतात.** पुढे वाडिया महाविद्यालयातून इतिहास हा विषय घेऊन कला शाखेची पदवी प्राप्त केली आणि शिक्षणशास्त्र (बी.एड.) अभ्यासक्रमही पहिल्या श्रेणीत यशस्वीपणे पूर्ण केला. अशोक लांडगे, किशोर इंगूळकर, नोएल देडे, राजू वानखडे, समाजसेविका बोपर्डीकर मॅडम अशा कितीतरी मित्रांनी केलेल्या मदतीचे ऋण फेडण्यास शब्द नाहीत, असेही चंद्रकांत प्रांजळपणे कबूल करतात. ब्रेल लिपीतील पुस्तकांची संख्या अत्यंत अपुरी आहे. त्यातच दहावीनंतर ब्रेल पुस्तकेच उपलब्ध नाहीत. त्यामुळे कॅसेटवरून 'ऐकलेला' अभ्यास हाच एकमेव मार्ग त्यांच्यापुढे होता.

ज्या शाळेत शिकलो, त्याच शाळेचे मुख्याध्यापकपद भूषविण्याचा मान मिळाला याचा आनंद नक्कीच आहे. पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही मोठी आहे. गेल्या दहा वर्षांपासून ते कोरेगाव पार्क अंधशाळेत शिक्षकाची भूमिका बजावत आहेत. विद्यार्थिदशेतील सहअध्यायी आणि आताच्या विद्यार्थ्यांमध्ये जमीन-अस्मानाचा बदल झाला आहे. त्यांच्या गरजा, आव्हाने विस्तारली आहेत. व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मदत करणे ही मूलभूत गरज आहे. त्यासाठी दृष्टीहीन विद्यार्थ्यांनाही संगणकाधारित आधुनिक शिक्षण देणे हाच पर्याय आहे. पूर्णपणे दृष्टीहीन असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड वाढत आहे. राज्यात सध्या ४० शासकीय आणि १० खासगी अंधशाळा आहेत. त्यामधील कष्टाळू विद्यार्थी दहावी-बारावीची पायरी गाठतात. पण, त्यानंतर पुढे काय, असा प्रश्न त्यांच्यासमोरही उभा राहतो. सरकारी सेवेत अपंगांसाठी तीन टक्के जागा राखीव आहेत. त्यामधील एक टक्का दृष्टिहीन उमेदवारांसाठी आहे. त्या सर्व जागा भरण्याचा प्रामाणिक प्रयत्न झाला, तरी गुणवंत दृष्टिहीन विद्यार्थ्यांच्या भवितव्याची चिंता सुटेल.

अंशतः दृष्टिहीन उमेदवारांची या आरक्षित जागांवर वर्णी लागत आहे. पूर्णपणे दृष्टिहीन असलेल्या विद्यार्थ्यांना स्थिरतेची दारे बंद होत आहेत. या धोरणाशी लढा देण्याचेही आव्हान आहे, असे चंद्रकांत आवर्जून स्पष्ट करतात.

चंद्रकांत यांच्या या स्फूर्तीगाथेमागे त्यांची दृष्टिहीन पत्नी सुनीता यांचाही मोठा वाटा आहे. चौथीतील ऋतुराज आणि पहिलीतील क्षितीजा या मुलांबरोबरच आपल्या निवृत्त आई-वडिलांची जबाबदारीही चंद्रकांत सांभाळत आहेत.

समाजहिताने प्रेरित झालेल्या आंतरजातीय विवाहांना मान्यता मिळाली पाहिजे.

# मृद्गंध गिर्यारोहण गट

गिरिभ्रमणासाठी काम करणाऱ्या या गटाने वर्षभरात केलेल्या भ्रमंतीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे:

एकूण झालेले गिरिभ्रमणाचे कार्यक्रम - **सात**

भेट दिलेली ठिकाणे - **कल्याणगड (नांदगिरी), विसापूर, हरिश्चंद्रगड, राजगड, ढाक भैरी, वैराटगड, रोहिडेश्वर.**

सहभागी गिरिभ्रमणींची संख्या - ८०

८० गिरिभ्रमणींमध्ये १६ नव्याने संपर्कात आलेल्या व्यक्ती होत्या. यामध्ये भारतात प्रवासासाठी आलेल्या एका विदेशी पर्यटकाचाही समावेश होता.

प्रत्येक गिरिभ्रमणाचा कार्यक्रम हा नव्याने आनंद देणाराच असतो आणि सहभागी झालेल्यांनी हा आनंद मिळवलाच. झालेल्या भेटींपैकी दोन कार्यक्रमांचे वृत्त देत आहोत.

**किल्ले कल्याण गड (नांदगिरी)**

लोणंद फाट्याने वडूज गाव व तेथून उजवीकडे वळल्यावर नांदगिरी गाव लागते. पायथ्याशी असलेल्या वस्तीच्या पहिल्या घराच्या अलिकडेच वर जाण्यासाठी पायऱ्या दिसतात. मुख्य दरवाज्यापूर्वी एक लहानशी गुहा दृष्टीस पडते. गुहेत लहानसा चौथरा आहे. त्यास कोरीव खांब आहेत. तेथून वर गेल्यावर कल्याणगडाचे मुख्य प्रवेशद्वार लागते. आत दत्तमंदिरापर्यन्तच्या मार्गावर जेमतेम वीतभर उंचीचे पाणी गुहेत आहे. भोवताली मात्र शुद्ध पाण्याचे मोठ्या प्रमाणावर साठे आहेत. गुहेची लांबी वीस ते पंचवीस मीटर असावी. आत प्रकाशाचा एकही किरण येत नाही. या वातावरणात रहाण्याचा अनुभव वेगळाच; पण अनुभवावा असा आहे.

## वारी ढाक भैरीची

पंढरपूरला विठूरायाच्या दर्शनाला वारकरी तहानभूक विसरून, उन्हा-पावसाची तमा न बाळगता, दरवर्षी जातात. या वारकऱ्यांसारखीच गिरीभ्रमण करणाऱ्यांची मनस्थिती असते. एखाद्या ठिकाणी 'ट्रेकर्स' कितीवेळा जातील याला गणती नसते. मावळातील ढाक भैरी हे त्यातील एक ठिकाण.

वर्धिनीच्या मृद्गंध गिरिभ्रमण गटातील वारकऱ्यांचा एक मेळा नुकताच १९ जूनला 'ढाकच्या' दर्शनाला जाऊन आला. या भेटीच्या दरम्यान सर्वांना 'कार सेवेची' संधी मिळाली. गिरीभ्रमण प्रतिष्ठान, मुंबई ही मुंबईमधील गिरिभ्रमणींची एक संस्था. या संस्थेतील ६-७ जणांचा एक गटही याच वेळी तेथे आला होता व ढाक जवळील एका तळ्यातील गाळ काढायचे काम करीत होता. त्यांच्या या स्वयंस्फूर्त 'कारसेवेत' वर्धिनीचा गटही मिसळला आणि गाळ दुप्पट वेगाने उपसला जाऊ लागला. या कामाला वेग येण्यासाठी वर्धिनीतील गीतांची आणि घोषणांची खूपच मदत झाली.

अनेक प्रकारच्या सांसारिक आपत्ती येऊनही संत तुकाराम महाराजांनी साधना चालू ठेवली.
अशा महापुरूषांच्या आदर्शामुळे खडतर संकटांमध्येही संघर्ष चालू ठेवण्याची प्रेरणा आपल्याला मिळत रहाते.

# शारदामणि महिला विभाग

**हळदीकुंकू समारंभ -**

शुक्रवार दि. १५ फेब्रुवारी २००५ रोजी 'स्व'-रूपवर्धिनीतील स्वयंसहाय्यता बचतगटांतील महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम झाला. एकूण ८० जणी उपस्थित होत्या.

शिवगंगा-गुंजवणी खोऱ्यामध्ये गेली १० वर्षे महिला सबलीकरणाचे काम करणाऱ्या सौ. सुवर्णा गोखले प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच छत्तीसगढमधील शहाडोन येथील कार्यकर्त्या सौ. सुवर्णा योगेश याही याप्रसंगी उपस्थित होत्या.

भीमनगर येथील बचतगट सदस्या सौ. सरोदे यांनी गीत गाऊन कार्यक्रमाची सुरूवात केली; तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कुदळे यांनी केले.

महिलांमध्ये अंगभूतच बचत करण्याची सवय असते, अनुदाने व माफ होणारा खैरातीसारखा वाटला जाणारा पैसा हा अंगी लागणारा नसतो, असे सांगून स्वयंसहाय्यता समूह हा स्वतः तंदुरुस्त होण्यासाठीचा गट असेल असे सुवर्णाताईंनी सांगितले. बचतगट ही सुरुवात आहे, साध्य नाही - साधना आहे, यावर त्यांनी भर दिला. सुवर्णा योगेश यांनी आंध्र प्रदेशमधील अशिक्षित महिलांनी बचतगटांच्या माध्यमातून साधलेल्या प्रगतीची काही उदाहरणे सांगितली. श्रीमती पुष्पा नडे यांनी समारोप केला. वासंतीताई कुलकर्णी यांनी संचालन केले होते.

**सुंदर माझं घर**

'स्व'-रुपवर्धिनीच्या वास्तूसमोरील सदानंदनगर या सेवावस्तीमधील महिलांसाठी 'सुंदर माझं घर' अशी स्पर्धा घेण्यात आली. पंधरा निकषांवर तीन फेऱ्यांमधून विजेत्या महिलांची निवड झाली. एकूण ७८ महिलांनी या स्पर्धेत भाग घेतला. या सर्वांमधून विजयी तीन क्रमांक काढण्यात आले. सौ. उषाताई दांडेकर व स्नेहलता मुसळे या अंतिम फेरीसाठीच्या परीक्षक होत्या.

स्पर्धेचे निकष पुढीलप्रमाणे होते :-

घराची व परिसराची स्वच्छता * स्वच्छतागृहांमधील स्वच्छता * नीटनेटकेपणा *घरातील व्यक्तींचे आरोग्य * सार्वजनिक कार्यक्रमातील सहभाग * मुलांच्या भवितव्याबद्दल अपेक्षा * स्त्रीचे घरातील स्थान * सुंदरतेबद्दलची तिची कल्पना * स्त्रियांची कर्तव्ये व सामाजिक बांधिलकी.

रू. २५१/- चे प्रथम पारितोषिक सौ. अनिता तुकाराम बडदे, रू. १५१/- चे दुसरे पारितोषिक शहनाज बशीर शेख यांना तर रू. १०१/- चे तृतीय पारितोषिक सौ. वैशाली सतीश मंगळूरकर यांना मिळाले. स्पर्धेतील सर्व सहभागी महिलांना प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

आपली इच्छा आणि प्रयत्न समाजाच्या सर्व घटकांमध्ये फक्त आर्थिक आणि राजकीय 'समत्व' साधण्यापेक्षा संपूर्णपणे समरसता, एकात्मकता साधण्याची असली पाहिजे.

नानासाहेब परूळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्टचे विश्वस्त श्री. चं. ह. जोशी यांच्या हस्ते बक्षिस समारंभ झाला. परिसरासाठी त्यांनी 'स्वच्छ परिसर' ही स्पर्धा घोषित केली. श्री. जोशी यांनी उत्स्फूर्तपणे उपस्थित महिलांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली.

**कोसबाड अभ्यास सहल** – बालवाडी शिक्षिका आणि बालवाडी शिक्षिका प्रशिक्षक वर्गाच्या विद्यार्थिनी जव्हार व कोसबाड येथे अभ्यास सहलीस गेल्या होत्या. या अभ्यास सहलीत २८ जणींनी सहभाग घेतला.

कोसबाड येथील कै. ताराबाई मोडक यांनी उभा केलेला प्रकल्प सर्वांनी पाहिला. तेथे श्री. प्रकाश क्षीरसागर यांची भेट घेतली. श्रीमती अनुताई वाघ यांचे बरोबर काम केलेल्या सिंधुताई अंबिके यांच्याशी चर्चा झाली. जव्हार येथे प्रगती प्रतिष्ठानच्या कामालाही भेट दिली. या सहलीच्या निमित्ताने अनेकजणींनी प्रथमच घराचा उंबरा ओलांडला. तर काही विद्यार्थिनी अशा होत्या की ज्यांचा जन्म मुंबईत झाला, परंतु पहिल्यांदा त्यांनी समुद्रकिनाऱ्यावर पाऊल ठेवले होते. सहलीमधे खालील गोष्टी सर्वांनाच भावल्या.

- बालवाडी शिक्षिका अभ्यासक्रमाचा भाग म्हणून येथे शिवण व संगणक या विषयांचे शिक्षण दिले जाते.
- शाळेच्या भिंतींवर सुविचार व विविध विषयांची माहिती सुंदर अक्षरांमध्ये लिहिलेली होती.
- भेटीच्या दिवशीच कुसुमाग्रजांचा जन्मदिवस होता. एका विद्यार्थिनीने त्यांचे चरित्र व त्यांचे साहित्य याची थोडक्यात माहिती सांगितली. दिनविशेष सांगण्याचा हा उपक्रम स्तुत्य वाटला.

### ॐ नमस्ते गणपतये .....

सोमवार पेठेतील सूर्योदय मंडळाने गणेशजन्माच्या निमित्ताने कार्यक्रम ठरविला होता. यामध्ये सकाळी ७.०० वाजता अथर्वशीर्षाने कार्यक्रमाची सुरूवात करायची असे ठरले. अथर्वशीर्ष कोणाला म्हणायला सांगावे अशी चर्चा चालू असताना त्यांना कोणीतरी सांगितले की, वर्धिनीच्या बालवाडीतील विद्यार्थी स्पष्ट उच्चारात अथर्वशीर्ष म्हणतात. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्सुकतेने वर्धिनीशी संपर्क साधला व या कार्यक्रमाला बालवाडीच्या मोठ्या गटाला घेऊन जायचे ठरले.

बालवाडीतील 'पाकोळ्या' सकाळी स्वच्छ अंघोळ करून आपल्या पालकांसह उपस्थित झाल्या. बरोबर सात वाजता अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम सुरू झाला. सलग अकरावेळा अथर्वशीर्ष म्हणून मगच हा गट थांबला. या बालकांचे स्पष्ट उच्चार, आत्मविश्वास, लयबद्धता याचा विलक्षण प्रभाव परिसरात जाणवत होता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी या बालचमूचे खूप कौतुक केले, सर्वांना भरपूर प्रसाद दिला व वर्धिनीलाही रू.५०१/- ची देणगी दिली.

### आम्हाला सुट्टी का देता?

काही कारणाने संस्कार वर्ग चालवणाऱ्या तस्लीमताईंना वर्गाच्या वेळात येणे जमणार नव्हते म्हणून एकदा संस्कारवर्गाला सुट्टी दिली तर सर्व जण ताईंना म्हणाले ''ताई, शाखेला कधी सुट्टी असते का? मग आम्हाला सुट्टी का देता?

शेकडो वर्षांपासून चालत आलेले जुने विचार, पूर्वग्रह, अनिष्ट पद्धती, त्याज्य रीतीरिवाज केवळ उत्तम वक्तव्य आणि सदिच्छा यामुळे दूर होत नाहीत.

## गुंतूनी गुंत्यात साऱ्या ....

श्रीमती नीलाताई कुडलिंगार यांच्या मुला-मुलींमुळे त्यांचा वर्धिनीशी संपर्क आला. शिकायची प्रचंड हौस. सातवीच्या परीक्षेत जिल्ह्यात पहिल्या आल्या; परंतु नंतर लग्नामुळे शिकता आले नाही व पुढे लहान वयातच संसाराच्या चक्रात पूर्ण अडकून गेल्या. गेल्या दहा वर्षांपासून त्या वर्धिनीच्या ग्रंथालयाचे काम पहात आहेत. वर्धिनीत काम करताना अगदी मोजकं बोलणाऱ्या नीलाताईंच एक वेगळ रूप एका कार्यक्रमाच्या निमित्ताने अनुभवाला आले. काही दिवसांपूर्वी महिलांसाठी काम करणाऱ्या एका संस्थेच्या कार्यक्रमाला त्या गेल्या होत्या. जाईपर्यंत त्यांना आपल्याला तेथे प्रमुख वक्त्या म्हणून बोलावे लागेल याची कल्पनाही नव्हती. नाव पुकारल्यावर मात्र नाईलाज झाला व त्या बोलायला उभ्या राहिल्या. बोलायला सुरूवात केल्यावर अनेक वर्षांच्या कडू गोड अनुभवांच्या विश्वात केव्हा गेल्या हे त्यांनाच समजले नाही. स्वतःच्या जीवनातील अनुभव त्या सांगत होत्या. ऐकणाऱ्या भगिनींच्या चेहऱ्यावर आश्चर्य, गांभीर्य, आनंद, उत्सुकता अशा विविध छटा उमटत होत्या. हे अनुभवाचे बोलणे थांबूच नये असं वातावरण तयार झालं होतं. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व महिलांनी त्यांना जवळ जवळ घेरावच घातला. प्रतिकूल परिस्थितीतही नीलाताईंनी आपल्या मुलांना कसे वाढवलं- गुणी केलं हे जाणून घेण्याची ओढ त्या संवादात जाणवत होती. नीलाताई शांतपणे सांगत होत्या ''अहो आमच्या सगळ्या घराच्या पाठीशी 'स्व'-रूपवर्धिनी उभी होती म्हणून हे शक्य झालं.''

कार्यक्रम संपवून वर्धिनीत आल्या. संयोजकांनी दिलेले मानधन सहजपणाने वर्धिनीच्या कार्यालयात जमा केले आणि फार वेगळं काही झालं आहे, असा कोणताही भाव न आणता आपल्या कामात रमून गेल्या.

## संस्कार वर्गाची सुरूवात

श्रीमती तस्लीम फणीबंद या वर्धिनीच्या बालवाडी विभागात काम करणाऱ्या कार्यकर्त्या शिक्षिका. गेल्या सहा महिन्यांपासून त्या पूर्ण वेळ विस्तारक म्हणून काम पहात आहेत. वर्धिनीच्या इमारतीसमोर रस्त्यावर कायम खेळणाऱ्या मुलामुलींना एकत्र करून त्यांनी एक संस्कार वर्ग २९ ऑगस्टपासून सुरू केला आहे. रस्त्यावर प्रचंड दंगामस्ती करणाऱ्या या मुलामुलींना प्रत्यक्ष मैदानावर खेळ खेळताना मात्र अडचणी येऊ लागल्या. हळूहळू त्यांचे शरीर मैदानी खेळाला सरावले. आता ही सर्व मंडळी छान खेळतात, गाणी म्हणतात, गोष्टी ऐकतात - सांगतात. इयत्ता १ली ते ७वी या मिश्र वयोगटातील मुले-मुली या संस्कार वर्गाला येतात. दररोजची उपस्थिती पंचवीसच्या पुढे गेली आहे. वर्धिनीची प्रार्थना म्हणायला ते शिकत आहेत. स्वातंत्र्यदिनानिमित्त या वर्गातील सर्वांनी सुंदर चित्रे काढली. दुपारी चार ही वर्गाची वेळ असली, तरी सर्वजण वेळेच्या खूप आधी येतात. त्यांना या वर्गाची ओढ लागत आहे, हे मात्र यातून नक्की जाणवते आहे.

मै नही, तूही ।

## आनंद पहिल्यावहिल्या सहलीचा

या संस्कार वर्गाची एक सहल कात्रज उद्यान व दूध डेअरी येथे गेली होती. त्या सहलीचा वृत्तांत:

आपली सहल जाणार ऐकून मुलं खूप खूष होती. घरी गेल्याबरोबर त्यांनी पालकांना सहलीबाबत सांगितले. काही मुलांच्या पालकांनी परवानगी दिली नाही. ही मुलं हिरमुसली. त्यांच्या घरी जाऊन परवानगी काढली. पालकांनी सांगितले "अहो आमची मुलं कशी आहेत आम्हाला माहिती आहे!, ती खूप मस्ती करतात. काही झालं तर काय करायचं?" पालकांच्या शंका रास्त होत्या, परंतु वर्धिनीच्या वातावरणात मुले शहाणी होतात, या अनुभवाच्या बळावर पालकांची समजूत घातली व ते तयार झाले.

* रविवार दि.२० नोव्हेंबर रोजी सकाळी पालक मुलांना सोडायला आले. बहुतेक मुलं गाडीत पहिल्यांदाच बसत होती आणि इतक्या संख्येने एकत्र पहिल्यांदाच जात होती, असं त्यांच्या वागण्यातून जाणवत होतं. उर्दू प्रार्थना आणि श्री गणरायांचा जयघोष करून प्रवासाची सुरूवात झाली. सुनील, अकीम, प्रशांत, हिना, पूजा, त्रिशाला या सर्वांनी गाडीत खूप पद्ये म्हणली.
* कात्रज सर्पोद्यानात पोहोचल्यावर तेथील विविध प्रकारचे साप पहाताना मुलांच्या चेहऱ्यावरचे भाव पहाण्यासारखे होते.
* तेथील बागेत ज्ञानेश पुरंदरे यांनी त्यांचे खूप खेळ घेतले. सर्व खेळ मुलांना नवीन होते व खूप आवडलेही. या सहलीनंतर मुलं हे खेळ संस्कार वर्गात तर खेळतातच; पण रस्त्यावरच्या खेळातही हे नवे खेळ दिसत आहेत.
* कात्रज डेअरीमध्ये दुधाचे पॅकिंग कसे करतात, दुधावरच्या विविध प्रक्रिया काय असतात, हे मुलांनी तेथे पाहिले. तेथील सुगंधी दुधाचा आस्वादही त्यांनी घेतला.
* जेवायला बसताना आधी हात धुवायचा असतो हे त्यांना प्रथमच समजले. पुरंदरे सरांनी व तस्लीमताईंनी डबा आणला नव्हता; परंतु सर्व मुलांनी आग्रह करून त्यांना आपल्या डब्यातील पदार्थांचा आस्वाद घ्यायला लावला.
* डॉ. विनेश नगरे व त्यांच्या पत्नी सौ मेघा नगरे यांनी त्यांच्या लग्नाचा वाढदिवस या सहलीत सहभागी होऊन साजरा केला.

### निमित्त सहस्रचंद्रदर्शनाचे

समाजाला सतत काहीतरी देण्यातच आनंद शोधणारी काही माणसं असतात. श्री. अच्युतराव दांडेकर हे त्यातीलच एक. वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने त्यांच्या कुटुंबियांनी सहस्रचंद्रदर्शनाचा कार्यक्रम ठरविला. परंपरेला मान देऊन श्री. अच्युतराव यांनी कार्यक्रमाला नाही म्हटले नाही, परंतु या कार्यक्रमाला वेगळे रूप दिले. या निमित्ताने कष्टाने मिळवलेले सहस्रावधी रूपये त्यांनी पाच सामाजिक संस्थांना देणगी म्हणून दिले. 'स्व'-रूपवर्धिनीला या कार्यक्रमात पाच हजार रुपयांची देणगी श्री. दांडेकर यांनी दिली.

असाच पिंड असलेले ज्येष्ठ तत्वचिंतक, पत्रकार श्री. बापूसाहेब भिशीकर यांनीसुद्धा जनसेवा बँकेने त्यांचा जनसेवेबद्दल जो गौरव केला व त्याप्रीत्यर्थ त्यांना जो निधी अर्पण केला, ती सर्व रक्कम पाच सामाजिक संस्थांना देणगी रूपात दिली. 'स्व'-रूपवर्धिनीला पाच हजार रुपयांची देणगी श्री. भिशीकर यांनी दिली.

शिक्षणाचे संस्कार देशाच्या अगदी कानाकोपऱ्यापर्यंत राहणाऱ्या आपल्या बांधवांपर्यंत पोहचवायचे आहेत.

**उद्योगशिक्षण वर्ग**

शारदामणी महिला विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या उद्योगशिक्षण वर्गांपैकी होमनर्सिंग कोर्स मध्ये २९ विद्यार्थिनी, शिवण वर्गामध्ये २१ विद्यार्थिनी तर बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गात १० विद्यार्थिनी आहेत. या सर्व प्रशिक्षणार्थी मुली व महिलांना दर शुक्रवारी वर्तमानपत्रातील काही लेख वाचून दाखविले जातात. नागपंचमीच्या दिवशी या विद्यार्थिनी व बचत गटातील काही महिला अशा सुमारे १२५ महिलांनी पारंपारिक पद्धतीने विविध खेळ खेळून, फेर धरुन नागपंचमी साजरी केली.

**होम नर्सिंग कोर्स** -विद्यार्थीनी संख्या - २९

* श्रावण महिन्यात पारंपारिक सण साजरे केलेच; परंतु हरतालिकेच्या दिवशी पारंपारिक पूजेत वापरल्या जाणाऱ्या पत्रींचे शास्त्रीय महत्त्व मुलींना सांगितले.
* शरीरशास्त्राच्या अभ्यासक्रमात हृदय, फुफफुसे, डोळा, किडनी, यकृत ह्या अवयवांचा अभ्यास घेतला गेला. अभ्यासासाठी या अवयवांच्या मॉडेल्सचा उपयोग केला होता.
* 'लैंगिक शिक्षण' या विषयावरची ध्वनी-चित्रफीत विद्यार्थिनींना दाखवण्यात आली.
* नवरात्रीनिमित्त संस्कारभारती संस्थेच्या महिला कार्यकत्यांनी विविध पारंपारिक भारतीय खेळांचा व गीतांचा कार्यक्रम वर्धिनीत सादर केला होता. होमनर्सिंगमधील विद्यार्थीनींना यातील खेळांचा नंतर सराव केला व सहकारनगर येथील एका स्पर्धेत सहभाग घेतला व तिसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळवले. असेच बक्षिस त्यांनी भोसरी येथील स्पर्धेमध्ये मिळवले.
* सामाजिक प्रकल्प भेटीमध्ये वानवडीच्या अपंग कल्याणकारी संस्थेला भेट देण्यात आली.

**शिवण :** या अभ्यासक्रमासाठी २१ महिलांनी प्रवेश घेतला. बेसिक टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग अशा दोन प्रकारचे वर्ग घेतले जातात.

**बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण :** या अभ्यासक्रमासाठी १० महिलांनी प्रवेश घेतला आहे. अभ्यासक्रमाचा भाग म्हणून या विद्यार्थिनींना संस्थेच्या बालवाडी मध्ये दररोज सराव प्रशिक्षण दिले जाते.

**साक्षरता वर्ग :** आंबेडकर समाजमंदिर, मरियमनगर व शिवाजी आखाडा या परिसरात साक्षरता वर्ग चालू आहेत. एकूण उपस्थिती ४५. या वर्गाचा जाणवलेला परिणाम असा -

* गोविंद व गुरू या दोघांनी ५वी व ६वी मधे प्रवेश घेतला
* वर्गातील काही महिलांनी घरगुती व्यवसाय सुरू केले आहेत व या महिला आता वर्धिनीने चालविलेल्या बचत गटांमध्ये हिरीरीने भाग घेतात. बँकेचे व्यवहार आता या वर्गातील काही महिला करू शकतात.
* या वर्गातील काही महिला आता वर्धिनीत सुरू असलेल्या शिवण वर्गात प्रवेश घेणार आहेत.

आपल्या माताभगिनींच्या मनात कोणत्याही कारणाने अगतिकतेची, न्यूनगंडाची भावना निर्माण होऊ देता कामा नये.

* डेक्कन जिमखाना लायन्स क्लबच्या अध्यक्षा सौ.जयश्री मेहता व त्यांच्या क्लबचे सहकारी दि. ४ ऑक्टोबर रोजी वर्धिनीत आले. वर्धिनीच्या आरोग्य प्रकल्पासाठी औषधे व कामाला सहाय्य म्हणून सहा हजार रुपयांची देणगी यावेळी वर्धिनीला देण्यात आली.

## बक्षिसाचा आनंद त्यांनी आणखी मोठा केला !

होमनर्सिंग मधील विद्यार्थिनींनी नवरात्र महोत्सवानिमित्त सहकारनगर व भोसरी येथे झालेल्या स्पर्धेत भाग घेतला व भारतीय खेळांचे सुंदर प्रात्याक्षिक सादर करून तिसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळवले. रू. ५०१/- रोख रक्कम व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हे बक्षिस घेऊन आल्यावर या विद्यार्थिनींनी त्या पैशातून जिलेबी खरेदी केली व वानवडी येथील अपंग कल्याणकारी संस्थेच्या विद्यार्थ्यांना भेट म्हणून दिली. हा कार्यक्रम २० ऑक्टोबर रोजी झाला. बक्षिसाचा आनंद द्विगुणीत करण्याची त्यांची कृती निश्चितच अभिनंदनीय व अनुकरणीय आहे. ☺

## प्रेरणा शिबिर - महिला विभाग

३ ते ८ जून, २००५

उपस्थिती १५, शिबिरप्रमुख - तस्लीम शेख

'स्व'-रूपवर्धिनीच्या इमारतीत झालेल्या या शिबिराला मार्गदर्शन करण्यासाठी, अनुभव मांडण्यासाठी अनेक वक्ते आले होते. त्यांनी मांडलेले विषय खालीलप्रमाणे -

- कु. तेजश्री शेंडे : कामाचे नियोजन
- डॉ. रश्मी गपचूप : महिला आरोग्य
- सौ. कुंदाताई वर्तक : बालशिक्षण (कीर्तन)
- सौ. स्नेहा गिरिधारी : माहितीचा अधिकार
- सौ.राजलक्ष्मी देशपांडे : भारतीय संस्कृती
- श्री. यशवंतराव लेले : पंडिता रमाबाई
- श्री. रामभाऊ डिंबळे : महिला कार्यकर्ती
- श्रीमती विद्याताई बापट : वेळेचा सदुपयोग
- सौ. सुनिला गोंधळेकर : पाणी
- श्री. सुहासराव काणे : अंटार्क्टिक मोहिमेतील अनुभव
- ॲड. श्री. रवी यादव : अपरिचित जिजामाता
- ॲड. सौ. निलिमा गोखले : येसू वहिनी
- सौ. उषाताई दांडेकर : खेळातून प्रबोधन
- सौ. उमा भरते : 'तूच तुझ्या जीवनाचा शिल्पकार'

समाजाचे पुनुरुत्थान करण्याचे कार्य मातांनी निर्धाराने हाती घेतले तर त्यांना पराभूत करु शकेल अशी कोणतीही शक्ती या लोकात नाही, परलोकातही नाही.

## स्वयंसाह्यता समूह

वर्धिनीचे काम ज्या ज्या भागांमध्ये चालू आहे, ते बहुतेक सर्व भाग आर्थिक किंवा सामाजिक दृष्ट्या कमकुवत समाज घटकांनी व्याप्त नागरी वस्त्यांचे आहेत. अशा वातावरणात राहणाऱ्या महिलांना रोजच्या जीवनात खूप संघर्ष करावा लागतो. आर्थिक दुर्बलता हे त्याचे प्रमुख कारण. अशा महिलांना स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून सक्षम कसे होता येते, याची अनुभूती द्यावी व असे गट स्थापन करायला प्रोत्साहन द्यावे असे वाटल्याने महिला विभागातील कार्यकर्त्यांनी या विषयात पुढाकार घेतला. असे गट स्थापन करायचे तर त्यांचे तसे प्रशिक्षणही व्हायला हवे. या हेतूने एक कार्यशाळाही घेण्यात आली.

**कार्यशाळा -**

दि.१७ मार्च २००५ स्थान - 'स्व'-रूपवर्धिनी सौ. वासंतीताई कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. महिलांनी एकत्र येऊन बचत गटामध्ये फक्त पैशाच्या व्यवहारांपुरते मर्यादित न रहाता आपल्या अडीअडचणी सुख दःखांचीही चर्चा करावी व एकमेकींना सहाय्य करण्यासाठी सक्षम व्हावे, या हेतूने कार्यशाळेचे आयोजन केले आहे असे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेस २० महिला उपस्थित होत्या. त्यांच्याकडून गटातील महिलांना कसे प्रशिक्षित करावे या विषयीची एक प्रश्नावली भरून घेण्यात आली. बचत गटातून महिलांचे सक्षमीकरण व्हावे, आर्थिक स्वावलंबन व्हावे यावर प्रामुख्याने भर असावा असे सर्वांना सांगण्यात आले. सौ. बागेश्री पोंक्षे यांनी या कार्यशाळेचे संचालन केले.

---

### दोन नवीन बचत गट

विश्वकर्मा विद्यालय, सुखसागरनगर येथील महिलांनी त्यांच्यासाठी बचतगट सुरू करण्याची इच्छा व्यक्त केली. पहाता पहाता नंतरच्या काही दिवसात या महिलांचे दोन बचत गट सुरुही झाले. या बचत गटातील ३-४ महिला वर्धिनीत प्रत्यक्ष आल्या व वर्धिनीमार्फत चालविल्या जाणाऱ्या उद्योग शिक्षण वर्गाची माहिती घेऊन गेल्या. स्वावलंबी होण्यासाठी त्यांनी दाखविलेला उत्साह खरोखरीच काम करणाऱ्यांना प्रोत्साहित करणारा आहे.

### ज्ञानप्रबोधिनी - बचत गट मेळावा

खेड शिवापूर येथे ३ एप्रिल, २००५ या दिवशी पार पडलेल्या कार्यक्रमात वर्धिनीच्या माध्यमातून वीस महिला उपस्थित होत्या. वस्तू विक्रीसाठी तेथे एक स्टॉलही मांडला होता. स्टॉलवर या महिलांनी तयार केलेले दागिने व इतर वस्तू उदा. लोणची/पापड इ. वस्तू मांडल्या होत्या. एकत्र येऊन आपण तयार केलेल्या वस्तू कशा मांडाव्यात, त्याची विक्री कशी करावी, असा एक वेगळा अनुभव महिलांना आला.

ज्यांना रोज धड खायला मिळत नाही असे असंख्य लोक आपल्या समाजात आहेत.
त्यांचा कळवळा आपल्याला येतो का ? त्यांच्यासाठी आपण काही करतो का ?



**मला गं बाई जाग आली, अन् सार बदललं !**

स्वयंसहाय्यता गट कार्यान्वित करण्यामागे वर्धिनीचा उद्देश थोडा वेगळा आहे. केवळ बचतीसाठी नाही, तर सुखदुःखांची देवाण घेवाण करण्यासाठी, अडीअडचणी मोकळेपणाने सांगण्यासाठी, नवनवीन विचार ऐकण्यासाठी-वाचण्यासाठी महिलांनी एकत्र यावे, याच हेतूने दि. २७ जुलै रोजी सादर झालेला 'व्हय मी सावित्री बोलतेय' हा कार्यक्रम झाला. सौ. सुमनताई पुंडे यांनी या एकपात्री कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांचे चरित्र साभिनय सादर केले. सावित्रीबाईंनी त्यांच्या जीवनात केलेला संघर्ष ऐकून अनेक महिलांच्या डोळ्यात पाणी उभे राहिले. त्यांनी सांगितलेले शिक्षणाचे महत्त्व उपस्थित महिलांच्या मनात नक्कीच ठसले असे जाणवले. एकूण १२५ महिला उपस्थित होत्या. याच कार्यक्रमात बालशाखेच्या दोन विद्यार्थिनींनी 'पाणी' या विषयावर छोटे कीर्तन सादर केले.

**स्वावलंबी होण्याच्या दिशेने**

'भाग्यलक्ष्मी' बचतगटातील महिलांनी राख्या तयार करून विकण्याचा उपक्रम यशस्वी केला. या सुंदर राख्यांची विक्री बाजारभावापेक्षा कमी दरात तर झालीच; शिवाय या महिलांना राख्यांच्या विक्रीतून नफाही मिळाला. दिवाळीच्या निमित्ताने उटणे विक्रीचा उपक्रमही यशस्वी करून गटातील महिलांनी स्वावलंबी होण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले.

---

## बालवाडी वर्षभरातील कार्यक्रम

वर्षभर लहान मोठे कार्यक्रम, उपक्रम होतच असतात. यावर्षी मुलांना खूप गोष्टी ऐकायला मिळाल्या. (स्वा. सावरकर, रामभक्त हनुमान, कृष्ण-सुदामा, इ.) तसेच सणांच्या निमित्ताने आपल्या संस्कृतीची ओळख मुलांना करून देण्यात आली. यादृष्टीने खालील कार्यक्रम झाले.

पर्यावरण रक्षण फेरी (वटपौर्णिमा), दीप पूजा (दीपअमावास्या), दहीहंडी व गोपाळकाला (कृष्णजन्माष्टमी), सागरी जीवनावरचे नाटुकले (नारळी पौर्णिमा), वारुळ तयार करुन त्याभोवती फेर (नागपंचमी), भोंडला (नवरात्र), दिवाळी आनंदोत्सव, मासिक वाढदिवस कार्यक्रम (औक्षण)

या व्यतिरिक्त छोट्या कुंड्या रंगवणे, कुंड्यांमध्ये माती भरणे असे मुलांना आवडणारे प्रकल्पही घेण्यात आले.

महाभारतात एक श्लोक आहे - 'जो अपमान निमूटपणे सहन करतो, ज्याच्या अंगी धमक नाही, पुरुषार्थ नाही, आणि ज्याच्यामुळे शत्रुपक्षाला आनंद होतो असा पुत्र कोणत्याही स्त्रीच्या पोटी जन्माला येऊ नये.'

**थेंबे थेंबे तळे साचे**

बालवाडीत येणाऱ्या आपल्या पाल्याने हट्ट केला म्हणून त्याला खाऊला पैसे देण्याची सवय काही पालकांना होती. लहान मुलांच्या हातात नाणे देणे धोक्याचे. पालक सभेत सांगूनही मुलांचा हट्ट पुरवणे सुरूच होते. इ.स. २००० च्या अखेरीला एका पालकसभेत सांगितले गेले की, यापुढे कोणा विद्यार्थ्याच्या जवळ पैसे आढळले तर ते जप्त करून त्याच्या नावे वहीत लिहून ठेवले जातील व वर्ष संपेपर्यंत परत दिले जाणार नाहीत. अल्पबचतीची सुरूवात अशी थोडीशी सक्तीने झाली खरी; पण आपल्या पाल्याच्या नावाने बँक खाते सुरू झाले, त्याच्या नावे पैसे जमा व्हायला लागले, याचा नेमका हेतू समजलेल्या पालकांनी मग या बचत योजनेत सहभाग घ्यायला सुरूवात केली. २००१ वर्षी ही बचत खाती सुरू झाली. **आज सुमारे १२० खातेधारक आहेत.** सौ. उषाताई पोफळे या वर्धिनीच्या एक पालक कार्यकर्त्या याचे काम पहातात. **२००१ ते २००५ या पाच वर्षांच्या कालावधीत या सर्व बचत खात्यांवर एकूण सुमारे चार लाख रूपयांची बचत रक्कम जमा झाली.** कष्टाचे जीवन जगणाऱ्याला बचत करून जमा केलेले पैसे उपयोगी पडतात. त्यामुळे आता स्वयंस्फूर्तीने सहभाग घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे. या वाटचालीतील हे आहेत काही प्रेरक अनुभव -

- सुनील भडाळे हा चहाच्या दुकानातील कामगार. दिवसातून कधीतरी वर्धिनीत चहा घेऊन येणारा. हळूहळू त्याला या बचत योजनेचे महत्त्व लक्षात आले. तोही सहभागी झाला.
- सखुबाई नामदास या एका पाल्याच्या आजी. भंगार गोळा करण्याचे काम करतात. त्याची विक्री करून मिळणाऱ्या पैशातील काही रक्कम त्यांनी बचत खात्यावर जमा करायला सुरूवात केली. आपल्या खात्यावरची एकूण जमा चार आकडी रक्कम पहाताना त्यांचा चेहरा खुलतो.
- बालवाडीत येणाऱ्या आपल्या नातींसाठी सौ. माया हके यांनी खाते सुरू केले. मोलमजुरी करून मिळालेली रक्कम या खात्यावर त्यांनी वेळोवेळी भरली. खात्यावरील ही रक्कम आता कायम ठेवीत गुंतविण्याचा त्यांचा विचार आहे.

*With Best Compliments From :*

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

**Plot No. 4, S. No. 17/1 – B, Kothrud Industrial Estate,**
**Kothrud, Pune - 411 038**
**Phone : 25431474, 25441124, 25464551**

वाममार्गाने मिळविलेल्या पैशाच्या दूषित अन्नाचा एक कण देखील तोंडात घालणार नाही
अशी संपूर्ण कुटूंबाने प्रतिज्ञा केली पाहिजे.

## अंधत्व निवारण प्रकल्प :

दीनानाथ रूग्णालय व ऑपरेशन आयसाईट युनिव्हर्सल यांच्या सहकार्याने चालणाऱ्या या प्रकल्पात वैद्यकीय सेवा, आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण, आरोग्यविषयक जाणीव-जागृती, समाज प्रबोधन, वृक्षारोपण अशा प्रकारच्या सेवा दिल्या जातात. या वर्षातील महत्त्वाच्या घटनांची माहिती पुढील प्रमाणे :

✣ दि. १९ जानेवारी २००५ रोजी नविन भीमनगर येथे श्री रामायण मित्र मंडळ यांच्या सहकार्याने डोळयांचा दुसरा दवाखाना सुरू करण्यात आला. दर शुक्रवारी दुपारी १.३० ते ४.३० या वेळेत बाह्यरूग्ण विभाग सुरू असतो.

✣ दि. २६ जानेवारी २००५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने पाच वस्त्यांमध्ये चित्रकला व रांगोळी स्पर्धांचे आयोजन केले होते. चित्रकला स्पर्धेमध्ये २१४ मुले (१११ मुले व १०३ मुली) व रांगोळी स्पर्धेमध्ये ५२ मुलांनी (२६ मुले व २६ मुली) भाग घेतला.

✣ 'अ' जीवनसत्व मिळवून देणाऱ्या वनस्पतींविषयी जागृती निर्माण करण्यासाठी वस्त्यांमध्ये पपई, शेवगा, कडीपत्ता, आंबा, भोपळा या वृक्षांचे रोपण केले. लहान मुलांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेल्या हिरव्या पालेभाज्यांची लागवड करण्यासाठी प्रत्येक वस्तीमध्ये हिरव्या पालेभाज्यांचे बियाणे व कुंड्या पुरविण्यात आल्या.

✣ वस्त्यांमधील वेगवेगळ्या सामाजिक व आरोग्य विषयक समस्यांवर प्रबोधन करण्यासाठी भारती विद्यापीठाच्या समाज सेवा केंद्राचे विद्यार्थी व एसएनडीटीच्या गृहशास्त्र शाखेच्या विद्यार्थिनींनी मुलांचे आरोग्य, गर्भवती महिलांनी घ्यावयाची काळजी, एच.आय.व्ही. / एडस् बालविवाह, हुंडा पद्धती आणि व्यवसनांचे दुष्परिणाम या विषयांवर पथनाट्य सादर केले.

✣ दि. २५ फेब्रुवारी २००५ रोजी मंगळवार पेठ व कसबा पेठ भागातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांकरिता मुलांमधील डोळ्यांचे आजार शोधण्याविषयी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन बाबूराव सणस कन्या शाळेमध्ये केले होते. एकूण १२ शाळांचे २० शिक्षक या कार्यक्रमास उपस्थित होते.

✣ दि. ८ मार्चचा जागतिक महिला दिन हा 'महिला सप्ताह' म्हणून साजरा केला. यामध्ये महिलांचे हक्क, महिलांसाठीचे कायदे याविषयी जागृती करण्यासाठी सर्व वस्त्यांमध्ये प्रबोधनाचे कार्यक्रम घेतले. वस्तीपातळीवर आरोग्यविषयी माहिती देणे, महिलांचे हक्क व कायदेविषयी फिल्म्स दाखवणे, माहितीपर सत्राचे आयोजन करणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

✣ वस्तीतील महिलांना 'अ' जीवनसत्वयुक्त आहार, स्तनपान, कुटुंबनियोजन, डोळ्यांची काळजी, लसीकरण, लहान मुलांचे आरोग्य, अतिसार नियंत्रण याविषयी वेगवेगळ्या माध्यमांद्वारे माहिती देण्यात आली.

आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण

मातांवर समाजाच्या उगवत्या पिढीचे संगोपन करण्याची विशेष जबाबदारी आहे.

वर्गामध्ये फिनेल व लिक्विड साबण तयार करण्याचे प्रशिक्षण १६ महिलांना देण्यात आले.

✣ १०९ मुलांना विशेष उपचारासाठी बालरोगतज्ञ व नेत्ररोगतज्ञांकडे पाठविण्यात आले होते.

✣ दि. १५ एप्रिल, १३ मे व १५ जून या दिवशी कावीळ ‘ब’ लसीकरण शिबिर जूने भीमनगर येथे घेण्यात आले. लसीकरण शिबीराची आकडेवारी पुढीलप्रमाणे

| डोस | १५ एप्रिल | १३ मे | १५ जून |
|---|---|---|---|
| १ला | १३० | १०० | ७८ |
| २रा | - | ६० | ३७ |
| ३रा | - | - | १२ |
| एकूण | १३० | १६० | १२७ |

वस्त्यांमध्ये वैयक्तिक स्वच्छता, लसीकरण, ‘अ’ जीवनसत्व या विषयी वस्तीतील स्वयंसेवकांमार्फत पथनाट्य घेण्यात आले.

✣ दि.२२ जून २००५ रोजी मंगळवार पेठेतील अंगणवाडी प्रकल्पाच्या शिक्षकांना डोळ्यांचे आजार शोधण्याविषयी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संजीवनी हॉस्पीटलमध्ये घेण्यात आला. ‘स्व’-रूपवर्धिनीच्या व कोथरूड भागातील बालवाडी शिक्षिकांनी देखील कार्यक्रमामध्ये उत्स्फुर्त सहभाग घेतला.

✣ दि. १७ एप्रिल २००५ रोजी जूना भिमनगर मध्ये मोतीबिंदू तपासणी शिबीराचे आयोजन केले होते.

प्रकल्पामार्फत वेगवेगळ्या संस्थांनी तयार केलेल्या सामाजिक जाणिव जागृती विषयी तसेच महिलांचे हक्क व कायदेविषयी प्रबोधन करण्यासाठी टि. व्ही. फिल्म्स वस्तीमध्ये दाखविण्यात आल्या.

महिलांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी दागिने तयार करणे, मेंदी काढणे याच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन कागदीपुरा येथे करण्यात आले होते.

* महिलांसाठी चालू केलेल्या तपासणी केंद्रामध्ये ४६९ महिलांनी वैद्यकीय सेवेचा लाभ घेतला.
* जनशिक्षण संस्थांच्या सहकार्याने जूना बाजारमध्ये दोन वेळा प्रौढ साक्षरता वर्ग सुरू करण्यात आले आहे.
* दि. १ व २ जुलै रोजी जनशिक्षण संस्थान व राज्य साधन केंद्र यांच्या सहकार्याने भारतीय शिक्षण संस्थेमध्ये लोकसंख्या शिक्षण याविषयी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली.
* १ ते ८ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय स्तनपान सप्ताह म्हणून राबविण्यात आला.
* दि. १२ ऑगस्ट ०५ रोजी प्रकल्पाचा डोळयांचा तिसरा दवाखाना जुना बाजार येथे सुरू करण्यात आला. दर शुक्रवारी दुपारी २.३० ते ४.३० या वेळेत हा दवाखाना चालू आहे.
* जुना बाजार येथील अंजुमन तरूण मंडळाच्या मदतीने मंगळवार पेठेतील मशिदीच्या मौलवी सदस्यांची मिटींग आयोजित करण्यात आली होती. प्रकल्पाच्या कामामध्ये लोक सहभाग वाढविण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

आपल्या कोणत्याही भगिनीला, मातेला, रस्त्यावरील उपेक्षित जीवन कंठावे लागू नये यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे.

* बाबुराव सणस कन्याशाळेतील सर्व मुलींची डोळयांची प्राथमिक तपासणी शिक्षकांमार्फत केल्यानंतर नेत्रदोष आढळलेल्या ४०० मुलींवर संजीवन हॉस्पीटलमध्ये उपचार करण्यात आले.

* प्रकल्पामार्फत वेगवेगळया संस्थांनी तयार केलेल्या फिल्म्स वस्तीमध्ये दाखविण्यात आल्या. 'अ' जीवनसत्व मिळवून देणाऱ्या व लोहाची मात्रा शरीरात वाढविणाऱ्या अन्न पदार्थाचे प्रात्यक्षिक वस्तीमध्ये करण्यात आले.

**या कामाव्यतिरिक्त मुख्य काम वैद्यकीय सेवेचे होते, याचा तपशील पुढीलप्रमाणे :-**

| विषय | एकूण रूग्णांची संख्या | पुरूष | महिला | मुलं | मुली |
|---|---|---|---|---|---|
| डोळ्यांची तपासणी | ११३६ | २९४ | ७१० | ५७ | ७५ |
| चष्मेवाटप | ४७७ | १४२ | २८२ | २२ | ३१ |
| मोतीबिंदू शस्त्रक्रिया | २३ | २१ | २ | - | - |
| मुलांची आरोग्य तपासणी | ३५४० | - | - | १७८२ | १७५८ |
| विविध आजारांवर उपचार | १२७४ | | | | |
| जंताचे औषध व अ जीवनसत्वाचा डोस | १४९० | | | | |
| कुपोषणावर उपचार | ७६९ | | | | |
| 'अ' जीवनसत्वाचा डोस (स्तनदा मातांना) | १५० | | १५० | | |
| आरोग्य तपासणी | ८२ | | ८२ | | |

* दि.१६ जुलै व १५ ऑगस्ट रोजी कावीळ व लसीकरण शिबिरे जुने भीमनगर येथे घेण्यात आली.


| दिनांक | एकूण | प्रौढ | | बालक | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्री | मुले | मुली |
| १६ जुलै | ३० | ०१ | ०४ | १७ | ०८ |
| १५ ऑगस्ट | ३१ | - | ०५ | १४ | १२ |

उदात्त मानवी भावनांच्या हाकेला प्रतिसाद मिळू नये, एवढ्या प्रमाणात आपल्या समाजातील अंगभूत सत्प्रवृत्तीचा लोप झाला आहे असे मुळीच वाटत नाही.



प्रकल्पांतर्गत सेवावस्तीतील मुलांची आरोग्य तपासणी करताना

लोहाची मात्रा शरीरात वाढविणाऱ्या अन्न पदार्थाचे प्रात्यक्षिक वस्तीमध्ये दाखविताना



*अकृत्रिम स्नेहाची ऊब*

वर्धिनी सुरु होऊन काही महिनेच झाले होते. दिवस थंडीचे होते. एक वर्धक टागोर विद्यानिकेतन शाळेच्या पायऱ्यांवर शाखेच्या वेळेच्या आधीच येऊन बसला होता. संस्थापक (कै.) किशाभाऊ पटवर्धन सर तेथे आले व त्याच्या शेजारी येऊन बसले. त्याच्याशी गप्पा मारु लागले. गप्पा मारता मारता ६वी - ७वीतला हा वर्धक त्यांच्या शेजारी सरकत सरकत हळू हळू त्यांना चिकटून बसला. कै. पटवर्धन सरांच्या लक्षात आले की, या विद्यार्थ्याच्या अंगात बनियनही नाही आणि स्वेटरही नाही. त्यांनी आपला स्वेटर काढला त्या वर्धकाला दिला आणि म्हणाले थंडी असेल तेव्हा न विसरता हा स्वेटर घालत जा. घरच्या बिकट परिस्थितीमुळे स्वेटर घेण्याची चैन न परवडणाऱ्या त्या वर्धकाला स्वेटरही मिळाला आणि अकृत्रिम स्नेहाची उबही. त्याच बळावर तो आज उभा आहे, कार्यरत आहे.

अंत:करणाच्या जिव्हाळ्यावर मात करु शकेल असा एकही वाद वा विचार अस्तित्वात नाही.

## सहज कृतीने साधलेला परिणाम

सामाजिक कामात राहिल्यामुळे कार्यकर्त्यांचा इतरांशी होणारा सहज व्यवहारसुद्धा विलक्षण परिणाम साधणारा ठरतो. कार्यकर्त्याच्या एखाद्या सहज कृतीने भारावून जाऊन माणसे कायमची कामाला जोडली जातात. असेच दोन प्रसंग आहेत, एक अगदी अलिकडचा तर एक सुमारे दहा वर्षांपूर्वीचा.

* श्री. मंगेश निवंडीकर हे वर्धिनीचे कार्यकर्ते मित्रासमवेत चित्रपट पहायला गेले होते. चित्रपट पाहून बाहेर आल्यावर त्यांच्या लक्षात आले की, इतर अनेक प्रेक्षकांप्रमाणेच त्यांचीही स्कूटर चुकीच्या ठिकाणी लावली गेल्याने रस्तावाहतूक पोलीस प्रत्येकाकडून दंड वसूल करीत आहेत. वेळ रात्रीची होती. श्री. निवंडीकर यांनी दंड भरला व ते निघाले. निघताना त्यांच्या लक्षात आले की, एक युवती जराशी भांबावलेली आहे. चौकशी केल्यावर समजले की तिच्याकडे पोलिसांनी मागितलेला दंड भरायला पैसे नाहीत. श्री निवंडीकर यांनी तिचाही दंड भरला, आपले नाव, वर्धिनीचा पत्ता तिच्याकडे दिला. काही दिवसांनी ही युवती पैसे परत करण्यासाठी वर्धिनीमध्ये आपल्या वडिलांबरोबर आली. वर्धिनीचे काम पहिल्यावर वडिलांना खूप आनंद झाला. श्री. निवंडीकरांना धन्यवाद देऊन त्यांनी त्यांचे पैसे तर परत दिलेच; परंतु तेव्हापासून ते (श्री. भानू) वर्धिनीचे नियमित देणगीदार झाले आहेत.

* दुसरा प्रसंग याच वर्षातील. श्री विनोद बिबवे व त्यांच्या समवेत काही युवक हरिहरेश्वर येथे सहलीसाठी गेले होते. तेथे फिरताना श्री. श्रीवास्तव नावाचे एक गृहस्थ घामाघूम होऊन वाळूत फसलेले त्यांचे वाहन काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. या सर्व गटाने त्यांचे वाहन वाळूतून बाहेर काढले व निघाले. श्री. श्रीवास्तव यांनी या सर्व युवकांना धन्यवाद दिले व काही पैसे देऊ केले. श्री. बिबवे व अन्य उपस्थित सर्व युवक कार्यकार्यांनी त्यांना नम्रपणे नकार दिला व सांगितले की आम्ही 'स्व'-रुपवर्धिनीचे कार्यकर्ते आहोत. अशी मदत आम्ही केलीच पाहिजे. श्री. श्रीवास्तव यांनी 'स्व'-रुपवर्धिनी काय काम करते याची चौकशी केली आणि श्री. बिबवे यांच्या हातात पाचशे एक रुपये वर्धिनीला देणगी म्हणून दिले.

कर्तव्यनिष्ठा, स्वत: पुढाकार घेऊन काम करण्याची वृत्ती, मातृभूमीविषयी भक्ती, समाजाची सेवा करण्याची तत्परता, चारित्र्य निर्मिती या सारखे योग्य संस्कार आपल्या बालकावर करणे हा संगोपन कार्याचा आवश्यक भाग आहे.

## बालवाडी व बालशाखा विभाग

**छंदवर्ग** - इयत्ता १ली व २री मधील मुलामुलींसाठी ५ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत हा वर्ग झाला. ८८ विद्यार्थी सहभागी झाले. छंदवर्गात - गोष्टी सांगणे, पाठांतर, पपेट शो, खेळ , कृतीसत्र इ. कार्यक्रम झाले. कृतीसत्रामधे कागदाच्या पिशव्या बनवणे, चुरगळा काम, मार्बलकाम, चिकटकाम, पताका रंगवणे, कागदाचे मणी तयार करणे, कागदाच्या टोप्या बनवणे, चित्र काढणे व रंगवणे, कुंड्यांची सजावट तसेच कुंड्यांमधे बिया लावून, रोज त्यांना पाणी घालणे व रोपांच्या वाढीचे निरीक्षण करणे असे विषय होते.

रामरक्षा पाठांतराबरोबरच वेगवेगळी गाणी मुलांनी पाठ केली. त्यातील ''आम्ही गड्या डोंगरचे राहणार'' आणि ''हम होंगे कामयाब एकदिन'' ही दोन्ही गाणी सर्वांची पाठ झाली.

छंदवर्गाची ओढ इतकी होती की घरच्या कार्यक्रमासाठी काही पालक आपल्या पाल्यांना न्यायला आल्यावरही पाल्य मात्र त्यांच्याबरोबर जायला तयार नव्हते.

छंदवर्गात झालेल्या सर्व गोष्टी मुलं रोज घरी करून दाखवायची.

रामनवमीच्या दिवशी मुलांना रामाची गोष्ट सांगितली होती. छंदवर्गातून घरी गेल्यावर काही मुलांनी आपल्या पालकांना श्रीरामाच्या देवळात घेऊन जायला भाग पाडले.

**बालमेळा** - छंदवर्गाचा समारोप एका दिवसाच्या बालमेळ्याने झाला. छंदवर्गातील विद्यार्थी आणि वर्धिनीमधील विद्यार्थी 'पालकांच्या' मुला-मुलींसाठी हा बालमेळा ३० एप्रिल रोजी घेण्यात आला होता. एकूण १५० बालांनी याचा आनंद लुटला. या मेळ्याचे उद्घाटन एका छोट्या पाहुण्याच्या हस्ते झाले. वर्धिनीचे कार्यकर्ते श्री. उमेश जोशी यांची मुलगी कु. आदिती ही बालमेळ्यात सहभागी व्हायला आली होती. तिला कल्पनाच नव्हती की तिच्या हस्ते या बालमेळ्याचे उद्घाटन होणार आहे. जेव्हा तिला खुर्चीवर बसवले तेव्हा तिची प्रतिक्रिया पहाण्यासारखी होती. तिने दीपप्रज्वलन केल्यावर उपस्थित बालांनी चांदीच्या कागदाच्या तयार केलेल्या चांदण्यांची बरसात केली.

या बालमेळ्यात सात दालने होती त्यात भाषा, गणित, जीवन व्यवहार, विज्ञान या विषयावरचे खेळ होते. विज्ञानातील गमतीदार प्रयोगही एका दालनात होते. बालमेळाव्यातील सर्वांच्या जेवणाची व्यवस्था एका देणगीदाराने केली होती. हे जेवण अधिकच चविष्ट झाले- कारण या जेवणातील कोशिंबीर बालमेळाव्यातील सर्वांनी मिळून बनवली होती. बालमेळाव्यात केलेल्या ठसेकामातील चित्र, रंगवलेले चित्र, तयार केलेले कागदाच्या मण्यांची माळ स्वत:च तयार केलेल्या कागदाच्या पिशवीत घेऊन ही मुले उड्या मारत, आनंदाने पालकांबरोबर घरी गेली.

**पाऊले चालती पंढरीची वाट.....** लक्षावधी वारकरी विठू माऊलीच्या दर्शनाच्या ओढीने शतकानुशतके आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपूरात दाखल होतात. कोट्यावधी समाजबांधव आपल्या गावातून जाणाऱ्या वारकऱ्यांच्या तसेच पालख्यांच्या

> आजच्या एकूण शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र परिवर्तन करणे आवश्यक आहे.



दर्शनाने पंढरपूराच्या वारीचे पुण्य प्राप्त करतात. या भक्तीमय वातावरणापासून वर्धिनी दूर कशी बरे राहणार ? दरवर्षी बालवाडी व बालशाखेचे विद्यार्थी नटून थटून वारकरी होतात, कोणी ज्ञानेश्वर माऊली तर कुणी विठ्ठल रखुमाई बनतात. डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन, टाळ वाजवत, पंढरपूरच्या वारीसारखी बालचमुंची ही पालखी वर्धिनीतून निघते व सोमवार पेठेतील विठ्ठल मंदिरापर्यंत जाते. यावर्षीच्या आषाढी एकादशीच्या दिवशी तसाच उत्साह होता. विठ्ठल रूपात सजवलेल्या 'छोट्या' च्या पालकांना वाटले की हे विठ्ठलरूप आणखी सजायला हवे म्हणून नवी वेशभूषा आणून त्यांनी त्याला सजविले. पारगे चौक, प्रबोधनकार ठाकरे चौक, खडीचे मैदान आणि नागेश्वर मंदिर अशा सर्व ठिकाणी गोल रिंगणाचा कार्यक्रम झाला. आजोळ शाखेने या गोल रिंगणात त्यांचा अश्व वेगाने दौडत नेला; तर सर्व बाल चमूंनी विठ्ठल रखुमाईचा नामघोष करून परिसर भक्तीमय केला. छोट्या बालांनी फुगड्यांचा फेर तर धरलाच; पण त्या वातावरणात उपस्थित सर्व महिला शिक्षिका व कार्यकर्त्यांनाही फुगडीचा मोह आवरला नाही.

श्री विठ्ठल मंदिरात पोहोचल्यावर प्रथेप्रमाणे कीर्तनही झाले. या वर्षी 'पाण्याचे महत्त्व आणि पर्यावरण' या विषयावर **इयत्ता चौथीतील मधील कु.प्रणाली साळी हिने कीर्तन सादर केले व तिला इयत्ता तिसरीतील मधील कु.प्रियांका कांबळेने सुरेख साथ केली.** श्री विठ्ठलाच्या आरतीने या पालखी सोहळ्याची सांगता झाली.

खेळ, व्यायाम प्रकार, कलाप्रदर्शन, सहली, पर्यटने, विविध व्यवसाय क्षेत्रात प्रत्यक्ष उपयोगी पडेल अशा कामात सहभाग, रंजल्या गांजल्यांची सेवा अशा पाठ्येतर कार्यक्रमांची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

**शिबिर मुलांचं, शिक्षण पालकांचं**

यंदा बालवाडीतील मोठ्या गटाचे एक दिवसाचे निवासी शिबिर २२ ऑक्टोबर रोजी झाले. ६७ जणांनी यात सहभाग घेतला. ही 'मुलं' ३-४ वर्षांची, पालकांपासून कधी दूर न राहिलेली. शिक्षकांना पूर्ण विश्वास की ही मुलं आनंदाने रहाणार. पालकांनीही उत्साहानी त्यांना शिबिरात पाठवलं. पण रात्री मात्र काही पालकांना रहावेना. शिबिरस्थानी म्हणजे वर्धिनीच्या इमारतीत फोन येऊ लागले. माझा मुलगा कसा आहे? मुलगी कशी आहे? मुलं जेवली का? रडत नाही ना? अहो खरं सांगू का आम्हालाच चैन पडत नाही-त्याच्याशिवाय/तिच्याशिवाय . फोन करणाऱ्या पालकांनाच समजावून सांगावं लागत होतं "काळजी करू नका". शिबिरातील मुलं मात्र गाणी गोष्टीत रमलेली. शहाण्यासारखी जेवली. स्वतःची स्वच्छता, ताट धुणं सगळ स्वतः केल. आई-वडिलांची आठवण काही मुलांना झाली. तेही साहजिक होत. पण 'ताई' त्यांच्याबरोबर होत्या. त्यांनी गोष्ट सांगितली, अंगाई गीतंही म्हटली आणि आईच्या जवळ झोपण्याची सवय असलेल्यांना मग केव्हा झोप लागली ते समजलंच नाही.

एक दिवसाच्या या शिबिरात चिकटकाम, कातरकाम मातीकाम, रंग भरणे अशा विविध उद्योगात मुल रमली होती. फुलदाणी, पताका, पाकिटे, फुले, तोरणे,भेटकार्ड, घडीचा कुत्रा अशा अनेक वस्तु रंगीत कागदांचा वापर करून बनविल्या. तर माती कामात माती हाताने मळून कुणी गणपती, कुणी पक्षी, कुणी फळ अशा अनेक वस्तू स्वतःच्या कल्पनेने बनविल्या. रांगोळी मध्ये रंग भरताना त्यांची तन्मयता पहाण्यासारखी होती.

समारोपालाही शिक्षण क्षेत्रातील तज्ञ शिक्षिका सौ. कुंदाताई वर्तक उपस्थित होत्या. शिबिरातील मुलामुलींनी पुढे येऊन मनोगत सादर केलं तर सौ. कुंदाताईंनी गणपती बाप्पाचं एक धमाल गाण मुलांना शिकवून शिबिराचा आनंद आणखी वाढविला.

**ऐका, सांगा, करून बघा ....**

इयत्ता १ली ते ४थीच्या ६० विद्यार्थ्यांचे शिबिर २८ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत झाले. विविध विषयांना वाहिलेल्या या शिबिरात श्रीमती ललिता गुप्ते, श्री. समीर नाईक, सौ. मेघा नगरे यांचे मार्गदर्शन लाभले.

या शिबिरातील विशेष :-

- 'गोष्ट ऐका/गोष्ट सांगा' या कार्यक्रमात मुलांनी भगतसिंगांची कथा ऐकली व नंतर पुनः सांगितली. (स्मरण कौशल्य, सादरीकरणातील कौशल्य याचा अभ्यास या सत्रातून केला.)
- प्रसंगनाटय कसे सादर करायचे असते, याचे प्रात्यक्षिक मुलांनी बघितले आणि त्यानंतर दिलेल्या विषयावर प्रसंगनाटय सादर करण्याचा प्रयत्न केला.
- कृतीसदरात शाडूच्या मातीच्या पणत्या मुलांनी तयार केल्या. भेटकार्डे तयार केली. ही भेटकार्ड एका रूपयास एक याप्रमाणे विकून शंभर रूपये मिळविले. विविध आकाराच्या पणत्या मुलांनी बनवल्या. यातील बेडकाच्या आकारातील; तसेच नारळाच्या पाटीचा आकार असलेली पणती सर्वांचं लक्ष वेधून घेत होती.
- सत्व, रज, तम या गुणांना मनुष्य रूपात सादर

सुसंस्कारांचा अभाव, जीवनातील अस्थिरता, असुरक्षितता, झटून काम करण्याची अनिच्छा, नेत्यांचा नीतिशून्य व्यवहार, मोडकळीस आलेली कुटूंबव्यवस्था ही युवकांमधील खदखदणाऱ्या असंतोषाची व बेशिस्तीची कारणे आहेत.

करून तयार केलेली ॲनिमेशन कथा समीर नाईक यांनी मुलांना दाखवली. या गोष्टींच्या निमित्ताने श्री नाईक यांनी सर्वांशी सहज संवाद लाधला. 'ओम सहनाववतु' या नेहमी म्हटल्या जाणाऱ्या श्लोकाचा अर्थ सांगता सांगता आपल्याकडचे दुसऱ्याला सहजपणे व आनंदाने दिले की, आपल्याकडेही इतरांकडून कसे सहजपणे दुसरं काही तरी येत रहातं, हा विचार त्यांनी एका छोटया खेळातून बिंबवला.

❋ स्वयंपाकाच्या भांडयापेक्षा लहान असणारे शिबिरार्थी त्या भांडयात बसूनच भांडे स्वच्छ करीत होते.

❋ पहिलीच्या विद्यार्थ्यांना चौथीचे विद्यार्थी अंघोळ घालीत होते.

चौथीचे विद्यार्थी गट प्रमुख होते. रूचिका नावाच्या गटप्रमुख मुलींच्या गटातील निखीलला ताप आला. शिबिराच्या प्रमुख ताईंनी सांगितले होते की, आपल्या गटातील सर्वांची काळजी गटप्रमुखाने घ्यायची. चौथीतील रूचिका छोटया 'निखिलची' मोठी ताई झाली. त्याला औषध देणं, मांडीवर थोपटून त्याला झोपवण्याचे काम तिने 'ताईच्या' जबाबदारीने पार पाडले.



पालक-शिक्षक संघाच्या वतीने दि. २० सप्टेंबर रोजी 'स्व'- रूपवर्धिनीच्या सहकार्यवाह श्रीमती पुष्पाताई नडे यांचा सत्कार करण्यात आला. पालक-शिक्षक संघाचे डॉ. प्रमोद जोग यांनी आपले विचार सर्वांसमोर ठेवले. 'सध्याच्या काळात पैशांचा अभाव असलेले पालक आणि संपन्न असलेले पालकही पैसा - पद - प्रतिष्ठा या 'प' च्या बाराखडीचा हव्यासाने ध्यास घेतात. पण 'प' च्या बाराखडीतील 'प्रेम' हे मात्र मागे पडत आहे. मुलांना अपेक्षित प्रेम देण्यासाठी पालकांना सवड नसते. शाळा हा तवा, मुलं हे थालीपीठ, आणि पालक हे तेलाच्या वंगणाचं माध्यम म्हणून शाळा व मुलं यांच्या संबंधात काम करतात, असे त्यांनी सांगितले.

सत्काराला उत्तर देताना श्रीमती पुष्पाताई नडे यांनी सांगितले, ''वात्सल्य, प्रेम, ममता, हे केवळ स्त्रीच देऊ शकते. बालग्रामच्या मुलांनी मला प्रेम कसं करावं हे शिकवलं. 'स्व' रूपवर्धिनीचे संस्थापक कै. श्री किशाभाऊ पटवर्धन, श्रीमती चंद्राताई दलाया, श्रीमती कुंतीताई मुजुमदार यांनी मला प्रेरणा दिली. प्रेम दिल्याने ते जास्त वाढते याचा अनुभव, वर्धिनीत व वस्ती विभागात काम करताना आला. हा सत्कार माझा एकटीचा नसून या सर्वांचा आहे.''

श्री. मुकुंद संगोराम हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. श्री. मुकुंदराव किर्लोस्कर हेही या प्रसंगी उपस्थित होते.

आपण उपेक्षित बांधवांच्यात मोकळेपणाने मिसळावे, त्यांच्याबरोबर खावे प्यावे, आणि त्यांच्यासह तल्लीन होऊन भक्तीपर गीते आणि भजने म्हणावीत.

## फिरती प्रयोगशाळा

विभागामार्फत वर्षभरात सुमारे तेरा गावांशी संपर्क होता. या गावांमधील शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या कार्यक्रमाचा हा त्रोटक आढावा :-

**संपर्कातील गावे** - सुतारवाडी, चाले, वाळेण, ताम्हिणी, आंदेशी, मांदेड, कोंढावळे, मुळशी, वाघवाडी, भरे, नीवे, खेचरे, शिरोली

**घेतलेले प्रयोग** - कार्बनडाय ऑक्साईड, तयार करणे, गुणधर्म तपासणे, कार्बनडाय ऑक्साईड, हायड्रोजन वायू तयार करणे, ढग तयार करणे)

-अनियमित आकाराचे क्षेत्रफळ काढणे, आकारमान काढणे (पिंपळाच्या पानाचे क्षेत्रफळ काढणे)

विलगीकरण करणे (नरसाळ्याच्या साह्याने)

**अन्य कार्यक्रम** - गीतसराव - "हर देशमे तू, हर वेषमे तू", टाक र जरा नजर दूरवर मैतरा

त्सुनामीने केलेले नुकसान व तेथील सेवाकार्य (सीडी दाखविली)

राष्ट्रध्वज, राजमुद्रा व राष्ट्रगीत या विषयावरील माहितीचे सादरीकरण (स्पर्धा)

### आपणही हे करु शकतो

भरपूर पाऊस होता तरी ५ ऑगस्ट रोजी पाबळ येथील विज्ञान आश्रम ही संस्था पहायला जाण्याचा ठरवलेला कार्यक्रम रद्द होऊ नये; असे कार्यकर्त्यांना मनापासून वाटत होते. आपल्या संपर्कात असलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी ही संस्था पहावीच अस अगदी मनापासून वाटत होतं. ठरल्याप्रमाणे वर्धिनीची गाडी विमलाबाई गरवारे शाळेपाशी थांबली होती. कार्यकर्ते प्रतीक्षा करीत होते आंदेशी व मांदेड गावातील विद्यार्थ्यांची व शिक्षकांची. मुळशी खोऱ्यात पाऊस तुफान कोसळत होता. मांदेड गावातील विद्यार्थी व शिक्षक पोहोचू शकले नाहीत परंतु सौ. अवचटबाई आंदेशी गावातील विद्यार्थ्यांना घेऊन पोहोचल्या. पावसामुळे पुण्यात पोहोचायलाच त्यांना दुपारचे दोन वाजले.

विज्ञान आश्रम या संस्थेचा विद्यार्थी राघप्पा चौगुले यांनी सर्वांचे स्वागत केले. नंतर या संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती ज्योती शिंदे यांनी संस्थेचा परिचय करुन देणारी एक सी.डी. दाखविली. या संस्थेच्या शिक्षक व कार्यकर्त्यांबरोबर प्रत्येक विभागात जाऊन काम प्रत्यक्ष पाहिले. लेथ मशिन, वेल्डींग विभाग, बांधकाम विभाग, बेकरी उत्पादन विभाग, गाडी दुरुस्ती प्रशिक्षण विभाग, कुक्कुट पालन, शेळीपालन, पशुपालन, फॅब्रिकेशन विभाग, संगणक प्रशिक्षण केंद्र, पॅथॉलॉजी या प्रत्येक विभागातील प्रशिक्षकांनी आपल्या विभागाची माहिती सांगितली.

आपल्या सारखेच ग्रामीण भागातून या संस्थेत आलेले विद्यार्थी बरंच काही शिकतात, बऱ्याच गोष्टी करतात हे आंदेशीमधील विद्यार्थ्यांनी पाहिले. साध्यासाध्या गोष्टींचा उपयोग करून उपयुक्त वस्तू बनवण्याचे तंत्र पाहून आंदेशी मधील विद्यार्थ्यांनी आपल्या बाईजवळ सहज प्रतिक्रिया दिली "**बाई, आपणही हे करू शकतो!**" या शैक्षणिक सहलीतून जो परिणाम साधला जावा अस वाटत होतं, तो नेमका साधला गेल्याचं समाधान फिरत्या प्रयोगशाळेतील कार्यकर्त्यांना मिळालं.

समाजातील आपल्या उपेक्षित बांधवांकडे जाऊन त्यांचे जीवन सुधारण्यासाठी पराकाष्ठाचे परिश्रम करणे ही आपली जबाबदारी आहे.

# स्पर्धा परीक्षा विभाग

**वर्षभरातील ठळक विशेष:**

* राज्यसेवा पूर्व परीक्षेचा वर्ग दिनांक ११ जुलैपासून सुरू करण्यात आला. एकूण २१ जिल्ह्यातील ८५ विद्यार्थी-विद्यार्थीनींनी प्रवेश घेतला. वर्धिनीचा परिचय सौ. बागेश्री पोंक्षे यांनी करून दिला. यावर्षी प्रथमच वर्गासाठी प्रवेश परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचे सर्व नियोजन केंद्रातील जेष्ठ विद्यार्थ्यांनी केले.

* P.S.I/S.T.I/ASST या परीक्षेसाठी सराव चाचण्यांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच गणित व विज्ञान या विषयांसाठी एक महिन्याचा नियमित वर्गही संपन्न झाला.

* २७ सप्टेंबर रोजी पुण्याचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री. सुहास दिवसे यांचे प्रेरणासत्र झाले. स्पर्धा परीक्षेसाठी तयारी कशी करावी, शरीरस्वास्थ्य, मनस्वास्थ्य उत्तम ठेवून परीक्षेची तयारी कशी करावी याबाबत स्वत:चे अनुभव सांगत सांगत त्यांनी मार्गदर्शन केले. मराठी मुलांच्या मानसिकतेतील नेमके दोष कोणते असतात व त्याचा कसा परिणाम स्पर्धा परीक्षांमध्ये होतो, याची नेमकी काही निरीक्षणे मांडून त्यांनी हे दोष आपल्यात रहाणार नाहीत याची काळजी घेण्यास सांगितले.

* दिल्ली येथील अतिरिक्त आयकर आयुक्त सौ. संगीता गोडबोले यांचे 'माहितीचा अधिकार' या विषयावरचे मार्गदर्शन सत्र दि. १५ ऑक्टोबर रोजी झाले.

* सोलापूरचे उपजिल्हाधिकारी श्री. तुषार ठोंबरे यांचे १५ ऑक्टोबर रोजी सकाळी केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र झाले. प्रामुख्याने परीक्षेची तयारी करताना येणाऱ्या अडचणी विद्यार्थ्यांनी त्यांच्यासमोर मांडल्या व त्याबाबत त्यांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

**'अधिकारी' विद्यार्थी मेळावा -**

शनिवार २६ मार्च रोजी वर्धिनीच्या इमारतीत हा मेळावा झाला. चार वर्षांपूर्वी वर्धिनीचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू झाले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेतल्या जाणाऱ्या श्रेणी १ व श्रेणी २ च्या अधिकारी निवड परीक्षांचे मार्गदर्शन या केंद्रामार्फत दिले जाते. गेल्या चार वर्षात या केंद्रातून मिळालेल्या मार्गदर्शनामुळे सुमारे १५-१६ विद्यार्थी महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्यांमध्ये अधिकारी म्हणून काम करीत आहेत. तसेच 'स्व'-रूपवर्धिनीच्या शाखांमध्ये वर्धक-वर्धिका म्हणून संपर्कात आलेल्यांपैकी काही युवक-युवती कार्यकर्तेही आज शासकीय अधिकारी आहेत. या सर्वांचा प्रथमच एक दिवसाचा मेळावा घेण्यात आला. त्यात या 'अधिकारी' विद्यार्थ्यांनी आपापल्या पदाचे काम करताना आलेले अनुभव सर्वांसमोर ठेवले, तसेच येणाऱ्या समस्याही मांडल्या. अधिकारी होण्याची इच्छा असलेल्या 'उद्याच्या' अधिकाऱ्यांना आवर्जून सांगितले की, अशा प्रकारची संधी मिळाली तर ती अवश्य स्वीकारावी कारण या माध्यमातूनही आपण समाजाची चांगली सेवा करू शकतो.

भौतिक, राजकीय आणि वैषयिक वृत्तीवर अवास्तव भर दिल्यामुळे सर्व प्रकारची नैतिक मूल्ये
आणि बऱ्यावाईटाचा विवेक पार उद्ध्वस्त होत आहे.

या अधिकारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जे मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये ग्राहकपंचायतीचे संस्थापक श्री. बिंदूमाधव जोशी तसेच स्वरूपवर्धिनीचे विद्यमान कार्याध्यक्ष श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ हे उपस्थित होते. श्री. जोशी यांनी एकूणच प्रशासन यंत्रणेत जाणवणाऱ्या त्रुटी मांडत असतानाच अधिकारी समाजहितासाठी दक्ष असेल, तर ग्राहकांना म्हणजेच सामान्य नागरिकांना कसा न्याय मिळवून देता येतो याबाबतची प्रत्यक्ष रोकडी उदाहरणे सर्वांसमोर ठेवली. 'स्व'रूपवर्धिनीच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थी जेव्हा अधिकारी बनून प्रशासनात जातो तेव्हा त्याच्याकडून कशाप्रकारच्या गुणवत्तेची/कार्याची अपेक्षा आहे, हेही त्यांनी ठामपणे सर्वांसमोर मांडले.

श्री. श्रॉफ यांनी यशस्वी अधिकारी होण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांची आठवण करून देत ज्याच्याकडे उत्तम नियोजन आहे, उत्कृष्ठ व्यवस्थापकीय कौशल्य आहे, अशी व्यक्ती अधिकारी म्हणून यशस्वी होते, त्याच्या कार्यकर्तृत्वाची सर्वत्र प्रशंसा होते असे अनुभवी विचार मांडले.

मेळाव्याचा समारोप 'यशदा' या शासकीय प्रशिक्षण अध्यासनातील ज्येष्ठ अधिकारी सौ. किशोरी गद्रे यांच्या मार्गदर्शनाने झाला. श्रीमती गद्रे यांनी प्रत्यक्ष शासकीय सेवेत अधिकारी म्हणून काम करताना आलेले अनुभव तर मांडलेच; पण याच अनुभवांचा उपयोग आता शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी कसा होतो आहे, हेही विषद केले.

## जिद्दी दीपालीची यशोगाथा

बिकट परिस्थिती; पण शिकायची खूप इच्छा असलेल्या दीपालीने परिस्थितीचे रडगाणे न गाता, स्वत:च्या कर्तृत्वाने यशाचा मार्ग प्रशस्त केला. कु. दीपाली गणेचरी, लोहियानगर वस्तीत राहणारी एक गुणी मुलगी. बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे शिवणकाम करणाऱ्या वडिलांना दिवसभर कामात मदत करायची. दिवसाचे कॉलेज जमणे शक्य नव्हते म्हणून रात्र महाविद्यालयात प्रवेश घेतला. घरातील कामे सांभाळून मिळणाऱ्या वेळात अभ्यास करायची. दीपालीने वर्धिनीच्या अभ्यासिकेत नाव नोंदविले. रोजच्या कष्टमय दिनक्रमातही दीपाली अभ्यासासाठी अधिकाधिक वेळ काढायची आणि एकाग्र चित्ताने अभ्यास करायची. परीक्षा जवळ आल्यानंतर शेवटचा पूर्ण महिना संपूर्ण दिवस दीपाली वर्धिनीच्या अभ्यासिकेत असायची.

मार्चमध्ये झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत ८४% गुण मिळवून ती रात्रशाळा विभागात पहिली आली आहे. अकाऊंटस् विषयात तिला १०० पैकी ९९ गुण मिळाले असून चार्टर्ड अकाउंटंट होण्याची तिची इच्छा आहे. तिच्या उज्वल यशाबद्दल तिच्या घरी जाऊन वर्धिनीच्या वतीने तिचे खास अभिनंदन करण्यात आले.

ज्ञानाच्या क्षेत्रात मी काही द्यावयाचे आहे, ध्येयाच्या उपासनेमध्ये माझा काही विशेष सहभाग असला पाहिजे अशी शुद्ध आकांक्षा विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे.

**पोलीस अधिक्षकपदी निवड झालेल्या श्री. रवी पाटील यांचा सत्कार एम.एस.ई.बी. स्टाफ क्रेडिट को-ऑप. सोसायटी व स्वरूपवर्धिनी यांच्या वतीने १२ नोव्हेंबर रोजी करण्यात आला. त्या कार्यक्रमाचा वृत्तांत.**

**प्रशासकीय अधिकारी समाजापुढे आदर्श निर्माण करू शकतील :- रवी पाटील**

प्रशासकीय सेवा ही संधी आहे. नवीन जबाबदाऱ्या, नवीन क्षेत्र, नवनवीन माणसांबरोबर काम करण्यास मिळत असल्याने या सेवेत सर्वात जास्त शिकायला मिळते. हे काम स्वयं प्रेरणेने केल्यास प्रशासकीय सेवेत निवड झालेले अधिकारी समाजापुढे आदर्श निर्माण करू शकतील, असे विचार पोलीस अधिक्षक रवी पाटील यांनी मांडले.




'स्व'-रूपवर्धिनी स्पर्धा परीक्षा केंद्र आणि महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड ऑफ क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने सोसायटीच्या सौदामिनी सभागृहात अभ्यासिका चालविली जाते. या अभ्यासिकेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकीच्या भावनेने काम करणाऱ्या 'स्व'-रूपवर्धिनी या संस्थेला भविष्यातही आम्ही सहकार्य करू असे क्रेडिट सोसायटीचे कार्याध्यक्ष श्री. रासकर साहेब यांनी जाहीर केले.

पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झालेले संभाजी यादव, प्रशांत सूर्यवंशी, रंजना बारहाते, भारती मोरे; तसेच पाणलोट पदविकेत प्रथम आलेल्या हणमंत पाटील या विद्यार्थ्याचा सत्कार रवी पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला इलेक्ट्रिसिटी क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे पदाधिकारी श्री. इनामदार साहेब, श्री. गर्देसाहेब आदी उपस्थित होते.

**❁ अभ्यासिका कार्यक्रम वृत्त**

मंगळवार पेठ व भोवतालच्या पेठांच्या परिसरातील विद्यार्थी- विद्यार्थीनींसाठी 'स्व'-रुपवर्धिनीने गेल्या अनेक वर्षांपासून अभ्यासिका सुरू केली आहे. लहानशा खोलीत अभ्यासास पुरेशी जागा नसते. तसेच पोषक वातावरणही नसते अशा विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेचा चांगला फायदा होत आहे. गेल्या वर्षभरात ८०० विद्यार्थ्यांनी या अभ्यासिकेचा लाभ घेतला. संस्थेतील अभ्यासिकेची जागा येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अपुरी पडत होती. मनात इच्छा असूनही नाईलाजाने अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश देता येत नव्हता. चांगली अभ्यासिका ही या भागाची आत्यंतिक गरज आहे. ही आवश्यकता लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ स्टाफ क्रेडिट सोसायटीने मदतीचा हात पुढे केला. त्यांच्या वास्तूत अभ्यासिकेची सोय करून

विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवले पाहिजे की व्यक्तीचे वा एखाद्या गटाचे हक्क कर्तव्य-सापेक्ष असतात;
आणि कर्तव्यापेक्षा हक्क गौण समजले पाहिजेत.

दिली. याचा एक कार्यक्रम दि. ७ ऑगस्ट रोजी पार पडला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ स्टाफ क्रेडिट सोसायटी कार्यकारिणीचे काही सदस्य व अध्यक्ष श्री. त्र्यंबके उपस्थित होते.

अभ्यासिकेत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विद्युत मंडळाची जागा अतिशय शांत व सुविधांनी परिपूर्ण असल्याने या वातावरणाचा सकारात्मक परिणाम अभ्यासावर होईल, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

श्री. त्र्यंबके यांनी विद्यार्थ्यांना वीज कामगार क्रेडिट सोसायटी स्थापन करण्यामागचा उद्देश सांगितला. तसेच हे करीत असतानाही सामाजिक बांधिलकीची जाण लक्षात ठेवून 'स्व'-रुपवर्धिनीच्या कामाविषयीची आत्मीयता या अभ्यासिकेस परवानगी देऊन प्रकट केली आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेचा लाभ घेऊन उज्ज्वल यश संपादन करावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

## आनंदवार्ता

* 'स्व'-रूपवर्धिनीचे सन्माननीय सभासद, ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या शुभहस्ते ॲटलांटा (अमेरिका) येथे १ जुलै २००५ रोजी बृहन्महाराष्ट्र मराठी मंडळाच्या रौप्यमहोत्सवी वर्षातील अधिवेशनाचे उद्‌घाटन झाले. तसेच अमेरिकेतील अमेरिकन जर्नल ऑफ बिझिनेस या साप्ताहिकाने आशिया खंडातील विविध क्षेत्रात चमकदार कामगिरी बजावणाऱ्या पंचवीस मान्यवर व्यक्तींची "Stars of Asia' या मथळ्याखाली सूची प्रसिद्ध केली असून पद्मभूषण डॉ. माशेलकर यांचे नाव या यादीत समाविष्ट केले आहे. या यादीत प्रथमच एका शास्त्रज्ञाचा समावेश करण्यात आला आहे. वर्धिनीच्या परिवारातील व्यक्तीचा हा गौरव संपूर्ण परिवारालाच अभिमान वाटणारा आहे.

* 'स्व'-रूपवर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. प्रतापराव पवार यांच्या रविवार सकाळ मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या 'वाटचाल' या सदराचे संकलन पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. या पुस्तकाच्या प्रकाशनाचा देखणा कार्यक्रम शनिवार दिनांक १६ जुलै रोजी झाला. 'द हिंदू' या चेन्नई येथील वृत्तपत्राचे श्री. एन. मुरली आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला.

आजच्या शिक्षणात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा आविष्कार घडवून आणण्याऐवजी
त्यांच्यात नोकरी व्यवसायासाठी लागणारी पात्रता कशी निर्माण करता येईल या गोष्टीवरच सारा भर असतो.

## आर्थिक आघाडीवरून.....

'स्व'-रूपवर्धिनीचे संस्थापक (कै.) किशाभाऊ पटवर्धन सरांचा आर्थिक विषयासंबंधीचा दृष्टिकोन हासुद्धा कार्यकर्त्यांमध्ये प्रेरणा निर्माण करणारा होता. सामाजिक संस्थेचे काम अर्थबळाच्या कमतरतेमुळे रडतखडत चालावे, हे त्यांना कधीही मान्य नव्हते. त्याच वेळेला जमा झालेल्या प्रत्येक पैशाचा हिशेब चोख असला पाहिजे, खर्च केलेला प्रत्येक रूपया हा योग्य कार्यासाठी खर्च झाला पाहिजे, या बाबतीत ते कमालीचे आग्रही असायचे. वर्धिनीची स्थापनाच त्यांनी शाळेतून निवृत्त झाल्यावर केली. त्यानंतर हे काम पंचवीस वर्ष चालविताना, वाढवताना त्यांनी या बाबतीतील शिस्त शंभर टक्के पाळली आणि कार्यकर्त्यांच्या पुढील फळ्यांमध्येही उतरवण्याचा प्रयत्न केला. कार्यालयात आल्यावर अर्थव्यवस्थेचे काम पहाणाऱ्यांना ते विचारायचे ' काय कॅशियर ! आज किती देणगी जमा झाली? पुढील तीन महिन्यांच्या खर्चाची तरतूद आहे ना?' हे प्रश्न अर्थातच त्यांच्या थट्टामस्करीच्या शब्दांमध्ये असायचे, परंतु त्यामुळे हा विचार कार्यकर्त्यांमध्ये सतत जागा रहायचा.

कै. पटवर्धन सर जाऊन आता जवळपास दीड वर्ष झाले. कुठेही असले तरी त्यांचे या विषयाकडे लक्ष असायचे. अगदी आज जरी त्यांनी आर्थिक बाबतीत प्रश्न विचारले तर? तर उत्तर देता येईल की,

**हे आहे वर्ष २००४-०५ चे आर्थिक चित्र.**

वर्षभरातील एकूण खर्च (घसारा सोडून)
- रु. १५,९४,०८३.९९

उद्दिष्टांवरील एकूण खर्च - रु. १३,३७,१९०.५५

व्यवस्थापकीय एकूण खर्च - रु. ०२,५६,८९३.४४

एकूण जमा रकमेतून सर्व खर्च वजा केल्यावर रु.२,२००.२१ इतकी रक्कम पुढील वर्षासाठी शिल्लक.




राष्ट्राय स्वाहा: ! राष्ट्राय, इदं न मम !

# २००७ मधील दु:खाचे क्षण

२००४ ची अखेर आणि २००५ ची सुरवातच सागरी भूकंपाच्या तडाख्याने झाली. भारतासह इंडोनेशिया, श्रीलंकेतील सुमारे दोन लाख लोकांना जीव गमवावा लागला. हजारो कुटूंबे बेघर झाली. ''एक लाट तोडी दोघा पुन्हा नाही गाठ'' या ग.दि.माडगूळकरांच्या गीतातील ओळी लाखो लोकांना दुर्देवाने अनुभवायला मिळाल्या. हीच स्थिती पावसाळ्यामध्ये झाली. अतिवृष्टीने महाराष्ट्रासह अनेक राज्यांना तडाखा दिला. शेकडोंना जीव गमवावा लागला.

निर्सग सौंदर्यासाठी आणि थंड हवेसाठी प्रसिद्ध हिमालयाच्या परिसराने रौद्ररूप धारण केले. जम्मु-काश्मीरमधील भूकंपाने तेथील नागरिकांनाच नाही तर संपूर्ण देशालाच हादरवले. या भूकंपामुळे झालेली जीवित हानीही प्रचंड आहे. नुकसानीचे वर्णन तरी कसे करायचे? या सर्व संकटांमध्ये जीव गमावलेल्या सर्वांना विनम्र श्रद्धांजली.

याच कालावधीत ज्यांचा वर्धिनीच्या कामाशी निकटचा संबंध होता अशा अनेक परिवारात प्रिय व्यक्तींच्या वियोगाच्या दु:खद घटना घडल्या. या सर्व व्यक्ती वर्धिनीशी निकटचे नाते असलेल्या होत्या. त्यांचा वियोग ही दु:खदायक घटनाच पण ती स्वीकारण्या पलिकडे आपल्या हाती काही नाही. या सर्व व्यक्तींच्या कुटूंबियांच्या दु:खात वर्धिनी सहभागी आहे.

**• श्रीमती सुधाताई लाड • सौ. लीलाताई ना. जोशी • श्रीमती लक्ष्मीबाई पाटील**
**• श्री. अच्युतराव दांडेकर • डॉ. विश्वनाथ लक्ष्मण पटवर्धन • चंद्रकांत भालेकर**
**• श्रीमती विजयाताई लवाटे • श्री. सुधाकरराव वैद्य**

**• सौ. अनीला मरिवाला** - 'स्व'-रुपवर्धिनीचे अध्यक्ष श्री. जयसिंहभाई मरिवाला यांच्या पत्नी सौ. अनीला यांचे याच कालावधीत अत्यंत आकस्मिकपणे दु:खद निधन झाले. मृदू स्वभावाच्या आणि भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपल्या सौहार्दपूर्ण स्वभावाने प्रोत्साहीत करणाऱ्या अनीलाताईंचे निधन ही मरिवाला कुटूंबियांप्रमाणे वर्धिनीच्या परिवारातील दु:खदायक घटना आहे. वर्धिनीच्या कामातील त्यांचा सहभाग हा वर्धिनीला सतत प्रेरणा देत राहील.



**• श्रद्धेय हो. वे. शेषाद्री** - रा. स्व. संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक श्रद्धेय हो. वे. शेषाद्री यांचे याच कालावधीत वृद्धापकाळामुळे दु:खद निधन झाले. 'स्व'-रुपवर्धिनीसारख्या अनेक सेवाभावी संस्थांच्या कामाचा परिचय आपल्या सिद्धहस्त लेखणीने 'उगवे संघ पहाट' या पुस्तकात त्यांनी प्रभावीपणे केला. आपल्या मृदु आणि आश्वासक संवाद कौशल्यातून त्यांनी देशभरातील हजारो स्वयंसेवकांना देशाची सेवा करण्यासाठी प्रेरित केले.

**• श्री. प्रतापराव ओसवाल** - अत्यंत मितभाषी वाटणाऱ्या प्रतापरावांचे प्रत्यक्ष काम करण्याच्यावेळी घडणारे दर्शन भाराऊन टाकणारे असायचे. सहाय्य करण्याचे काम इतक्या सहजपणे करुन टाकतील की कोणाला पत्ताही लागू नये. मिळणारा मोकळा वेळ नवी-नवी पुस्तके वाचण्यात आणि इतरांच्या उपयोगी पडण्यात खर्च करणारे प्रतापरावांचे इतक्या आकस्मिकपणे जाणे कोणाच्या कल्पनेलाही मानवणारे नव्हते. दैवगती पुढे माणूस किती दुबळा ठरतो ते अशा प्रिय व्यक्तींच्या वियोगाच्यावेळी जाणवते. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात वर्धिनी सहभागी आहे.

हा जो आपला समाज आहे त्या संपूर्ण समाजातील सर्व व्यक्ती एकाच चैतन्याने ओतप्रोत आहेत.

# दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

१) रामकृष्ण शाखा
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११.
शाखाप्रमुख - श्री. उमेश बिबवे

२) अभेदानंद शाखा
वीर बाजीप्रभू विद्यालय, गोखलेनगर, पुणे-१६
शाखाप्रमुख - श्री. नितीन भिलारे

३) विवेकानंद शाखा
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय, पांडवनगर,
वडारवाडी, पुणे - १६
शाखाप्रमुख - श्री. अमित येलवंडे

४) अखंडानंद शाखा
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय,
बिबवेवाडी, पुणे - ३७
शाखाप्रमुख - श्री. राहूल वाघले

५) सुबोधानंद शाखा
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुणे - ५२
शाखाप्रमुख - श्री. गिरीश फाटे

६) योगानंद शाखा
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे-३०
शाखाप्रमुख - श्री. मल्लेश मोरे

७) भगिनी निवेदिता शाखा
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे-११
शाखाप्रमुख - कु. चैत्राली लडकत

८) दयानंद सरस्वती
अप्पर इंदिरानगर, पुणे - ३७
शाखाप्रमुख - श्री. प्रशांत कवडे

९) श्रद्धानंद शाखा
महर्षि आण्णासाहेब शिंदे विद्यालय
घोरपडे पेठ, पुणे - ४२
शाखाप्रमुख - श्री. नीलेश थायरकर

१०) ब्रह्मानंद शाखा
म.न.पा. शाळा क्र.१६८,
हिंगणे खुर्द, पुणे - ५१
शाखाप्रमुख - श्री. धनंजय डोबे

११) आजोळ
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - सौ. मंजूषाताई कुलकर्णी
संपर्क - सो. ते शुक्र. स. १.३० ते ५

१२) वीर अभिमन्यू बालशाखा
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - श्रीमती तस्लीम फणीबंद

१४) शारदामणि महिला विभाग व 'पाकोळी' बालवाडी
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
प्रकल्पप्रमुख - श्रीमती पुष्पाताई नडे
सहायक : सौ. स्वातीताई कारेकर
संपर्क - सोम. ते शुक्र. स. १० ते १,
शनि. ९ ते १०.३०
बचतगट समन्वयक - सौ. वासंती कुलकर्णी
नेत्रचिकित्सा प्रकल्प समन्वयक : सौ. सुजाता कुदळे,
सुरेखा माळी
उद्योग शिक्षण - सौ. विजयाताई कुलकर्णी, सौ. गुरव,
ग्रंथालय -ग्रंथपाल - श्रीमती नीला कुडलिंगार
साक्षरता प्रसार समन्वयक - श्रीमती सुगंधा कबीर

१५) संगणक विभाग
विभागप्रमुख - श्री अविनाश जोशी
श्री. निशिकांत वाईकर,
संपर्क - सोम. ते शुक्र. दु. १२ ते सायं.५

१६) स्पर्धा परीक्षा व स्वयंवरोजगार मार्गदर्शन केंद्र
केंद्र प्रमुख - कु. दिपाली पवार,
सहप्रमुख - कु. आरती बोराडे
संपर्क - सोम. ते शनिवार दु. १२ ते ५ सायं ६ ते ८

१७) फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प
विभागप्रमुख - श्री. सुनील कुलकर्णी
सहायक - कु. लता टिळेकर

१८) मृद्गंध गिरीभ्रमण गट
विभागप्रमुख - वैद्य विनेश नगरे
सहायक - श्री. चंदन हायगुंडे

आपल्या वनवासी बंधुच्यामध्ये धैर्य, बुद्धिमत्ता, उद्यमशीलता, प्रामाणिकपणा, जिव्हाळा, सुसंस्कृतपणा आणि विशुद्ध आध्यात्मिक चमक यासारखे अनेक सद्‌गुण आहेत.

**कार्यालयीन व्यवस्थापक -**
**श्री. शिवदास शंकर तथा आप्पासाहेब पोतदार,**

**कार्यालय** २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी, सौ. प्रगती तांबट
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०) **संपर्क** - सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं.६.१५ ते रात्री ८.३०
शनिवार दु. ४.३० ते सायं ७.३०
रविवार स. ७.३० ते १०.००

**प्रधान शाखापालक :**
श्री. दि. दा. जोशी
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे - ३७.

## उपक्रम : - असे तास .... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ पर्यंत**

१) व्यायामशाळा : सकाळी ६ ते ८
२) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
३) अभ्यासिका : सकाळी ८ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योगशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) आजोळ प्रकल्प (दुपारशाखा) : दुपारी २ ते ५
३) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प *
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**रविवार सोडून अन्य दिवशी चालणारे उपक्रम**

१) बालवाडी
२) उद्योग शिक्षण वर्ग
३) साक्षरता वर्ग
४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
५) सेवावस्ती संस्कार वर्ग
६) कुटुंब सल्ला केंद्र
७) शिवणवर्ग
८) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) - प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र - प्रत्येक मंगळवार

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरीत सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळामध्ये चालतात.

आजचे आपले शिक्षण केवळ माहिती देणारे -निवेदनात्मक आहे, घडविणारे नाही.